


कुलगुरु कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर



धनुर्धारी श्रीराम लक्ष्मण

स्थापना १२ मे १९०९



शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर


पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार

**Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine April 2026 - Pages - 60**

**संपादक : श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे** **कार्यकारी संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे**

* पुणे * वर्ष ७७ * अंक ६ * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-




दि. ४ मार्च २०२६ रोजी पुणे विद्यार्थी गृहाच्या विद्याभवन घाटकोपर, मुंबई शाखेच्या सुवर्णमहोत्सवी वर्ष उद्घाटन समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुण्या बृहन्मुंबईच्या महापौर श्रीमती रितू तावडे यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत डावीकडून कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, माजी नगरसेवक श्री. भालचंद्र शिरसाट, माजी कार्याध्यक्ष श्री. कृ. ना. शिरकांडे, उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी पाठीमागे संस्थेच्या नियामक मंडळाचे उपाध्यक्ष मा. प्राचार्य श्री. अ. पाटणकर आणि संचालक श्री. रमेश कुलकर्णी

## ✻ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व श्रीकृष्ण सदाशिव धामणकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, म्हसरूळ शाखा, नाशिक ✻




दि. २४ मार्च २०२६ रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे मा. डॉ. गोरक्ष व्ही. गर्जे, (संयुक्त संचालक, प्रादेशिक कार्यालय, नाशिक तथा महाराष्ट्र राज्य तांत्रिक शिक्षण संचालनालय प्रतिनिधी) यांचा सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत संस्था पदाधिकारी, देणगीदार श्रीमती सिंधूताई धामणकर, विविध विभागांचे प्राचार्य आणि उपप्राचार्य



## ✻ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ✻

दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी 'सावित्री-फातिमा २०२६ आदर्श संस्था संचालक पुरस्कार' स्वीकारताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती संगीता राजेंद्र बोऱ्हाडे, आदी मान्यवर



दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी 'सावित्री फातिमा २०२६ आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार' स्वीकारताना प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार, समवेत कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, आदी मान्यवर



दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्र पुरोगामी संघटनेतर्फे देण्यात येणारा 'आदर्श शिक्षक पुरस्कार' स्वीकारताना सहा. शिक्षक श्री. रूपेश मांडवेकर

संपादकीय

# पंडिता रमाबाई

समईच्या ज्योतीप्रमाणे शांत पण मोठे तेजस्वी, पांडित्यपूर्ण आणि विशेषतः स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी प्राणपणाने झगडणारे एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व म्हणजे पंडिता रमाबाई.

लक्ष्मीबाई आणि अनंतशास्त्री डोंगरे हे रमाबाईंचे मातापिता. अनंतशास्त्री हे सुधारक विचारसरणीचे होते. त्या काळात त्यांनी आपल्या पत्नीला संस्कृत शिकवण्याचा प्रयत्न केला. परंतु घरातल्या वडिलधाऱ्यांच्या दबावामुळे ते या कार्यात यशस्वी झाले नाहीत. रूढी, परंपरेच्या बंदिस्त चौकटीला कंटाळून अनंतशास्त्री यांनी गृहत्याग केला. तुंगभद्रेच्या काठी, 'गंगामूळ' अरण्यात त्यांनी मुक्काम टाकला. तेथे त्यांनी अध्ययनकार्य सुरू केले. त्या अरण्यात एप्रिल १८५८ मध्ये रमाबाईंचा जन्म झाला.

तेथेही लोकांकडून जाणीवपूर्वक केल्या जाणाऱ्या छळामुळे कंटाळून अनंतशास्त्री आपल्या परिवारासह तीर्थाटनासाठी बाहेर पडले. त्यावेळी रमाबाई फक्त सहा महिन्यांच्या होत्या. डोंगरे परिवाराची ही तीर्थयात्रा डोंगरे शास्त्री यांच्या मृत्यूपर्यंत सुरू होती. १५ - १६ वर्षांच्या या प्रदीर्घ तीर्थयात्रा काळात रमाबाईंना त्यांच्या पालकांकडून विशेषतः आईकडून संस्कृत भाषा व साहित्याचे शिक्षण मिळाले. तीर्थयात्राकाळात पुराण वगैरे सांगून हा परिवार उदरनिर्वाह करीत असे. परंतु इ. स. १८७७ च्या महाभयंकर दुष्काळात तापाने अनंतशास्त्रींचा मृत्यू झाला. त्याच रात्री दुर्दैवाने लक्ष्मीबाईंचाही मृत्यू झाला. अंत्यक्रियेला चार माणसेही मिळत नसल्याने स्वतः रमाबाईंनीही आपल्या आईच्या तिरडीला खांदा दिला होता. रमाबाई बुटक्या असल्याने त्यांनी आपल्या आईची तिरडी अक्षरशः डोक्यावरून वाहून नेली होती.

मातृपितृछत्र हरवल्यानंतर पोरक्या झालेल्या बहिण भावंडांनी पुन्हा आपली यात्रा सुरू केली. जवळ कवडीही नसल्याने बऱ्याच वेळा दोघा भावंडाच्या नशिबी बहुतेक वेळा एकादशीचा उपवासच असे. कधीतरी कुठे मूठभर धान्य मिळाले तर, ते पाण्यात भिजवून मीठाबरोबर ही मुले खात. उत्तरेतल्या हाडे फोडणाऱ्या थंडीपासून संरक्षण व्हावे म्हणून नदीकिनाऱ्यावरील वाळूत स्वतःला गळ्यापर्यंत ही भावंडे पुरून घेत व रात्र काढत.

वडिलांचे वैभव व नंतर वाट्याला आलेले कमालीचे दारिद्र्य बालवयातच अनुभवल्याने रमाबाई म्हणतात,

'विपत्काली धैर्य अगदी सोडू नये. जगात दुःखशून्य असे कोणीही नाही. सुखदुःखे ही चाकासारखी फिरत असतात. सर्व प्राण्यांची दशा ही रहाटगाडग्यासारखी असते.'

इ. स. १८७८ मध्ये ही भावंडे कलकत्त्याला पोहोचली. कलकत्त्याला मात्र या बहिणभावंडांच्या आयुष्याला थोडेसे स्थैर्य आले. अस्खलित संस्कृत बोलणारी, संस्कृतमध्ये शीघ्र कवित्व करणारी तरुण स्त्री पाहून कलकत्तावासी आश्चर्यचकित झाले. कलकत्तावासियांनी काही पंडितांद्वारे रमाबाईंच्या ज्ञानाची परीक्षा घेतली. रमाबाईंना या परीक्षेत सुयश मिळाल्याने कलकत्त्यातील लोकांकडून रमाबाईंना 'पंडिता' आणि 'सरस्वती' या पदव्या देण्यात आल्या.

यानंतर रमाबाईंच्या जीवनाला एक नवी दिशा मिळाली. दोघा बहीण भावंडांनी बंगाल इलाख्यात सर्वत्र प्रवास करून स्त्री शिक्षणाचे प्रसारकार्य सुरू केले. या कार्यात कलकत्त्याच्या ब्राह्मोसमाजाची त्यांना मोठी मदत झाली. रमाबाईंना बंगाली भाषा तेवढीशी येत नसल्याने आपले विचार मूळ स्वरूपात लोकांपर्यंत पोहोचविण्यात त्यांना अडचण येई. आपले विचार नेमकेपणाने लोकांपर्यंत पोहोचावेत म्हणून रमाबाई बंगाली शिकल्या. अल्पावधितच त्यांनी बंगाली भाषेत प्रावीण्य संपादिले. रमाबाईंचे आपल्या मातृभाषेवर, मराठीवर तर प्रभुत्व होतेच, तसेच आईवडिलांपासून त्यांना संस्कृतभाषाभ्यासाचाही वारसा मिळाला होता. जन्मापासून सुरू असलेल्या भ्रमंतीत कन्नड, गुजराती, हिंदी, तुळू, इंग्रजी आणि हिब्रू भाषेवरही त्यांनी प्रभुत्व संपादन केले. या सर्व भाषा त्या लिहू, वाचू आणि बोलू शकत होत्या.

रमाबाई अखंड परिभ्रमण करत असल्या तरी, महाराष्ट्राशी त्यांनी आपली नाळ तोडली नव्हती. प्रवासात मराठी वृत्तपत्रांचे वाचन त्या करीत. त्याकाळच्या 'इंदुप्रकाशात' सौ. अनसूयाबाई यांचा, त्यांच्या संस्कृत विद्येतील प्राविण्याबद्दल झालेल्या सत्काराची बातमी त्यांनी वाचली. तेव्हा रमाबाईंचा मुक्काम शिलाँगला होता. त्यांनी तेथून अनसूयाबाईंना अभिनंदनपर पत्र लिहिले होते.

रमाबाईंच्या कर्तृत्वाची यशोगाथा आणि त्यांचे इंदुप्रकाशातील हे पत्र यामुळे मुंबईतील उदारमतवादी लोकांनी रमाबाईंनी महाराष्ट्रात येऊन स्त्रीशिक्षण कार्यात मदत करावी असा त्यांना आग्रह केला. महाराष्ट्रातील लोकांच्या या आग्रहपूर्वक विनंतीवरून आपली मुलगी मनोरमा हिच्यासह रमाबाई महाराष्ट्रात परतल्या. महाराष्ट्रात परतल्यावर त्या पुण्याला स्थायिक झाल्या आणि त्यांनी स्वतःला सार्वजनिक कार्यात झोकून दिले. तत्कालीन समाजात स्त्रियांची दयनीय परिस्थिती पाहून रमाबाईंनी प्रामुख्याने स्त्री जीवनाशी निगडित स्त्री शिक्षण, बालविवाह, पुनर्विवाह आदी सामाजिक परिवर्तनपर कार्य सुरू केले. त्यासाठी पुणे, अहमदनगर, सोलापूर, ठाणे, मुंबई, पंढरपूर, बार्शी इ. ठिकाणी त्यांनी आर्यमहिला समाजाची स्थापना केली. समाजात स्त्रीला ताठ मानेने जगता यावे यासाठी प्रयत्न सुरू केले.

स्त्रियांच्या उध्दाराकरता अधिक जोमाने कार्य करता यावे म्हणून वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी त्या मनोरमेसह इंग्लडला गेल्या. इंग्लंडचा हा प्रवासखर्च त्यांनी आपल्या 'स्त्री धर्मनीती' या पुस्तकाच्या विक्रीतून केला.

रमाबाईंचा हिंदुधर्मशास्त्राचा दांडगा अभ्यास होता. त्याचबरोबर इतरही धर्मग्रंथांचा त्यांचा अभ्यास होता. विशेषतः पतित स्त्रियांबद्दलचा येशू ख्रिस्ताचा दृष्टिकोन तसेच ख्रिस्ताची भूतदया आणि प्रेमभावना संदर्भातली शिकवण यामुळे त्या भारावून गेल्या. परिणामी त्यांनी धर्मांतर करून ख्रिश्चन धर्म स्वीकारला. रमाबाई ख्रिस्ती झाल्या असल्या तरी, कुठलाही ख्रिस्ती संप्रदाय त्यांनी स्वीकारला नाही तर त्यांनी फक्त ख्रिस्ताचे दीनदुबळ्यांच्या सेवेचे व्रत स्वीकारले. त्यांनी आपल्या आयुष्यात हिंदू संस्कृती आणि परंपरा यांचाही त्याग केला नाही. त्या आजीवन शाकाहारी आणि खादीधारी राहिल्या.

डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या पदवीदान समारंभास उपस्थित राहण्यासाठी रमाबाई अमेरिकेला गेल्या. तेथे गेल्यावर हिंदुस्थानातील बालविधवांना उपयुक्त होऊ शकेल अशी 'बालोद्यान शिक्षण पध्दती' त्या शिकल्या.

अमेरिकेहून परतल्यावर विधवा स्त्रियांसाठी त्यांनी 'शारदासदन' नावाची संस्था काढली. केशवपन विरोधी चळवळ आणि संमती वयाच्या कायद्याला त्यांनी जाहीर पाठिंबा दिला. हंटर आयोगापुढे निर्भीडपणे साक्ष दिली. कालांतराने समाज कार्याचे मुख्य केंद्र त्यांनी पुण्यातील 'केडगाव' येथे स्थापन केले. या मुक्ति सदनात मध्यप्रदेश आणि गुजरात प्रांतातील ३०० हून अधिक दुष्काळग्रस्त स्त्रियांना त्यांनी आश्रय दिला. एका रुग्णालयाचीही त्यांनी स्थापना केली होती.

स्त्रियांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे म्हणून रमाबाईंनी त्यांना शेती, विणकाम, मुद्रणकाम इ. कौशल्ये शिकविली. रमाबाईंच्या या विविधांगी आणि मूलभूत समाजसेवेबद्दल १९१९ मध्ये रमाबाईंना 'कैसर - इ - हिंद' सन्मान प्रदान करण्यात आला.

रमाबाईंनी समाजात वैचारिक जागृती घडवण्यासाठी अनेक पुस्तकांचे लेखन केले. रमाबाईंच्या या लिखाणातून त्यांची विचारशक्ती आणि कवीवृत्ती आपल्याला जाणवते.

पंडिता रमाबाई यांच्या या अलौकिक कर्तृत्वामुळेच त्यांना आदरांजली वाहताना सरोजिनी नायडू म्हणाल्या होत्या, 'हिंदू संत मालिकेत जिचे नाव प्रविष्ट करता येईल अशी ही पहिली ख्रिस्ती व्यक्ती.'

दि. २६ मार्च २०२६
श्रीराम नवमी

।। विद्वान् सर्वत्र पूज्यते ।।

# पुणे विद्यार्थी गृह

१७८६, सदाशिव पेठ, पुणे ३०. फोन नं.: २४४७०५७३, २४४७०९२७

स. न. वि. वि.

संस्थेचा ११७ वा वर्धापन दिन **मंगळवार, दिनांक १२ मे २०२६** रोजी संपन्न होत आहे. संस्थेची आजपर्यंतची प्रगती आपणासारख्या हितचिंतक व आश्रयदाते यांचे सहकार्याने व सदिच्छांमुळे झालेली आहे. आपणाकडून लाभत असलेल्या या सहकार्याबद्दल आम्ही आपले ऋणी आहोत.

या वर्धापनदिनानिमित्त सायंकाळी ५ ते ६ या वेळेत वैदिक मंगल घोष (वेद घोष) आणि ६ ते ७.३० या वेळेत स्वागत - समारंभ आयोजित केला आहे. कृपया आपण या समारंभास अवश्य यावे ही नम्र विनंती.

• आपले नम्र •

| **दिनेश मिसाळ** | **कृष्णाजी कुलकर्णी** | **संजय गुंजाळ** | **अमोल जोशी** | **एस.एम.जिर्गे** | **राजेंद्र बोऱ्हाडे** |
|---|---|---|---|---|---|
| कुलसचिव | कोषाध्यक्ष | कार्यवाह | उपकार्याध्यक्ष | उपकार्याध्यक्ष | कार्याध्यक्ष |

**व सर्व संचालक**

स्थळ : पुणे विद्यार्थी गृह, १७८६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

## माजी विद्यार्थी स्नेहसंमेलन

### सस्नेह निमंत्रण

सप्रेम नमस्कार,

पुणे विद्यार्थी गृह नाशिक शाखेच्या शताब्दी महोत्सव सांगता समारंभाच्या निमित्ताने पुणे विद्यार्थी गृह संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन दि. १६ व १७ मे २०२६ रोजी पंचवटी येथे संपन्न होणार आहे. सहभागींनी दि. १६ मे २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजेपर्यंत संस्थेच्या पंचवटी शाखेत येणे अपेक्षित आहे. तेथे निवास व रात्रीच्या भोजनाची व्यवस्था केली आहे.

दि. १७ मे २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजल्यापासून स्नेहसंमेलन सुरू होईल. त्यामध्ये अल्पोपाहार, खेळ, मनोरंजन, स्नेहभोजन असे विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. तरी या स्नेहसंमेलनास माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे. कृपया खालील दूरध्वनी क्रमांकावर आपण उपस्थित राहणार असल्याचे दि. १० मे २०२६ पर्यंत कळवावे ही विनंती.

- डॉ. एकनाथ कुलकर्णी, अध्यक्ष, पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, नाशिक (९८५००७१२४०)
- श्री. ज्ञानेश्वर निंबेकर, मुख्याध्यापक (८९८३४८६०६५)
- श्री. शिवाजी माळी (९८६०५९३५८३)
- श्री. एस. पी. ठोंबरे (९९२१९२८२९०)

आपले नम्र,
पुणे विद्यार्थी गृह, पदाधिकारी

।। विद्वान् सर्वत्र पूज्यते ।।

# पुणे विद्यार्थी गृह

४२६६, पंचवटी, नाशिक ४२२००३ • फोन नं.:०२५३-२५११३०६, २५१२३०६

स. न. वि. वि.

पुणे विद्यार्थी गृह संस्थेची स्थापना दि. १२ मे १९०९ रोजी पुणे येथे झाली. संस्थेचे कुलगुरू कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर यांनी दि. १७ मे १९२६ रोजी पंचवटी नाशिक येथे पहिल्या शाखेचा शुभारंभ केला. दि. १७ मे २०२६ रोजी या शाखेचा १०० वा वर्धापनदिन असून या दिवशी शताब्दी सांगता समारंभ संपन्न होत आहे.

पंचवटी शाखेची गेली १०० वर्षांची कारकिर्द व प्रगती आपणासारख्या हितचिंतक, देणगीदार, माजी विद्यार्थी व सेवक बंधूभगिनी यांचे बहुमोल सहकार्य व सदिच्छांमुळे झालेली आहे. त्याबद्दल संस्था आपली सर्वांची अत्यंत ऋणी व आभारी आहे.

पुणे विद्यार्थी गृह नाशिक शाखेच्या शताब्दी महोत्सव सांगता समारंभाच्या निमित्ताने पुणे विद्यार्थी गृह संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन दि. १६ व १७ मे २०२६ रोजी पंचवटी येथे संपन्न होणार आहे. तरी माजी विद्यार्थ्यांनी या स्नेहसंमेलनास उपस्थित रहावे.

**※ दि. १७ मे २०२६ शताब्दी सांगता समारंभ ※**

- ※ सकाळी १० ते १२ - रूद्राभिषेक व सत्यनारायण पूजा (श्री केशव महाराज मठ)
- ※ सायं. ४ ते ५ - रामरक्षा पठण (श्री केशव महाराज मठ)
- ※ सायं. ५ - शताब्दी महोत्सव सांगता समारंभ व भोजन

तरी कृपया आपण या समारंभास अवश्य यावे ही नम्र विनंती.

• आपले नम्र •

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **दिनेश मिसाळ** | **कृष्णाजी कुलकर्णी** | **संजय गुंजाळ** | **अमोल जोशी** | **एस.एम. जिर्गे** | **राजेंद्र बोऱ्हाडे** |
| कुलसचिव | कोषाध्यक्ष | कार्यवाह | उपकार्याध्यक्ष | उपकार्याध्यक्ष | कार्याध्यक्ष |

**व सर्व संचालक**

**स्थळ : पुणे विद्यार्थी गृह, नाशिक शाखा, ४२६६, पंचवटी, नाशिक ४२२००३.**



## डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर यांची संग्राह्य पुस्तके

| | | | |
|---|---|---|---|
| • गीतेतील मुख्य विचार | २५/- | • गीता संपूर्ण सार | १६/- |
| • गीतेतील मुख्य विचार - पुरवणी | ०३/- | • डॉ. ग. श्री. खैर चरित्र | ७०/- |
| • त्रिकाल गीता | ०५/- | • सदाचार चिंतनी भाग १ | ८०/- |
| • गीता परिचय | २०/- | • सदाचार चिंतनी भाग २ | ८०/- |
| • सर्वबोध पद्यगीता | २०/- | • सदाचार चिंतनी भाग ३ | ८०/- |
| • जीवनात गीता | ६०/- | • सदाचार चिंतनी भाग ४ | ८०/- |
| • डॉ. अण्णासाहेब खैर संस्मरण ग्रंथ | १००/- | • सदाचार चिंतनी भाग ५ | ८०/- |
| • मराठी गीता व विवरण | ४०/- | • गीतेचा दृष्टीकोन | २५०/- |

**पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन**

१७८६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

# पुणे विद्यार्थी गृह नाशिक शाखा शताब्दीनिमित्त विनम्र आवाहन

**आदरणीय महोदय/महोदया,**

**सप्रेम नमस्कार,**

'न हि ज्ञानेन पवित्रम् इह विद्यते' या भगवंत वचनानुसार ज्ञानोपासना करण्यासाठी सन १९०९ मध्ये पुण्यात 'पुणे विद्यार्थी गृह' या संस्थेची स्थापना झाली. समाजातील गरीब, गरजू, हुशार, होतकरू व अनाथ विद्यार्थ्यांचे शिक्षण, पालनपोषण, संवर्धन व पुनर्वसन करून त्यांना एक सुजाण नागरिक घडवून त्यांच्या पायावर उभे करण्याचे कार्य संस्था गेली ११७ वर्षे उदात्त हेतूने करीत आहे. महाराष्ट्रात संस्थेच्या विविध ठिकाणी शाखा आहेत. पुणे, पंचवटी, तळेगाव-अंजनेरी, म्हसरूळ (नाशिक), घाटकोपर (मुंबई), आणि नेरूळ (नवी मुंबई), असा संस्थेचा शाखा विस्तार आहे. पुणे येथील आश्रम वसतिगृहात १६० विद्यार्थी व नाशिक येथील वसतिगृहात २०० विद्यार्थी वसतिगृह सुविधेचा लाभ घेत आहेत. तसेच शतायुभवन येथे जेष्ठ नागरिकांना आधार देण्याचे कार्य आणि शिक्षण घेत असलेल्या मुलींसाठी संस्थेने महिला वसतिगृहही स्थापन केले आहे. समाजातील दानशूर मंडळी, संस्थेचे हितचिंतक, देणगीदार व माजी विद्यार्थी यांच्या सक्रिय सहकार्यावर व आर्थिक पाठबळावर संस्था हे शैक्षणिक व सामाजिक कार्य आजतागायत करीत आहे.

प्रभू श्रीरामाच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नाशिक नगरीत व श्री. केशव महाराजांच्या पावन वास्तव्याने पुनीत झालेल्या भूमीवर दि. १७ मे १९२६ रोजी पुणे विद्यार्थी गृहाची नाशिक पंचवटी येथे शाखा सुरू झाली, समाजातील गरीब, गरजू, हुशार, होतकरू विध्यार्थ्यांचे जीवनमान उंचावण्याचे कार्य ही शाखा सुरूवातीपासूनच करीत आहे. आज पर्यंत हजारो विद्यार्थ्यांचे शिक्षण, संगोपन, संवर्धन व व्यक्तिमत्त्व विकासाचे कार्य या शाखेने आईच्या मायेने केले आहे.

गरीब विद्यार्थ्यांसाठी चालविल्या जाणाऱ्या या शाखेच्या वसतिगृहाला शासकीय अनुदान मिळत नाही. तरी देखील दर वर्षी सुमारे २०० विद्यार्थांना अत्यंत अल्प दरात ही शाखा निवास, शिक्षण व संस्कार प्रदान करीत आहे. पुणे विद्यार्थी गृहाची तळेगांव अंजनेरी येथील आदिवासी भागातील शाखा, म्हसरूळ शाखा विकसित करण्यासाठी या शाखेने बहुमोल सहकार्य केले आहे व वर्तमान काळात देखील हे कार्य सुरू आहे.

अभ्यासाव्यतिरिक्त विविध मैदानी खेळ, जिम्नॅस्टिक्स, योगासने, प्राणायाम, अभिनय, नृत्य, नाटक, संगीत, कला, गीता पाठांतर, वक्तृत्व स्पर्धा कृतीयुक्त व कौशल्याधारित शिक्षण आदींद्वारा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा प्रयत्न येथे केला जातो. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गरज ओळखून व पालकांची मागणी विचारात घेवून नाशिक शाखेमध्ये -

- आश्रम वसतिगृहातील विद्यार्थी संख्येत वाढ करणे.
- इंग्रजी माध्यमाची शाळा
- मराठी माध्यमाच्या शाळेचा विस्तार व विकास
- वसतिगृहातील विद्यार्थ्यांना उपयुक्त अत्याधुनिक सुविधा
- सुसज्ज कॉम्प्युटर लॅब
- क्रीडा प्रबोधिनी

- ✻ आधुनिक जिम्नॅशिअम व पारंपरिक भारतीय व्यायाम प्रकार
- ✻ ए. आय. व कौशल्याधारित शिक्षण
- ✻ स्पर्धा परीक्षांसाठी अभ्यासिका

या सुविधा विद्यार्थ्यांसाठी व समाजासाठी उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा मानस आहे. संस्था विस्तारीकरणासाठी बांधकाम करणे व इतर आवश्यक बाबींसाठी भरीव निधीची गरज आहे. गरीब, हुशार व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण सुविधा उपलब्ध करून देणे हे संस्थेचे ध्येय व धोरण आहे. यासाठी 'शताब्दी महोत्सव निधी' संकलित करून त्याच्या व्याजातून दरवर्षी विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करावी असा संस्थेचा मानस आहे. या योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी लागणारा खर्च खूप मोठा आहे. याकरिता आपल्या आर्थिक सहकार्याची आणि मदतीची आम्हाला नितांत गरज आहे. यासाठी आपण सढळ हस्ते मदत कराल अशी आम्हाला खात्री आहे.

**दानेन तुल्य: निधिरस्ति नान्य:।**
**(दानासारखा दुसरा खजिना नाही.)**

नाशिक व संलग्न परिसरात वास्तव्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी, शाळेची प्रतिष्ठा, पत उंचावण्यासाठी आपले उदार दातृत्व बहुमोलाचे ठरणार आहे. आपल्या अंत:करणपूर्वक दिल्या जाणाऱ्या मदतीबद्दल संस्था आपली सदैव ऋणी राहील. या सामाजिक कार्यासाठी शक्य झाल्यास मदतीचा हात पुढे करावा ही नम्र विनंती. आपणा सर्वांकडून सकारात्मक प्रतिसादाची व भरघोस अर्थसहाय्याची अपेक्षा आहे. पंचवटी शाखेचा विस्तार व सर्वांगीण प्रगती ही केवळ आपल्या सर्वतोपरी सहकार्यामुळेच शक्य आहे हे आम्ही याठिकाणी नम्रपणे नमूद करू इच्छितो. आम्हाला आपणाकडून अशाच पाठिंब्याची व प्रोत्साहनाची अपेक्षा आहे.

संस्थेला द्यावयाचे मदतीचे धनादेश 'पुणे विद्यार्थी गृह, पंचवटी शाखा' या नावाने पाठवावेत. या देणगीवर आयकर खात्याच्या कलम ८०जी नुसार आयकरपात्र उत्पन्नातून ५० टक्के वजावट मिळते.

बहुमोल सहकार्याबद्दल धन्यवाद!

आपले स्नेहांकित

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनेश मिसाळ | कृष्णाजी कुलकर्णी | संजय गुंजाळ | अमोल जोशी | एस. एम. जिर्गे | राजेंद्र बोऱ्हाडे |
| कुलसचिव | कोषाध्यक्ष | कार्यवाह | उपकार्याध्यक्ष | उपकार्याध्यक्ष | कार्याध्यक्ष |

● पत्ता : ४२६६, पंचवटी, नाशिक ४२२००३ ● फोन नं. : ०२५३-२५११३०६, २५१२३०६

**देणगी देण्यासाठी बँक तपशील**

| | |
|---|---|
| ACCOUNT NAME | : Pune Vidyarthi Grihas Nashik Shakha |
| SAVING ACCOUNT NO. | : 97620100003575 |
| BANK NAME | : Bank of Baroda |
| BRANCH | : Raviwar Karanja, Nashik 422 001. |
| IFSC CODE | : BARB0DBRAVI (The fifth character is Numeric 'zero' |

# संस्थेच्या धनुर्धारी श्रीराममंदिरामध्ये श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**



धनुर्धारी श्रीराम – लक्ष्मण

संस्थेच्या दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे गुरूवार दि. २६ मार्च २०२६ रोजी चैत्र शुध्द ९ ला (श्रीराम नवमी) श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी सकाळी ९.०० ते १०.०० या वेळेत कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांचे शुभहस्ते श्रीराम - लक्ष्मणास पुरूषसूक्ताचे आवर्तन करून अभिषेक करण्यात आला. विधिवत पूजा करून श्रीराम लक्ष्मणास पुष्पहार अर्पण करून नैवेद्य दाखविण्यात आला.

अभिषेकानंतर सकाळी १०.३० ते १२.३० या वेळेत ह. भ. प. सौ. सुजाता दत्तप्रसाद शहाणे यांचे सुश्राव्य कीर्तन आयोजित करण्यात आले. श्रीरामायणातील अनेक दाखले देऊन त्यांनी श्रीरामाच्या विविध गुणांची माहिती आश्रमीय विद्यार्थ्यांना सांगितली. सर्वगुण संपन्न, सकलगुणनिधान श्रीरामाच्या गुणांचे आपण सर्वांनी व्यवहारात आचरण करणे गरजेचे आहे. चैत्र शुध्द नवमी रोजी अयोध्या नगरी सजली होती. सकाळपासूनच प्रत्येकाचे घरी गुढी, तोरणे उभारण्यात आली होती. माध्यानीही सूर्य क्षणभर थांबला. वाद्यांच्या घोषांनी आसमंत दुमदुमला व सर्वत्र एकच नाद घुमला, 'राम जन्मला ग सखे राम जन्मला'. श्रीराम जन्माचा सोहळा मोठ्या आनंददायी, भक्तीपूर्ण व उत्साही वातावरणात संपन्न झाला. पुरुषोत्तम श्रीराम या विषयावर कीर्तनाद्वारे आपले विचार प्रगट करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. यानंतर श्रीरामाची आरती करून सर्वांना तीर्थ व सुंठवडा प्रसादाचे वाटप करण्यात आले.

ह. भ. प. सौ. सुजाता दत्तप्रसाद शहाणे यांना कीर्तनात तबल्याची साथ श्री. नंदकुमार भांडवलकर यांनी तसेच हार्मोनियमची साथ श्री. दत्तप्रसाद शहाणे यांनी केली.

संस्थेचे उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांच्या हस्ते ह. भ. प. सौ. सुजाता शहाणे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. संचालक श्री. आनंद कुलकर्णी यांच्या हस्ते श्री. नंदकुमार भांडवलकर यांचा सत्कार पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. तसेच संचालक श्री. सुनील रेडेकर यांच्या हस्ते श्री. दत्तप्रसाद शहाणे यांचा सत्कार पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.

या रामजन्मोत्सव प्रसंगी संस्थेचे देणगीदार, माजी विद्यार्थी, संस्था पदाधिकारी, संचालक, विविध विभागातील प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, आश्रमस्थ विद्यार्थी व परिसरातील श्रीरामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी यांनी कीर्तनाचार्य ह. भ. प. सौ. सुजाता दत्तप्रसाद शहाणे व त्यांना साथ संगत करणारे श्री. नंदकुमार भांडवलकर व श्री. दत्तप्रसाद शहाणे यांचा परिचय करून दिला. त्याचबरोबर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सर्व रामभक्तांचे स्वागत केले. ***

# मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९

**उपकार्याध्यक्ष : श्री. एस. एम. जिर्गे**
**संचालक : श्री. आनंद कुलकर्णी**
**प्राचार्य : सौ. जयती नरवणे**
**मुख्याध्यापिका : सौ. रेखा बाली**

## पूर्व प्राथमिक विभाग

### ओपन डे

शनिवार दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी ओपन डे चे आयोजन केले होते. मोठ्या गटासाठी १०.३० ते ११.३० या वेळेत तर शिशु व छोट्या गटासाठी १२.१५ ते १.१५ या वेळेत शिक्षकांनी घटक चाचणीच्या उत्तर पत्रिका पालकांना दिल्या. पुढे होणाऱ्या वार्षिक परीक्षेबद्दल त्यांनी पालकांना मार्गदर्शनसुद्धा केले. या वेळी पालकांनी विचारलेल्या शंकांचे निरसन करण्यात आले.

## प्राथमिक विभाग

### उत्तरपत्रिका वाटप

शनिवार दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी इ. १ली ते ६वीसाठी पालक शिक्षक सभा व घटक चाचणी द्वितीय परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसंबंधी पालकांना मार्गदर्शन केले.

### चित्रपट निर्मिती सत्र

शनिवार दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी प्रशालेच्या आणि स्टार्ट ज्युनिअर यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी श्री. राहुल पोखरकर यांचे चित्रपट निर्मितीचे मार्गदर्शनपर सत्र आयोजित करण्यात आले होते. या माहितीपर सत्रामध्ये पालक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.

### कळी उमलताना

मंगळवार दि.  ३ फेब्रुवारी २०२६ रोजी इ. ५वी व ६वीच्या विद्यार्थिनींसाठी 'कळी उमलताना' हा किशोरवयीन विद्यार्थिनींसाठी जागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात मुलींमधील किशोरवयीन टप्प्यात होणारे शारीरिक व भावनिक बदल याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

### अवकाश निरीक्षण उपक्रम

इ. १ली ते ६वीच्या विद्यार्थ्यांसाठी अवकाश निरीक्षण उपक्रम आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी अतिशय आनंदाने व उत्स्फूर्तपणे आकाश व नक्षत्रांच्या निरीक्षणाचा आनंद लुटला.

### नेचर ट्रेल ॲक्टिव्हिटी

शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी इ. २री आणि ३रीच्या कब आणि बुलबुल विद्यार्थ्यांसाठी 'नेचर ट्रेल ॲक्टिव्हिटी' आयोजित केली होती. हा कार्यक्रम कमला नेहरू पार्क येथे आयोजित करण्यात आला होता, तेथे विद्यार्थ्यांनी निसर्गाच्या सान्निध्यात एक शैक्षणिक सहल अनुभवली. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कब मास्टर आणि फ्लॉक लीडर्ससह आजूबाजूच्या परिसराचा शोध घेतला. ट्रेल दरम्यान, त्यांना विविध झाडे, वनस्पतींबद्दल मनोरंजक व उपयुक्त माहिती मिळाली. त्यांच्या शिक्षक आणि लीडर्सच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी साधे रोड मॅप्स वाचण्याचा आणि सूचनांचे पालन करण्याचा सराव देखील केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणीय जागरूकता निर्माण झाली.

### शिवजयंती उत्सव

मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी शिवजयंती निमित्त किल्ले रंगसंगती स्पर्धा आयोजित केली होती. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी सिंहगड, दौलताबाद, प्रतापगड, जंजिरा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग या किल्ल्यांना आकर्षक रंगसंगतीने रंगवले. शिवजयंतीच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन आणि विचारसरणी याबद्दल देखील माहिती देण्यात आली.

### अभिनंदनीय

सोमवार दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्र मंडळाने सी.ए.सी.पी.ई. मैदानावर प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी आंतरशालेय क्रीडा स्पर्धा

आयोजित केली होती. या स्पर्धेत शाळेने उपविजेतेपद पटकावले. क्रीडा स्पर्धेतील विजयी विद्यार्थ्यांची नावे

| स्पर्धा | विद्यार्थ्याचे नाव | पदक |
|---|---|---|
| लांब उडी | कु. आरुष पायगुडे | सुवर्ण |
| | कु. साक्षी यादव | रौप्य |
| | कु. विश्वजित जगदाळे | कांस्य |
| | कु. वरद खाडे | कांस्य |
| | कु. ऋग्वेद भोपटे | कांस्य |
| रनिंग | | |
| १०० मीटर | कु. स्पृहा पवार | सुवर्ण |
| ८० मीटर | कु. विश्वजित जगदाळे | रौप्य |
| ५० मीटर | कु. ईशान गणेश नेर्लेकर | कांस्य |
| रिले शर्यत | कु. युगांत घोणे | रौप्य |
| | कु. ईशान नेर्लेकर | |
| | कु. आरुष पायगुडे | |
| | कु. श्रीनिवास भोत्रेया | |

**मराठी भाषा ऑलिंपियाड २०२५-२६**

इ. २री ते ६वीच्या विद्यार्थ्यांसाठी दि. ९ नोव्हेंबर २०२६ या दिवशी मराठी भाषा ऑलिंपियाड स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये एकूण ५५ मुले सहभागी झाली होती. इ. ५वी व ६वीतील एकूण पंधरा मुले प्रज्ञाशोध परीक्षेसाठी पात्र ठरली.

**माध्यमिक विभाग**

**नेताजी सुभाष चंद्र बोस आणि रमाबाई रानडे जयंती साजरी**

दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी शालेय परिपाठात नेताजी सुभाष चंद्र बोस आणि रमाबाई रानडे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थी कु. योगीश निंबाळकर, इ. ८ वी ड याने नेताजी सुभाष चंद्रबोस आणि विद्यार्थिनी कु. रेवा कुलकर्णी इ. ७ वी क हिने रमाबाई रानडे यांची वेशभूषा करून त्यांच्या विषयी माहिती सांगितली.

**इ.१०वी निरोप समारंभ**

दि. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी इ. १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्राचार्य सौ. सुप्रिया देशकुलकर्णी यांनी १० वीच्या विद्यार्थ्यांना एस. एस. सी. बोर्ड परीक्षेसाठी सूचना दिल्या. शिक्षिका सौ. गौरी राजगुरू यांनी 'दहावीला सामोरे जाताना' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थी प्रतिनिधी कु. इरा सरडे १० वी अ, कु. श्रेया उरसळ १० वी ब, कु. सार्थक कांबळे १० वी क, कु. इरा जोशी १० वी ड, कु. जान्हवी साखरे १० वी इ या विद्यार्थ्यांनी शाळेविषयी व शिक्षकांबद्दलची आपली मनोगते व्यक्त केली. यावर्षी 'स्वच्छ वर्ग' स्पर्धेच्या विजेतेपदाचा चषक इ. १०वी अ, या वर्गाला मिळाला. या वर्गाला वर्गशिक्षिका सौ. प्राची कोल्हटकर यांचे मार्गदर्शन लाभले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. स्वाती पाठक यांनी केले.

दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी यांचा 'परीक्षा पे चर्चा २०२६' हा संवादात्मक कार्यक्रम ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर प्रक्षेपित करण्यात आला. इ. ७ वी ते ९ वीचे सर्व विद्यार्थी ऑनलाईन पद्धतीने या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी इ. ८वीच्या विज्ञान क्लब च्या विद्यार्थ्यांसाठी एक उपक्रम राबवण्यात आला. यावेळी या विद्यार्थ्यांनी शाळेच्या भौतिक, रसायन आणि जीवशास्त्र प्रयोगशाळांना भेट दिली. शिक्षिका सौ. संगीता भुकन आणि सौ. इंद्रायणी आपटे यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रयोग समजावून सांगितले आणि प्रात्यक्षिकेही दाखवली.

**ओपन डे**

दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी इ. ७ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना दुसऱ्या घटक चाचणीच्या उत्तरपत्रिका दाखवण्यात आल्या. तसेच शिक्षकांकडून त्यांच्या शंकांचे निरसन करून योग्य मार्गदर्शन करण्यात आले. दि. १४ आणि १५ फेब्रुवारी २०२६ रोजी इ. ५ वी ते ८वीच्या

विद्यार्थ्यांसाठी हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा शाळेमध्ये घेण्यात आली.

दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी मिलेनियम स्कूल, कर्वेनगर, पुणे येथे रोटरी युथ लीडरशिप अवॉर्ड हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी इंटरॅक्ट क्लबचे इ. ८ आणि ९ वीचे १० विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी झाले होते. यावेळी 'क्रीडा क्षेत्रातील करियर' या विषयावर त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

**शिवजयंती**

दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी शिवजन्मोत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरूवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूजनाने झाली. त्यानंतर संगीत शिक्षिका कु. वैष्णवी उदावंत यांनी बाल शिवाजीचा पाळणा गायला. कु. ईश्वरी पवार व कु. स्नेहा नाईक या इ.७ वीच्या विद्यार्थिनींनी लाठीकाठी व तलवारबाजी यांचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांसमोर सादर केले. संगीत विभागातील मुलांनी पोवाडा सादर केला. शिक्षिका सौ. मोहना बाभळे-नातू यांनी छत्रपती शिवाजी महाराज व समर्थ रामदास यांच्यावर अतिशय सुंदर निरूपण करून कीर्तन सादर केले. या अनोख्या कीर्तनाला मुलांनी व त्याचबरोबर शाळेतील शिक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. श्रद्धा लाळे यांनी केले.

दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी इ. ७ वीच्या नेचर क्लबच्या विद्यार्थ्यांना विठ्ठलवाडी येथील मुठा नदीजवळ 'रिव्हरवॉक' साठी नेण्यात आले. यावेळी मुठा नदीच्या उत्पत्ती आणि इतिहासाची ओळख होण्यासाठी विद्यार्थ्यांनी नदीकाठच्या वनस्पती आणि प्राण्यांचा शोध घेतला. 'जीवित नदी फाउंडेशन' या स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने हा उपक्रम घेण्यात आला होता. याच संस्थेच्या समन्वयिका सौ. अश्विनी भिलारे व श्रीमती अर्चना मिराशी यांनी नैसर्गिक संसाधनांच्या दैनंदिन वापराबाबत काळजी घेण्याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

***

*** सिंधुताई त्र्यंबक केंघे मुलींचे वसतिगृह, सदाशिव पेठ, पुणे ३० ***



महिला दिनाचे औचित्य साधून दि. १४ मार्च २०२६ रोजी
'शिस्त, नियोजन, संस्कार, चारित्र्य व शिक्षण हीच यशस्वी जीवनाची पंचसूत्री' या विषयावर
सौ. मनीषा नाईक (प्र. मुख्याध्यापिका, मुक्तांगण इंग्लिश स्कूल सदाशिव पेठ शाखा)
यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.
याप्रसंगी उपस्थित संचालक श्री. कृष्णाजी कुलकर्णी, व्याख्यात्या सौ. मनीषा नाईक,
वसतिगृहाच्या रेक्टर सौ. सुष्मीता बागाईतकर आणि उपस्थित विद्यार्थिनी

# कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, टेक्नॉलॉजी आणि मॅनेजमेंट, पुणे ९

**संचालक : श्री. सुनील रेडेकर**

**संचालक : प्रा. राजेंद्र गो. कडुसकर**

**प्र. प्राचार्य : डॉ. मनोज तारांबळे**

## ई अ‍ॅण्ड टी सी इंजिनिअरिंग विभाग

### ६ वी आंतरराष्ट्रीय परिषद Gender Equality and Women Empowerment (ICGEWE-2026)

दि. ८ व ९ मार्च २०२६ रोजी महाविद्यालयामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहकार्याने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त ही परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत लैंगिक समानता, महिला सशक्तीकरण आणि सामाजिक विकास या विषयांवर संशोधक व विद्यार्थ्यांना विचार मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. या परिषदेसाठी डॉ. पराग काळकर (प्रो-व्हाइस चॅन्सेलर), संचालक श्री. सुनील रेडेकर आणि प्रा. राजेंद्र कडुसकर यांचे मार्गदर्शन लाभले. संयोजक डॉ. प्रसन्न शेटे, सह-संयोजक डॉ. गीता शिंदे, समन्वयक डॉ. योगेश ठाकरे, सह-समन्वयक प्रा. संगीता बावकर आणि प्रा. उषा वालके होते. मुख्य पाहुणे डॉ. पराग काळकर यांनी आपल्या भाषणात लैंगिक समानता आणि महिला सशक्तीकरणाचे समाजाच्या शाश्वत विकासातील महत्त्व अधोरेखित केले. या परिषदेत डॉ. रत्नमाला आर्य, सौ. गौतमी भोर आणि श्री. विनोद बोधणकर यांनी प्रमुख भाषणे देऊन महिला सशक्तीकरण, शिक्षण, शाश्वत विकास आणि सामाजिक परिवर्तन याविषयी महत्त्वपूर्ण विचार मांडले. परिषदेत ४५ संशोधन पेपर सादर झाले. उत्कृष्ट संशोधन पेपरला पुरस्कार देण्यात आले. या परिषदेमुळे लैंगिक समानता व महिला सशक्तीकरणाबाबत जागरूकता आणि संशोधनाला प्रोत्साहन मिळाले.

**अभिनंदनीय**

✼ PVG Outliers या विद्यार्थ्यांच्या टीमने KPIT Sparkle Innovation Competition मध्ये तृतीय क्रमांक मिळवून रु. ३,००,०००/- चे पारितोषिक जिंकले आहे. या टीममध्ये तृतीय वर्षातील कु. यश सोळंकी, कु. हेमिल शाह, कु. श्रावणी ढेंबरे आणि कु. सानवी सोनवणे यांचा समावेश आहे. या प्रकल्पासाठी डॉ. शिल्पा लिटके यांचे मार्गदर्शन लाभले.

✼ द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी APCOER, पुणे आयोजित SPARKTECH 2K26 स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले. Clues to Circuit या स्पर्धेत कु. निशा गायकवाड, कु. निशिकांत गरगटे आणि कु. मैथिली बिराजदार या विद्यार्थ्यांच्या टीमने प्रथम क्रमांक पटकावला. तसेच कु. ममता कुमदले, कु. ओम धाने आणि कु. आदिल नलबंद या टीमने तृतीय क्रमांक मिळवला. पेपर प्रेझेंटेशन स्पर्धेत कु. जिया शेख, कु. वैशाली वारे, कु. प्राची घारगे आणि कु. श्रावणी थोरात यांच्या टीमने द्वितीय क्रमांक मिळवला. याशिवाय कु. ओम धाने, कु. निशिकांत गरगटे, कु. निरंजन शिंदे आणि कु. सोहम जाधव यांच्या टीमने तृतीय क्रमांक मिळवला.

विद्यार्थ्यांच्या या यशामुळे संस्थेचा गौरव वाढला असून त्यांच्या तांत्रिक कौशल्य, परिश्रम आणि संघभावनेचे हे उत्तम उदाहरण आहे.

Mastering Machine Learning with MATLAB या विषयावर कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेच्या समन्वयिका कु. निकिता डी. चौधरी होत्या. तांत्रिक तज्ज्ञ डॉ. प्रीतेश शाह यांनी मशीन लर्निंग संकल्पना व MATLAB मधील प्रत्यक्ष अंमलबजावणी याबाबत मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत आपल्या महाविद्यालयातील आणि इतर महाविद्यालयातील एकूण ३८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सत्रामध्ये डेटा विश्लेषण, मॉडेल तयार करणे आणि मशीन लर्निंगच्या प्रत्यक्ष अनुप्रयोगांवर भर देण्यात आला. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांचे तांत्रिक ज्ञान व समस्या सोडवण्याची क्षमता वाढली.

डॉ. माधवी बेलसरे यांनी 'जेंडर इक्विटी इसेंशियल फॉर सस्टेनेबल फ्यूचर' या विषयावर 'इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन जेंडर इक्वॅलिटी अँड विमेन एम्पॉवरमेंट - २०२६' मध्ये संशोधन प्रबंध सादर केला. हा संशोधन प्रबंध मार्च २०२६ मध्ये 'स्कोप्स् इंडेक्स्ड इंटरनॅशनल जर्नल ऑफ ह्युमॅनिटीज एज्युकेशन' मध्ये प्रकाशित झाला.

श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे आयोजित Ideathon मध्ये Techocore टीमने सहभाग घेतला. या टीममध्ये कु. विवेक सरोदे, कु. ओंकार शिंदे, कु. पुष्कर शिंगाटे आणि कु. वैष्णवी कर्वे यांचा समावेश होता. या टीमची स्तर १ आणि स्तर २ साठी निवड झाली. या टीमने 'DetachX Car' हा अभिनव प्रकल्प सादर केला. ही स्मार्ट मॉड्युलर कार आहे, ज्यात मॅग्नेटिक डिटॅचेबल मोटर मॉड्युल्स, कॉपर इलेक्ट्रिकल कनेक्शन, ESP३२ कंट्रोलर आणि ऑब्स्टॅकल डिटेक्शन यांचा समावेश आहे. प्रोटोटाइपमध्ये अल्ट्रासोनिक क्यूब, IR सेन्सर क्यूब यांसारख्या डिटॅचेबल मॉड्युल्सनुसार कारचे स्वयंचलित वर्तन बदलते; तसेच ब्लूटूथद्वारे मॅन्युअल कंट्रोल देखील शक्य आहे.

**इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी विभाग**

❊ एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) वाहनांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सक्रिय सस्पेंशन आणि चाकांच्या भूमिती नियंत्रणाची प्रणाली' या शीर्षकाचे पेटंट-प्रकाशन क्रमांक : IN२०२५२११३३३०३ A१ खालील व्यक्तींनी प्रकाशित केले आहे.

प्रा. नीता सुनील शिरसाट, प्रा. शुभांगी आनंद देशपांडे, कु. शिवराज महेश शेलार, कु. हरीश महेश ठाकरे व कु. मुग्धा बाळासाहेब चौधरी (अंतिम वर्ष इन्फर्मेशन टेक्नालॉजी)

सध्याचे हे प्रकटीकरण वाहनासाठीच्या, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित अशा एका सक्रिय सस्पेंशन आणि भूमिती नियंत्रण प्रणालीशी (१००) संबंधित आहे. ही प्रणाली प्रवासातील आराम, स्थिरता आणि सुरक्षितता सुधारण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आली आहे.

❊ तृतीय वर्षाचा विद्यार्थी कु. प्रणव इजंतकर याने, डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे यांनी आयोजित केलेल्या Algo Heist DSA Coding Competition मध्ये सहभाग घेतला. या स्पर्धेत सुमारे ८० संघांनी भाग घेतला होता आणि प्रणवने दुसऱ्या फेरीसाठी यशस्वीरित्या पात्रता मिळवली. अंतिम फेरीत, त्याने एकूण क्रमवारीत ६ वा क्रमांक पटकावला; तसेच प्रमाणपत्रे आणि बक्षिसे मिळवणाऱ्या अव्वल ८ संघांमध्ये समावेश झाला.

❊ GEN AI हॅकॅथॉन २०२६ आणि Sparktech 2k26 आंतरराष्ट्रीय परिषद दि. ५ व ६ मार्च २०२६ रोजी अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अंतर्गत डॉक्युमेंट इंटेलिजन्स ट्रॅक अंतर्गत आयोजित केली गेली. विद्यार्थ्यांसाठी नवकल्पनात्मक - AI आधारित उपाय विकसित करण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करते. आव्हान हे असे होते की एक सिस्टम तयार करायची जी हस्तलिखित पीडीएफ नोट्स वाचू शकेल आणि फक्त दिलेल्या मजकुरावर आधारित प्रश्नांचे अचूक उत्तर देऊ शकेल.

६ तासांच्या वेळेत, संघांनी वैयक्तिक अभ्यास सहाय्यकासारखी सिस्टम तयार करण्यासाठी काम केले. Python, OCR, आणि Retrieval-Augmented Generation (RAG) सारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून माहिती काढणे, प्रक्रिया करणे आणि योग्य संदर्भांसह पुनर्प्राप्तकरणे हे केले.

संघामध्ये द्वितीय वर्षातील कु. श्रीधर काचरे, कु. गणेश देशमुख, कु. सोहम कांगले, कु. अनिकेत पाटील, आणि कु. कार्तिक माधुकर यांचा समावेश असून, त्यांनी एक कार्यशील मॉडेल यशस्वीरित्या विकसित केले. अस्पष्ट हस्तलेखन आणि वेळेच्या मर्यादेसारख्या अडचणी असूनही, संघाने मजबूत समन्वय आणि समस्या सोडवण्याच्या कौशल्याचे प्रदर्शन केले. विद्यार्थ्यांना सहभागी होण्याचे प्रमाणपत्र मिळाले.

**मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग**

### मुक्तांगण इंग्लिश स्कूल मधील विद्यार्थ्यांसाठी रोबोट प्रोग्रामिंगचे प्रात्यक्षिक

दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी रोबोटिक्स अँड ऑटोमेशन प्रयोगशाळेत मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ विद्यालयातील इ. ११ वी (सीएस शाखा) च्या विद्यार्थ्यांसाठी रोबोट प्रोग्रामिंगचे प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले. या प्रात्यक्षिकामध्ये KUKA रोबोटची कार्यपद्धती, मूलभूत तत्त्वे तसेच प्रोग्रामिंगची माहिती विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली. तसेच, विद्यार्थ्यांनी प्रॉब्लेम बेस्ड लर्निंग अंतर्गत तयार केलेल्या मॉडेलचे प्रात्यक्षिक रोबोटिक्स क्लबच्या सदस्यांनी सादर केले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या प्रयोगशाळेचे आयोजन डॉ. पी. जी. कुलकर्णी आणि डॉ. अमी बारोट यांनी केले.

### टीम कॉन्क्विस्टाडोरची BAJA SAEINDIA २०२६ स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी

टीम कॉन्क्विस्टाडोरने **BAJA SAEINDIA २०२६** या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ही स्पर्धा दि. २५ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ दरम्यान तेलंगणा राज्यातील नरसापूर येथील BVRIT येथे पार पडली. देशभरातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या संघांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला होता. स्पर्धेतील स्टॅटिक / व्हर्च्युअल विभागात टीम कॉन्क्विस्टाडोरने डिझाईन स्पर्धेत अखिल भारतीय स्तरावर ८वा क्रमांक, मॅन्युफॅक्चरिंग एक्सलन्समध्ये १३ वा क्रमांक, कॉस्ट इव्हेंटमध्ये १७ वा क्रमांक तर सेल्स इव्हेंटमध्ये २५ वा क्रमांक मिळविला. तसेच डायनॅमिक विभागात संघाने सस्पेन्शन अँड ट्रॅक्शनमध्ये अखिल भारतीय स्तरावर ४ था क्रमांक, ॲक्सेलरेशनमध्ये ५ वा क्रमांक, स्लेड पुलमध्ये ५ वा क्रमांक, मॅन्युव्हरॅबिलिटीमध्ये १९ वा क्रमांक तर एंड्युरन्स रेसमध्ये २४ वा क्रमांक मिळवत उल्लेखनीय कामगिरी नोंदविली. या यशामागे संघाच्या सदस्यांचे परिश्रम, तांत्रिक कौशल्य आणि सातत्यपूर्ण सराव यांचा मोठा वाटा असून या कामगिरीमुळे संस्थेचा मान उंचावला आहे.

### DAUS २०२६ आंतरराष्ट्रीय परिषदेत अभिनव UAV संशोधनासाठी विद्यार्थ्याचा गौरव

अंतिम वर्षाचा विद्यार्थी कु. आर्यन मकरंद सिरसावकर याने DAUS 2026 (Drones and Unmanned Systems) या आंतरराष्ट्रीय परिषदेत संस्थेचे प्रतिनिधित्व करत उल्लेखनीय कामगिरी नोंदविली. ही परिषद दि. २५ ते २७ फेब्रुवारी दरम्यान साल्झबर्ग येथे पार पडली. या परिषदेत कु. आर्यन सिरसावकर याने 'Autonomous UAVs for Disaster Response: Terrain-Aware Target Detection and Payload Delivery' या विषयावरील संशोधन निबंध प्रमुख लेखक म्हणून सादर केला. या संशोधन निबंधासाठी कु. मुजम्मिल शेख, कु. अनुज काळे, कु. अभिजीत थोरे आणि कु. मयूर पाटील यांनी सहलेखक म्हणून सहभाग नोंदविला. या अभिनव संशोधन कार्यामुळे विद्यार्थ्यांचा तसेच संस्थेचा गौरव वाढला असून आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात मानवरहित विमान (UAV) तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरासाठी या संशोधनाची महत्त्वपूर्ण भूमिका ठरणार आहे.

### बौद्धिक संपदा विषयावर मार्गदर्शन सत्राचे आयोजन

दि. २० मार्च २०२६ रोजी 'Intellectual Property: Ideation to Grant & Commercialization – Road Map' या विषयावर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्राचा उद्देश प्राध्यापकांमध्ये बौद्धिक संपदा हक्क, पेटंट प्रक्रिया तसेच नवकल्पनांचे व्यापारीकरण याबाबत सखोल समज निर्माण करणे हा होता. या सत्रासाठी Zestrics Consulting Pvt. Ltd. चे Founder & Head – Research and Technology Consulting श्री. श्रीनिवासन मोहनदास हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे समन्वयन प्रा. डॉ. एन. जी. जयस्वाल यांनी केले.

### आयआयटी मंडी येथे प्राध्यापकांचा मालवीय मिशन प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग

मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागातील प्रा. संकेत एस. चिक्शे यांनी हिमाचल प्रदेशातील आयआयटी मंडी येथे आयोजित प्रतिष्ठित मालवीय मिशन टीचर ट्रेनिंग प्रोग्राममध्ये सहभाग नोंदविला. हा प्रशिक्षण कार्यक्रम दि. ९ ते १४ मार्च २०२६ या कालावधीत पार पडला. या कार्यक्रमामध्ये 'Design Thinking & Product Development Methodologies using Additive Manufacturing Processes' या विषयावर सखोल प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणादरम्यान मेटल ३डी प्रिंटिंग तसेच बायोमेडिकल प्रिंटिंग या अत्याधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये प्रगत ज्ञान देण्यात आले. यामध्ये विशेषतः कृत्रिम अवयव, इम्प्लांट्स, तसेच हाडे व सांधे प्रिंटिंग यांसारख्या महत्त्वाच्या विषयांचा समावेश होता. या प्रशिक्षणामुळे प्रा. चिक्शे यांनी अत्याधुनिक उत्पादन तंत्रज्ञानातील ज्ञान आत्मसात केले असून याचा विद्यार्थ्यांना व संशोधन कार्याला मोठा लाभ होणार आहे.

### आर्टिफिशियल इंटेलिजन्स ॲण्ड डेटा सायन्स

❊ दि. १६ व १७ मार्च २०२६ रोजी, ख्रिस्त कॉलेज, पुणे तर्फे आयोजित 'ख्रिसलिगा २०२६' मध्ये महाविद्यालयाच्या क्रिकेट संघाने उपविजेतेपद पटकावले. या संघाला रोख रु. ३,०००/- आणि करंडक मिळाला. या संघामध्ये कु. अजिंक्य आशिष मोहरीर आणि कु. तेजस मयुरेश रेथरेकर या विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

❊ डॉ. रवींद्र सदाशिवराव आपरे यांनी ICIA-MET 26 International Conference on Innovative Approaches in Multiciliary Engineering and Technology या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये Adaptive BNPL with AI या विषयावर आपला संशोधन पेपर सादर केला, ज्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने BNPL (Buy Now Pay Later) प्रणाली अधिक प्रभावी आणि अनुकूल कशी करता येईल यावर प्रकाश टाकण्यात आला. ही परिषद दि. १३ ते १५ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली होती.

❊ विभागातील विद्यार्थ्यांनी VOIS Innovation Marathon **2.0 (2026)** मध्ये उत्कृष्ट कामगिरी करत प्रत्येकी रु. २ लाखांचे पारितोषिक जिंकले. Edunet Foundation आयोजित या राष्ट्रीय स्तरावरील हॅकाथॉनमध्ये विद्यार्थ्यांनी सादर केलेले ByteMinds (Team Members) : कु. दिव्या चौधरी (टीम लीड), कु. क्षितिजा घन, कु. तनिष्का शेटकर व Tech Mirage (Team Members) : कु. सोहम मुळे (टीम लीड), कु. आदित्य टिळेकर, कु. कोमल यांचे हे प्रकल्प त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पना आणि प्रत्यक्ष उपयोगितेमुळे परीक्षकांकडून विशेष कौतुकास पात्र ठरले. या विद्यार्थ्यांना विभाग प्रमुख डॉ. मीनाक्षी अत्रे यांचे मार्गदर्शन लाभले.

❊ विभागाने शैक्षणिक वर्ष २०२५ -२६ मध्ये कलासंग्राम ट्रॉफी पटकावून अभिमानास्पद यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट कला व सांस्कृतिक कामगिरीमुळे हा मान विभागाला मिळाला. ही ट्रॉफी विभागाच्या एकजुटीचे व मेहनतीचे प्रतीक आहे.

❊ NDLI Club अंतर्गत Agentic AI Hands-on Session दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आले. हा कार्यक्रम National Digital Library of India (NDLI) यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता. सत्रामध्ये दोन मान्यवर तज्ज्ञ श्री. कबीर मर्चंट आणि श्री. सार्थक करंदीकर यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी Agentic AI या विषयावर सविस्तर माहिती देत आधुनिक फ्रेमवर्क आणि टूल्सचा वापर करून Autonomous AI agents कसे तयार करायचे याचे live coding demonstration सादर केले.

❊ दि. २१ व २२ फेब्रुवारी २०२६ रोजी पुणे येथील AISSMS IOIT येथे आयोजित Innovate You National Level Techathon 3.0 (2026) तृतीय वर्षाच्या टीमला बेस्ट सोल्युशन ॲवॉर्ड मिळाले. इनोव्हेशन फाउंडेशनद्वारे आयोजित हा टेकाथॉन

पुण्यातील सर्वात मोठ्या हॅकाथॉनपैकी एक होता. टीम सदस्य : कु. दिवेश आडिवरेकर (टीम लीड), कु. प्रणव गुगळे, कु. समर्थ सांगोलगी आणि ४. रोहन गोर्डे. विभागप्रमुख डॉ. मिनाक्षी अत्रे व प्रा. रवींद्र मुळे यांचे मार्गदर्शन या यशात अत्यंत महत्त्वाचे ठरले.

❋ डॉ. रवींद्र सदाशिवराव आपरे यांनी दि. १२ ते १४ फेब्रुवारी २०२६ रोजी डीईएस पुणे विद्यापीठाच्या अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान स्कूलने आयोजित केलेल्या the International Conference on Emerging Technologies and Future Innovations (ETFI-2026) परिषदेत रिव्ह्यूवर म्हणून काम केले.

❋ डॉ. रवींद्र सदाशिवराव आपरे यांनी Cluster Computing, on "Impact Factor-Based Improved Association Rule Mining-Based Privacy Protection Model with Hybrid Optimal Key Generation for IoT" या विषयावर पेपर प्रसिध्द केला.

९. डॉ. रवींद्र सदाशिवराव आपरे यांनी Advanced Manufacturing Systems या जर्नल मध्ये Self-adaptive White Shark Multi-Objective Optimization Approach with Mutual Information Based Knowledge Search for Reconfigurable Manufacturing Systems हा पेपर प्रकाशित केला.

## इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग

❋ दि. २० मार्च २०२६ रोजी अंतिम वर्ष विद्युत विभागातील विद्यार्थ्यांच्या प्रोजेक्ट्सचे मूल्यमापन उद्योग विश्वातील तज्ज्ञांकडून करवून घेण्यात आले. विभागाचे माजी विद्यार्थी मंदार दहिगावकर (अमी असोसिएट्स), प्रतीक मानभेकर (इटन इंडिया), सिद्धोजी सावंत (दसो सिस्टिम्स) आणि कल्याणी पॉवर ट्रेन मधील श्री. अमित दरवडे यांनी मुलांना मार्गदर्शन केले.

❋ द्वितीय वर्ष विद्युत अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी दि. २७ व २८ फेब्रुवारी २०२६ रोजी ऑटोकॅड या सॉफ्टवेअरची प्रात्यक्षिक कार्यशाळा घेण्यात आली. अंतिम वर्षातील विद्यार्थी कु. पुष्पराज पाटील, कु. प्रभाकर भोसले आणि कु. आदित्य कांबळे यांनी विद्युत विषयाशी संबंधित वेगवेगळी आरेखने विद्यार्थ्यांकडून करवून घेतली. EESA तर्फे या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. सुरेश यमला व डॉ. मंदार भवाळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

❋ तृतीय वर्ष विद्युत अभियांत्रिकी मधील सुदर्शन बांगर यांनी रविवार, २२ फेब्रुवारी २०२६ रोजी पुण्यातील लोकमत महा मॅरेथॉन (२१ किमी, वेळ: १ तास ४३ मिनिटे, स्थळ : सावित्रीबाई फुले पुणे युनिर्व्हसिटी, पुणे) पूर्ण केली आणि टॉप ५० फिनिशर्समध्ये स्थान मिळवले.

## प्रिंटिंग ॲण्ड पॅकेजिंग इंजिनिअरिंग विभाग

❋ दि. २६ फेब्रुवारी २०२६ ते २२ मार्च २०२६ या कालावधीत विविध शैक्षणिक व विकासात्मक उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात आले. Melange २३, HOPE २५ आणि टाइम टेम्परेचर इंडिकेटर (TTI) हे प्रोजेक्ट नॅशनल अवॉर्डस इन एक्सलन्स ऑफ प्रिंट NAEP पुरस्कारांसाठी सादर करण्यात आले.

❋ दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रो. मधुरा महाजन यांनी, AVINUTY कोइंबतूर परिषदेत संशोधन पेपर सादर केला. प्रात्यक्षिक सुविधांना बळकटी देण्यासाठी फ्लेक्सोग्राफी लॅब मध्ये फ्लेक्सो प्लेट मेकर स्थापित करण्यात आला. TSHE, श्रीलंका सोबत शैक्षणिक आराखडा व भविष्यातील सहकार्य यावर चर्चा करण्यासाठी बैठक घेण्यात आली.

❋ माजी विद्यार्थी श्री. करण विधाते यांनी तृतीय व अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी मार्केटिंग क्षेत्रातील नोकरीच्या संधी व करिअर प्रगती यावर मार्गदर्शनपर व्याख्यान दिले, ज्यामध्ये ४० विद्यार्थी उपस्थित होते.

❋ दि. १७ मार्च २०२६ रोजी ७व्या प्रिंट ऑलिम्पियाड (पश्चिम विभाग) चा पहिला टप्पा आयोजित करण्यात आला, ज्यामध्ये ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. पश्चिम विभागाच्या कोऑर्डिनेटर प्रो.

श्रीकला कानडे आणि चीफ कोऑर्डिनेटर प्रो. मधुरा महाजन यांनी या टप्प्याचे नियोजन केले.

❋ प्रो. मधुरा महाजन यांनी पटना येथे दि. १८ ते २० मार्च २०२६ या कालावधीत AI and Robotics in Printing या परिषदेला उपस्थित राहून शैक्षणिक नेटवर्किंग व संस्थेची दृश्यमानता वाढविण्यास हातभार लावला.

❋ दि. २४ मार्च २०२६ रोजी 'वर्ल्ड पॅकेजिंग डे' निमित्त नॅशनल कॉन्फरन्स ऑन फूड पॅकेजिंग ३.० आयोजित करण्यात आली होती. १७५ विद्यार्थ्यांनी त्यात सहभाग घेतला प्रो. पद्मजा जोशी व प्रो. मधुरा महाजन यांनी या परिषदेचे आयोजन केले होते.

## फर्स्ट इयर इंजिनिअरिंग विभाग

NEP २०२० नुसार, सर्व ९ सह-अभ्यासक्रम बाह्य तज्ज्ञ आणि अंतर्गत सह-समन्वयक यांच्या मार्गदर्शनाखाली दर शनिवारी अत्यंत सुरळीतपणे चालवले जातात. हे सत्र विद्यार्थ्यांची कौशल्ये विकसित करण्यास मदत करतात.

## एमबीए विभाग

### विशेष भेट - AB-Normal Home, कोथरूड

दि. ५ मार्च २०२६ रोजी एमबीए विभागातील विद्यार्थ्यांनी AB-Normal Home, कोथरूड येथे भेट दिली. ही संस्था विशेष गरजा असलेल्या मुलांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत आहे. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी केवळ सामाजिक कार्य न करता, त्या मुलांसोबत क्रिएटिव्ह आर्ट्स मध्ये सहभाग घेतला तसेच त्यांच्या मल्लखांब, संगीत यांसारख्या क्षेत्रातील कौशल्यांचा अनुभव घेतला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनात बदल होऊन सहानुभूती आणि प्रत्येक व्यक्तिमधील विविध क्षमता ओळखण्याची जाणीव निर्माण झाली. या कार्यक्रमासाठी मा. किशोरीताई पाठक यांचे विशेष सहकार्य लाभले.

### मराठी भाषा दिन उत्साहात साजरा

दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी एमबीए विभागात मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. हा दिवस प्रख्यात कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. या कार्यक्रमाचा उद्देश मराठी भाषा व संस्कृतीचा जागर व संवर्धन करणे हा होता. विद्यार्थी कु. ओंकार महाजन, कु. ज्ञानेश्वर म्हेत्रे व कु. ओंकार सिंग यांनी 'ज्ञानेश्वरी' विषयावर आपले विचार मांडले व भक्ती, ज्ञान व सदाचाराचा संदेश स्पष्ट केला. कार्यक्रमातून 'जय मराठी, जय महाराष्ट्र' हा संदेश देत मराठी भाषेचा अभिमान जपण्याचे आवाहन करण्यात आले.

### पंजाब येथे औद्योगिक भेटीचे आयोजन

दि. १० ते १९ मार्च २०२६ पंजाब येथे औद्योगिक भेट आयोजित केली होती. या भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांना मीडिया, उद्योग व कृषी क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव देणे हा होता. भेट दिलेली ठिकाणे The Tribune (चंदीगड), Jaypee Group (चंदीगड), Agro Research Centre (कुल्लू) The Tribune : संपादकीय व प्रिंटिंग कामकाजाचा अभ्यास, नैतिक पत्रकारितेची माहिती - Jaypee Group : उद्योग व्यवस्थापन व वीज वितरण प्रणालीची माहिती - Agro Research Centre : आधुनिक शेती व लागवडीचा अभ्यास

विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांतील प्रत्यक्ष अनुभव मिळून त्यांचे संवाद, टीमवर्क व निरीक्षण कौशल्य वाढले तसेच करिअरविषयी जागरूकता व प्रेरणा मिळाली. एकूणच, हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व व व्यावसायिक विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरला.

## स्पोर्ट्स विभाग

❋ शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक डॉ. नामदेव बन्ने यांनी सहा आठवड्यांचा सायकलिंग खेळातील प्रशिक्षक प्रमाणपत्र अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केला. सदर कोर्स १९६१ मध्ये स्थापित, आशियातील सर्वात मोठी क्रीडा संस्था आणि भारतीय क्रीडा प्राधिकरण (SAI) अंतर्गत कार्यरत क्रीडा प्रशिक्षण, शिक्षण आणि

संशोधनासाठी एक प्रमुख केंद्र असणाऱ्या, नेताजी सुभाष नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स (NSNIS), पटियाला, पंजाब येथे आयोजण्यात आला होता. त्यात ४ आठवड्यांचे ऑनलाइन सिद्धांत आणि २ आठवड्यांचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण समाविष्ट होते.

❊ महाविद्यालयातील बॅडमिंटन संघाचे कर्णधार कु. अन्वी कोरे, (अंतिम वर्ष आर्टिफिशियल इंटेलिजन्स ॲण्ड डेटा सायन्स) आणि कु. सिद्धेय मसुरकर (तृतीय वर्ष इ ॲण्ड टी सी) यांनी सोमवार दि. ७ मार्च २०२६ रोजी आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आयोजित राज्यस्तरीय 'PACE २०२६' या क्रीडास्पर्धेमध्ये सहभागी होऊन, मिश्र दुहेरी प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला.

❊ महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने आंतरमहाविद्यालयीन मुलींच्या कबड्डी स्पर्धेमध्ये विजेतेपद आणि लेग क्रिकेट स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक प्राप्त करून रोख रक्कम रु. ४,०००/-, चषक आणि प्रमाणपत्र मिळविले. सदर स्पर्धेचे आयोजन पुणे केम्ब्रिज इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स, आंबेगाव, पुणे यांनी दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी केले होते.

❊❊❊

## ❊ मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९ ❊



दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. सुप्रिया देशकुलकर्णी यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत संस्था पदाधिकारी व संचालक

दि. १ मार्च २०२६ रोजी सौ. जयती नरवणे यांची माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका पदावर नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करताना संचालक श्री. आनंद कुलकर्णी





दि.१ मार्च २०२६ रोजी सौ. गौरी राजगुरू यांची माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करताना संचालक श्री. आनंद कुलकर्णी

# विद्याभवन–घाटकोपर, मुंबई शाखा
**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**विद्याभवन संकुल**

## पुणे विद्यार्थी गृह विद्याभवन, मुंबई शाखा सुवर्ण महोत्सवाचा प्रारंभ

बुधवार दि. ४ मार्च २०२६ रोजी विद्याभवन शालेय संकुलाच्या प्रशस्त प्रांगणात विद्याभवन प्रशालेचा सुवर्णमहोत्सव प्रारंभ सोहळा अत्यंत दिमाखात आणि उत्साहात संपन्न झाला.

बॉंबे कूनर्स या वाद्यवृंदातर्फे हिंदी, मराठी भाषेतील सुगम संगीत व चित्रपट गीते सादर करण्यात आली.

या प्रसंगी प्रमुख पाहुण्या मुंबई महानगरपालिका महापौर मा. श्रीमती रितू तावडे, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, विशेष अतिथी संस्थेचे माजी कार्याध्यक्ष श्री. कृष्णाजी शिरकांडे, संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात प्रमुख पाहुण्या मा. श्रीमती रितू तावडे, विशेष अतिथी श्री. कृष्णाजी शिरकांडे, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, संस्थेचे जेष्ठ माजी विद्यार्थी श्री. श्रीधर पाटणकर आणि इतर मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आली. माध्यमिक मराठी विभागाच्या विद्यार्थिनींनी आपल्या सुरेल आवाजात ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले.

महापौर मा. श्रीमती रितू तावडे यांचा सत्कार कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. तसेच विशेष अतिथी माजी कार्याध्यक्ष श्री. कृष्णाजी शिरकांडे यांचा सत्कार कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन करण्यात आला. व्यासपीठावरील इतर मान्यवर, निवृत्त मुख्याध्यापिका, समन्वयिका, माजी विद्यार्थी, हितचिंतक यांचाही शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

महापौर मा. श्रीमती रितू तावडे यांच्या हस्ते ५० व्या वर्षाच्या प्रवेशाचे प्रतीक असलेल्या विशेष लोगोचे अनावरण रोषणाई आणि फटाक्यांच्या आतषबाजीत करण्यात आले व ते मानचिन्ह महापौर मा. श्रीमती रितू तावडे यांना प्रदान करण्यात आले.

मा. श्रीमती रितू तावडे यांनी आपल्या मनोगतातून शहराच्या शैक्षणिक व सामाजिक विकासात संस्थेचे योगदान अधोरेखित केले. हा सोहळा केवळ वर्षारंभाचा कार्यक्रम नसून पाच दशाकांच्या कर्तृत्व, परंपरा आणि संस्काराचा उत्सव आहे. शिक्षण, संस्कार आणि गुणवत्ता यांचा त्रिवेणी संगम साधत पुढील अनेक दशकातही संस्था अशी प्रगतीची नवी शिखरे गाठेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. घाटकोपर परिसरात शिक्षणाचा आदर्श निर्माण करणारी संस्था म्हणून विद्याभवनकडे पाहिले जाते. सर्व स्तरांतली विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण आणि सुविधा देण्याचे संस्थेचे कार्य अत्यंत स्तुत्य आहे, असेही त्या म्हणाल्या.

कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी संस्थेच्या ४९ वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेऊन पुढील विकास आराखड्याची दिशा स्पष्ट केली. शाळेची शैक्षणिक गुणवत्ता, आधुनिक सुविधा, संस्कारप्रधान वातावरण यांचा त्यांनी विशेष उल्लेख केला.

संस्थेच्या ४९ वर्षांच्या प्रवासाचा अहवाल सादर करण्यात आला. चित्रफितीच्या माध्यमातून शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रातील कामगिरी, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, सुसज्ज प्रयोगशाळा, ग्रंथालय, क्रीडांगण तसेच सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारे उपक्रम याची माहिती देण्यात आली.

विशेष अतिथी माजी कार्याध्यक्ष श्री. कृष्णाजी शिरकांडे यांच्या सहचारिणी श्रीमती कल्पना शिरकांडे यांनी श्री. शिरकांडे सरांचे मनोगत वाचून दाखवले. त्यांच्या मनोगतातून संस्थेच्या कार्याबद्दल अभिमान व्यक्त केला आणि सर्वांना सुवर्णमहोत्सवाच्या वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मीनल भोळे यांनी ओघवत्या आणि प्रभावी शैलीत केले. प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार यांनी सर्व मान्यवर, माजी विद्यार्थी, शिक्षक, पालक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मन:पूर्वक आभार मानले. वंदे मातरम् ने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## विद्याभवन पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**समन्वयिका : श्रीमती शुभांगी मच्छिंद्र जाधव**

### होळी हा सण उत्साहात साजरा

सोमवार दि. २ मार्च २०२६ रोजी शाळेच्या मैदानामध्ये पारंपरिक पद्धतीने आणि उत्साहाने होळी हा सण साजरा करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये छोटा व मोठा शिशु वर्गातील विद्यार्थी सहभागी झाले होते.

कार्यक्रमाची सुरूवात श्रीमती नेहा कर्णिक यांनी विद्यार्थ्यांना होळी सणाचे महत्त्व आणि परंपरा याविषयी माहिती देऊन करण्यात आली. होळी हा वाईटावर चांगल्याचा विजय दर्शवणारा सण असून आपल्याला एकमेकांबद्दल प्रेम, आपुलकी आणि मैत्री वाढवण्याचा संदेश देतो, असे विद्यार्थ्यांना समाजावून सांगण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी एकमेकांना रंग लावून होळीचा आनंद घेतला. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना प्रेमाने रंग लावून सणाचा आनंद द्विगुणित केला.

## विद्याभवन प्राथमिक मराठी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापक : श्री. गणेश सुदाम कणसे**

### शिवजयंती सोहळा

बुधवार दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी शिवजयंती सोहळा मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव यांनी शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत देखील यावेळी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती शिल्पकला सावंत यांनी केले. इ. १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांनी विविध गाण्यातून, नृत्यातून शिवरायांच्या जीवनावर आधारित कार्यक्रम सादर केले. विद्यार्थ्यांनी शिवरायांवर आधारित भाषणे, गोष्टी, गाणी, पोवाडा, शिवराज्याभिषेक, शिवगर्जना सादर केली. श्रीमती शीतल प्रभू यांनी सर्वांचे आभार मानले.

### आंतरशालेय नृत्य स्पर्धा

बृहन्मुंबई महानगरपालिका खाजगी अनुदानित प्राथमिक शाळा एन वॉर्ड अंतर्गत आयोजित मंगळवार दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी ज्ञानप्रकाश विद्यालय घाटकोपर (पश्चिम) येथे घेण्यात आलेल्या आंतरशालेय नृत्य स्पर्धेत विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेला तृतीय क्रमांक मिळाला. इ. ३री व ४थी च्या विद्यार्थिनींनी डांगरी नृत्य सादर केले. सहभाग घेतलेल्या विद्यार्थिनी खालीलप्रमाणे -

कु. लावण्या तुषार भोर — कु. शुभ्रा जितेंद्र डोके
कु. स्वरा सुदर्शन पठारे — कु. काव्या तुषार भोर
कु. तेजश्री सावता विधाते — कु. आराध्या योगेश पाटील
कु. इशिता अश्विनकुमार चव्हाण

### मराठी राजभाषा गौरव दिन

दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी कविवर्य कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर) यांच्या जन्मदिनानिमित्त 'मराठी राजभाषा दिन' अत्यंत उत्साहात आणि दिमाखात साजरा करण्यात आला. या शानदार कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे लाभले होते. प्राथमिक इंग्रजी विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

दीपप्रज्वलनाने आणि कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची मंगलमय सुरूवात झाली. विद्यार्थ्यांनी भगवे फेटे आणि सदरा-लेंगा, तर विद्यार्थिनींनी नऊवारी साड्या आणि पारंपरिक दागिने असा मराठमोळा पेहराव करून महाराष्ट्राच्या महान लोकसंस्कृतीचे विलोभनीय दर्शन घडवले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. काहींनी कुसुमाग्रजांच्या सुप्रसिद्ध कवितांचे सुरेल वाचन केले, तर काहींनी शिवरायांचा पोवाडा गाऊन संपूर्ण वातावरण शिवमय करून टाकले. छोट्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्याला आणि सादरीकरणाला उपस्थितांनी टाळयांच्या गजरात उत्स्फूर्त दाद दिली. विद्यार्थ्यांनी मराठी भाषेच्या अभिमानाची घोषवाक्ये व सुवचने प्रदर्शित केली होती.

शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री. मनोहर डाफळे यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणात विद्यार्थ्यांना मराठी भाषेचा गोडवा, तिचा समृद्ध इतिहास आणि दैनंदिन व्यवहारात मातृभाषेचा जास्तीत जास्त वापर करण्याचे महत्त्व अत्यंत सोप्या शब्दांत समजावून सांगितले. मराठी भाषेचे संवर्धन करण्याची जबाबदारी आजच्या पिढीवर कशी आहे, यावरही त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेतील शिक्षकांनी प्रमुख पाहुण्यांचे आणि सर्व उपस्थितांचे आभार मानले. सर्वांनी मिळून गायलेल्या पसायदानाने या सुंदर, शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी सोहळ्याची सांगता झाली.

## विद्याभवन माध्यमिक मराठी व कनिष्ठ महाविद्यालय

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**प्राचार्य : श्रीमती योगिनी राजेंद्र पोतदार**

### अभिनंदनीय

✻ दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी 'शिक्षक भारती' शिक्षक संघटना यांच्या वतीने कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांना 'सावित्री-फातिमा २०२६ आदर्श संस्था संचालक पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे, शैक्षणिक क्षेत्रातील निष्ठावंत कार्यामुळे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेल्या अथक परिश्रमांमुळे हा मानाचा तुरा कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांना देण्यात आला आहे.

✻ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या कार्यक्षम, कर्तव्यदक्ष मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांना दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी शिक्षक भारती संघटनेतर्फे 'सावित्री-फातिमा आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

✻ शनिवार दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्र पुरोगामी संघटनेतर्फे 'आदर्श शिक्षक पुरस्कार' विद्याभवन हायस्कूल अ‍ॅन्ड ज्युनिअर कॉलेजचे सहाय्यक शिक्षक श्री. रूपेश मांडवेकर यांना देण्यात आला. **कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार आणि सहाय्यक शिक्षक श्री. रूपेश मांडवेकर यांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

### शिवजयंती

बुधवार दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. शिवगर्जनेच्या साथीने मोठ्या जल्लोषात कार्यक्रमाला सुरूवात करण्यात आली.

इ. ७वी व इ. ८वी च्या विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या जीवनातील अनेक प्रसंग, शिवरायांचा पाळणा, भाषणं, पोवाडा, भारूड, किल्ल्यांची माहिती देणारा संवाद, प्रेरणादायी नृत्य असे विविधरंगी कार्यक्रम सादर केले.

तसेच विद्यार्थ्यांना किल्ल्यांची माहिती व्हावी यासाठी 'पुठ्ठ्यापासून विविध किल्ले तयार करणे' हा उपक्रम देण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी किल्ल्यांच्या विविध प्रतिकृती बनवल्या.

या कार्यक्रमासाठी प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार व उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इ. ७वी च्या विद्यार्थिनी कु. ईश्वरी एरंडे व कु. नीलाक्षी दिघे यांनी केले. तर आभार प्रदर्शन कु. अवंतिका वरे या विद्यार्थिनीने केले. तर कार्यक्रमाचे नियोजन श्रीमती

कमल डहाके, श्रीमती मानसी विचारे, श्री. अंकुश कारंडे व श्री. अर्जुन मस्के यांनी केले.

**राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंती**

दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रशालेत राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार व उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई यांच्या हस्ते राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. कु. स्वराज पारेकर व कु. पूर्वी कोकरे इ. ५वी यांनी गाडगे महाराजांविषयी माहिती सांगितली. तसेच त्यानिमित्ताने प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार यांनी संत गाडगेमहाराजांचे विचार व शिकवण यांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. आभार सहा. शिक्षिका श्रीमती जयश्री मोहिते यांनी मानले. तर कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन इ. ५वी अ, ब, क चे विद्यार्थी व वर्गशिक्षक श्रीमती प्रज्ञा गावडे व श्री. विजय पाटील यांनी केले.

**विज्ञान परिषद भेट इ. ८वी**

गुरूवार दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार यांच्या मार्गदर्शनाखाली इ. ८वी च्या विद्यार्थ्यांसाठी मराठी विज्ञान परिषद येथे शैक्षणिक क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली होती.

या भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाची आवड निर्माण करणे व विविध वैज्ञानिक प्रयोगांची माहिती करून घेणे हा होता. सकाळी ८.३० वा. स्कूल बसने इ. ८वी च्या विद्यार्थ्यांना मराठी विज्ञान परिषद सभागृहाकडे नेण्यात आले. विज्ञान परिषदेच्या सभागृहामध्ये प्रथम विद्यार्थ्यांचे स्वागत करून विज्ञान गीताने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. डॉ. उषा मुकुंदन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विज्ञान प्रयोगाचे प्रत्यक्ष दिग्दर्शन करण्यात आले. त्यामध्ये नायट्रोजन शो, आर्किमिडीज तत्त्व हे प्रयोग दाखवले. विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या दालनात विविध प्रयोग पाहण्यासाठी पाठवण्यात आले. गुरूत्त्वमध्य, Floating Finger Illusion, दृष्टीभ्रम, दोन आरशातील परावर्तन घनता, गणितातील गमती जमती विद्यार्थ्यांना दाखविल्या. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र यासंबंधी अनेक आकर्षक मॉडेल्स पहायला मिळाली. ही भेट अत्यंत ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरली.

**मराठी भाषा गौरव दिन**

शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरूवात कवीश्रेष्ठ, ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त साहित्यिक कुसुमाग्रज उर्फ वि. वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार, उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई, इंग्रजी माध्यमाच्या प्र. मुख्याध्यापिका श्रीमती श्रीलता नायर, समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन इ. मान्यवरांच्या उपस्थितीत प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

इ. ५वी च्या विद्यार्थ्यांनी विविध मराठी साहित्य कलाप्रकारांचे सादरीकरण केले. भाषण, काव्यवाचन, बोलीभाषेतील संवाद (कोकणी), ज्ञानेश्वरीतील ओव्या, मराठी गीतं, भारूड नृत्य इ. कार्यक्रम सादर केले.

प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषा जपण्याचा आणि तिचा अभिमान बाळगण्याचा संदेश आपल्या भाषणातून दिला. तसेच विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणासाठी त्यांचे कौतुक केले. उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई यांनीही विद्यार्थ्यांना मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा दिल्या. अशा प्रकारे मराठी भाषा गौरव दिनाचा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन श्रीमती जयश्री मोहिते व श्रीमती प्रज्ञा गावडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कु. भाग्यश्री ठोंबरे इ. ५वी हिने केले.

**राष्ट्रीय विज्ञान दिन**

दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी 'राष्ट्रीय विज्ञान दिन' अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी शाळेचे माजी विद्यार्थी श्री. संकेत वैद्य, शाळेच्या प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार, उपप्राचार्य श्रीमती

ज्योती देसाई, इंग्रजी माध्यमाच्या समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन, इ. मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी या प्रसंगी वैज्ञानिक संकल्पना स्पष्ट करणारे प्रकल्प/प्रयोग सादर केले. तसेच वैज्ञानिक आकृत्या रेखाटल्या. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रकल्पांना मान्यवरांनी भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले व प्रोत्साहन दिले.

इ. ६वी ते ८वी च्या विद्यार्थ्यांनी सदर प्रकल्पांना भेट दिली व विविध वैज्ञानिक तत्त्वे/संकल्पना समजून घेतल्या. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणारा विज्ञान दिनाचा कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला.

**जागतिक महिला दिन**

दि. ८ मार्च २०२६ रोजी असलेल्या जागतिक महिला दिनानिमित्त दि. ७ मार्च २०२६ रोजी सकाळी ८ ते ९ या वेळात प्रशालेतील अप्पासाहेब गरगटे सभागृहात इ. ७वी ते ९वी तील विद्यार्थिनी आणि महिला शिक्षिकांसाठी माजी विद्यार्थिनी आणि प्रमुख पाहुण्या डॉ. अक्षता अशोक धुरी यांचे किशोरवयीन मुलींचे आरोग्य आणि अंधश्रद्धा व वैज्ञानिक सत्य यावर आधारित व्याख्यान आयोजित केले होते. उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई यांनी डॉ. अक्षता धुरी यांचा थोडक्यात परिचय करून दिला. प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार यांनी प्रमुख पाहुण्या माजी विद्यार्थिनी डॉ. अक्षता धुरी यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार केला. मुलींमध्ये होणारे शारीरिक, मानसिक, सामाजिक, भावनिक बदल त्याचबरोबर स्वच्छता, आहार याबाबत डॉ. अक्षता धुरी यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थिनी व महिला शिक्षिका यांनी आपल्या समस्या त्यांच्यासमोर मांडल्या. डॉ. अक्षता धुरी यांनी समस्यांचे निराकरण केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कु. आर्या अमोल हांडे इ. ९वी हिने केले.

## विद्याभवन नं. २ माध्यमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**प्र. मुख्याध्यापिकाः श्रीमती श्रीलता रमेश नायर**

**निसर्ग मंडळ वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ**

दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी अप्पासाहेब गरगटे सभागृहात निसर्ग मंडळाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरूवात प्रमुख पाहुण्या श्रीमती योगिनी पोतदार, प्राचार्य, विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय आणि श्रीमती श्रीलता नायर, प्रभारी मुख्याध्यापिका, विद्याभवन हायस्कूल नं. २ यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर प्रार्थना व स्वागतगीत सादर करण्यात आले. श्रीमती श्रीलता नायर यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना पर्यावरण जनजागृतीचे महत्त्व व शाश्वत जीवनशैलीची गरज आणि निसर्ग संवर्धनात विद्यार्थ्यांची महत्त्वाची भूमिका यावर प्रकाश टाकला. त्यांच्या प्रेरणादायी भाषणामुळे सर्वांना दैनंदिन जीवनात पर्यावरणपूरक सवयी अंगीकरण्याची प्रेरणा मिळाली. त्यानंतर इको क्लबची शपथ, वार्षिक अहवाल वाचन आणि गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण असा कार्यक्रम पार पडला. आभारप्रदर्शन आणि वंदे मातरम् या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

**मराठी राजभाषा गौरव दिन**

दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी शाळेच्या सेमिनार हॉलमध्ये मराठी वाङ्मय मंडळ अंतर्गत 'मराठी राजभाषा गौरव दिन' मोठ्या उत्साहाने संपन्न झाला. या प्रसंगी कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, प्र. मुख्याध्यापिका श्रीमती श्रीलता नायर, पर्यवेक्षक श्री. प्रकाश पवार, समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन तसेच शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात ज्ञानपीठ पुरस्कार विजेते लेखक वि. वा. शिरवाडकर उर्फ कवी कुसुमाग्रज यांच्या विषयी माहिती

देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले, आणि अशा मंडळामार्फत विविध कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो, अधिकाधिक विद्यार्थी कार्यक्रमात सहभाग घेतात, म्हणून अशी मंडळे शाळेत असणे आवश्यक आहे असे सांगितले. तसेच मराठी वाङ्मय मंडळ आणि सर्व मराठी विषय शिक्षकांचे कौतुक केले.

विद्यार्थ्यांनी मराठी भाषा गौरव गीत, नाटक, भाषणे यांच्या माध्यमातून मराठी भाषेचा गोडवा सादर केला. मराठी वाङ्मयाची विद्यार्थ्यांना गोडी लागावी म्हणून मराठी वाङ्मय आणि कुसुमाग्रजांचे साहित्य यावर आधारित प्रश्नमंजूषा घेण्यात आली. पृथ्वी, अग्नी, जल, वायू या चार गटात घेतलेल्या प्रश्नमंजूषेत वायू गट विजयी झाला. ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती लीना शिंदे आणि मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख श्रीमती मीना गायकवाड यांच्या हस्ते विजेत्यांना कुसुमाग्रजांची पुस्तके बक्षीस म्हणून देण्यात आली.

उपस्थित सर्वांचे आभार मानून 'ही मायभूमी, ही कर्मभूमी....' या सुमधूर गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख श्रीमती मीना गायकवाड आणि सर्व मराठी विषय शिक्षकांनी अथक प्रयत्न घेवून कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

**जागतिक महिला दिन**

दि. ७ मार्च २०२६ रोजी 'जागतिक महिला दिन' अत्यंत उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात एकूण १४ पालकांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. रॅपिड फायर, एक मिनिट भाषण आणि रोल प्ले या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमुळे कार्यक्रम उत्साही, आकर्षक आणि प्रेरणादायी झाला.

या कार्यक्रमाचे परीक्षण श्रीमती राजेश्वरी कोनार आणि श्रीमती प्रेमकुमारी झा यांनी केले. पहिल्या तीन क्रमांकाच्या विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली, तर सर्व सहभागी पालकांना प्रेम आणि कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले.

प्र. मुख्याध्यापिका श्रीमती श्रीलता नायर यांनी सर्व सहभागींच्या प्रयत्नांचे आणि आत्मविश्वासाचे कौतुक केले. कार्यक्रमाची सांगता कु. ईश्वरी हिने मानलेल्या आभार प्रदर्शनाने झाली.

***

**❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ❊**



**आंतरशालेय नृत्य स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या प्राथमिक मराठी विभागातील विद्यार्थिनींसमवेत सहा. शिक्षिका श्रीमती रूपल पालकर**

# विद्याभवन संकुल
# नेरूळ शाखा, नवी मुंबई
**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

## विद्याभवन प्राथमिक मराठी शाळा
### नेरूळ शाखा, नवी मुंबई
**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**मुख्याध्यापिका : सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ**

### होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षा सुयश

विद्यार्थ्यांच्या जिज्ञासू व संशोधक वृत्तीला चालना देण्यासाठी ग्रेटर बॉम्बे सायन्स टीचर्स असोसिएशनतर्फे घेण्यात आलेल्या होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत इ. ६वीतील विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. यापैकी पुढील विद्यार्थी या परीक्षेत उत्तीर्ण झाले.

**विद्यार्थ्याचे नाव**

कु. स्वरांजली विठ्ठल देशमुख
कु. संस्कृती सुनिल रिकामे
कु. अनिक हेमंत पिसे
कु. विहान प्रणय पडवळ
कु. विहान अक्षय भोसले
कु. मनोराज रूपेश कळंत्रे
कु. हार्दिक नीतिन पयेर

कु. हार्दिक नीतिन पयेर याची प्रात्यक्षिक फेरीसाठी निवड झाली. त्याचे हार्दिक अभिनंदन!

### विज्ञान-वक्तृत्व स्पर्धा

मराठी विज्ञान परिषद, नवी मुंबई आणि विद्याभवन शैक्षणिक संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई स्तरीय तीन दिवसीय आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. दि. २२ ते २४ डिसेंबर पर्यंत चाललेल्या या स्पर्धेत नवी मुंबईतील विविध शाळांमधील ८० विद्यार्थी सहभागी झाले होते. मराठी विज्ञान परिषद, नवी मुंबई विभागाचे अध्यक्ष विज्ञानकथा लेखक डॉ. किशोर कुलकर्णी, बायोटेक्नॉलॉजिस्ट बिपीन देशमाने, डॉ. होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राचे अधिकारी विजय लाळे, डॉ. जयश्री सैनिस, मराठी विज्ञान परिषदेचे कार्यकारी सदस्य विनय दिनकर, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ व श्रीमती श्रीजा नायर, मुख्याध्यापक गोरख कदम, समन्वयक पांडुरंग मुळीक, पर्यवेक्षिका श्रीमती शोभा लवटे, श्रीमती अस्मिता सलगर, शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या स्पर्धेसोबतच मुंबईतील नेहरु सायन्स सेंटर आणि मराठी विज्ञान परिषदेमार्फत शाळेत विज्ञान प्रदर्शन आणि प्रात्यक्षिक सादरीकरण सर्वांसाठी नि:शुल्क उपलब्ध करून देण्यात आले होते. अनेक विद्यार्थ्यांनी या प्रात्यक्षिकांचा आनंद घेतला. आंतरशालेय विज्ञान वक्तृत्व स्पर्धेत कु. जान्हवी मोहन डाकवे (इ. ७वी) हिला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. तसेच उत्कृष्ट सहभागाबद्दल शाळेला सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सर्वांचे हार्दिक अभिनंदन!

### सावित्रीबाई फुले जयंती व वार्षिक क्रीडा स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ

दि. ३ जानेवारी २०२६ रोजी क्रीडा स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले. समाजसेविका श्रीमती तेजस्विनी अधिकारी, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती मनीषा मुळीक, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, शाळा व्यवस्थापन समितीतील सर्व सदस्य, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. सावित्रीबाई फुले यांची जयंती आणि बालिका दिनाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून सावित्रीबाईंनी केलेल्या कार्याची माहिती सांगितली. सावित्रीबाईंच्या जीवनावर आधारित छान ओवी सादर करण्यात आली. प्रमुख अतिथी श्रीमती तेजस्विनी अधिकारी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांच्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. पालकांनी विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधावा. विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लावा, जगात अशक्य

काहीच नसते, सगळे शक्य असते. पालकांनी मुलांमध्ये चांगल्या सवयी रुजवाव्यात, मोबाईलचा अतिवापर टाळा, असा मोलाचा संदेश दिला. त्यानंतर क्रीडा स्पर्धांमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. वंदे मातरम्ने कार्यक्रमाची सांगता झाली. सूत्रसंचालन श्रीमती कविता तेंडुलकर यांनी केले.

### उत्कृष्ट गुणवंत संस्था पुरस्कार

दि. ४ जानेवारी २०२६ रोजी बदलापूर, जिल्हा ठाणे येथे शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट गुणवंत पुरस्कार सोहळा संपन्न झाला. कुळगाव बदलापूर नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष व विद्यमान नगरसेवक श्री. वामनदादा म्हात्रे व शिक्षक आमदार श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या शुभहस्ते पुणे विद्यार्थी गृहाचे विद्याभवन, नेरूळ शाखा या संस्थेला 'उत्कृष्ट गुणवंत संस्था' या पुरस्काराने गौरविण्यात आले. याप्रसंगी कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ व शिक्षक उपस्थित होते. **संस्थेच्या वतीने विद्याभवन संकुलाचे हार्दिक अभिनंदन!**

### जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती

दि. १२ जानेवारी २०२६ रोजी राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ यांच्या व विद्यार्थी प्रतिनिधींच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून राजमाता जिजाबाई यांच्या कार्याची माहिती सांगितली. त्यांच्यावर आधारित वेशभूषा करून काव्य, वाचन, पोवाडा इ. कार्यक्रम झाले. काही विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंद यांच्या कथा सांगितल्या व त्यांच्या कार्याची ओळख करून दिली. शिक्षिका श्रीमती नूतन गवांदे यांनी युवादिनाविषयी माहिती दिली. सर्व विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीची शपथ घेतली.

### डॉ. शंकर पांडुरंग किंजवडेकर ५वा स्मृतिदिन

दि. १८ जानेवारी २०२६ रोजी डॉ. शंकर पांडुरंग किंजवडेकर यांच्या ५व्या स्मृतिदिनानिमित्त कार्यक्रम संपन्न झाला. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ व समाजसेविका श्रीमती तेजस्विनी अधिकारी यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून आदरांजली वाहण्यात आली. मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ व श्रीमती मनीषा मुळीक, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, सर्व विभागांचे शिक्षक उपस्थित होते. उपस्थितांनी डॉ. किंजवडेकर यांना आदरांजली वाहिली. डॉक्टरांच्या सुकन्या श्रीमती तेजस्विनी यांनी आपल्या बालपणाच्या आठवणींना उजाळा दिला. डॉक्टरांच्या अनेक आठवणी, अनुभव त्यांनी कथन केले. लहान मुलांवर योग्य वयात संस्कार झाले पाहिजेत, प्रत्येकाने वाचन करावे, सकारात्मक राहावे. चांगला माणूस बनण्यासाठी प्रयत्न करा. डॉक्टरांचा एक तरी गुण प्रत्येकाने अंगिकारला तर खऱ्या अर्थाने त्यांना आदरांजली होईल असे मत व्यक्त केले. मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ यांनीही आदरांजली वाहिली. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी डॉक्टरांच्या कार्याबद्दल माहिती दिली. आपले अनुभव सांगितले. नेरूळ शाखेच्या उभारणीतील डॉक्टरांचा सहभाग किती मौल्यवान होता हे सांगितले. अनेक शिक्षकांनी डॉक्टरांच्या आठवणींना उजाळा दिला व आदरांजली वाहिली.

### वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व स्नेहसंमेलन

शुक्रवार दि. २३ जानेवारी २०२६ रोजी वार्षिक पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलन मोठ्या जल्लोषात संपन्न झाले. या मंगलमय सोहळ्यास नवी मुंबई महानगरपालिका शिक्षणाधिकारी श्री. अशोक कडूस, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, संचालक डॉ. राजेंद्र कांबळे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, केंद्रप्रमुख श्रीमती रेखा पाटील, पीव्हीजी बी. सी. एस. कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजय गायकवाड, डॉ. शीतल सुकटे, क्षमा देव, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती श्रीजा

नायर व श्रीमती मनीषा मुळीक, मुख्याध्यापक गोरख कदम, समन्वयक पांडुरंग मुळीक, पर्यवेक्षिका शोभा लवटे, अस्मिता सलगर, पालक, विद्यार्थी आणि सर्व विभागांचे शिक्षक उपस्थित होते. प्रमुख अतिथींच्या हस्ते दीपप्रज्वलन व गणेश पूजनाने कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. सुमधूर स्वागतगीताने अतिथींचे स्वागत करण्यात आले. शाळेत वर्षभर राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमांचा व शाळेने मिळवलेल्या यशाची गाथा सांगणारा अहवाल ध्वनीचित्रफितीद्वारे शिक्षिका श्रीमती मेघाराणी जोशी व विद्यार्थ्यांनी सादर केला.मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला. सर्व मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आले. प्रास्ताविक करताना कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी संस्थेच्या गौरवशाली इतिहासाची माहिती सांगितली. शाळेच्या प्रगतीचा आढावा घेतला. प्रमुख अतिथी श्री. अशोक कडूस यांनी विद्यार्थ्यांना, पालकांना मार्गदर्शन केले. पाल्याचे कौशल्य ओळखूनच त्या दृष्टीने त्यांना प्रोत्साहन द्यावे. पालकांनी पाल्याशी विचारांची देवाणघेवाण करावी. विद्यार्थ्यांनी मिळालेल्या संधीचे सोने करावे. संस्कृती जोपासणारी ही शाळा पालक, शिक्षक व विद्यार्थी यांच्या योगदानामुळेच जिल्ह्यात सर्वोत्कृष्ट ठरली आहे, असे सांगून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यानंतर सहशालेय स्पर्धा तसेच सांघिक क्रीडा स्पर्धेतील पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. वादविवाद स्पर्धेत राज्यस्तरावर गेलेल्या आरती औचर यांनाही सन्मानित करण्यात आले. सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या रेड हाऊसला ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. हुशार व होतकरु विद्यार्थिनी कु. शुभा झनकर, कु. भक्ती गोनबरे व विद्यार्थी कु. श्रेयस रसाळ यांना माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभागातर्फे सुवर्ण महोत्सव निधी शिष्यवृत्ती देण्यात आली. स्काऊट गाईड निधीतून रु. ५,०००/- नेरूळ शाखेच्या वाढीसाठी सप्रेम भेट देण्यात आले. उपस्थितांचे आभार वर्षा पिसे यांनी मानले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. शालेय विकासात आपली सेवा देणाऱ्या शिक्षकेतर कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांना गुलाबपुष्प व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. वंदे मातरम्‌ने कार्यक्रमाची सांगता झाली.

**७७ वा प्रजासत्ताक दिन**

दि. २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिन मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. नवनिर्वाचित नगरसेवक श्री. सचिनजी देवाप्पा लवटे व माजी कार्याध्यक्ष प्राचार्य कृष्णाजी नारायण शिरकांडे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका, मुख्याध्यापक, समन्वयिका, पालक, विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते. अतिथींना पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ आणि भेटवस्तू देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून प्रजासत्ताक दिन आणि आधुनिक भारताबद्दल माहिती सांगितली. श्री. प्रभाकर पतकी शिष्यवृत्ती आणि विद्यार्थी कल्याण निधी शिष्यवृत्तीचे वाटप हुशार व गरजू विद्यार्थ्यांना करण्यात आले. घेवाराम सुतार स्टेशनरी तर्फे गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्यात आले. डॉ. शंकर पांडुरंग किंजवडेकर मेमोरियल फाउंडेशन तर्फे विद्यार्थिनी कु. उल्का झगडे इ. ७वी हिस 'आदर्श विद्यार्थिनी' पुरस्काराने गौरविण्यात आले. श्रीमती राजश्री रेवाळे यांना 'आदर्श शिक्षकेतर कर्मचारी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. इ. १०वी व १२वीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख अतिथी श्री. सचिन देवाप्पा लवटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. बालपणीच्या आपल्या शाळेतील आठवणी सांगितल्या. मेहनतीला पर्याय नाही, मी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून इथपर्यंत आलो आहे. मेहनत करा, कोणत्याही परिस्थितीला सामोरे जा, असा संदेश विद्यार्थ्यांना दिला. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी आपल्या भाषणात नेरूळ शाखेच्या निर्मितीत प्राचार्य कृ. ना. शिरकांडे व डॉ. शं. पां. किंजवडेकर यांचा मोलाचा वाटा आहे, त्यांच्या प्रयत्नांमुळेच ही सुंदर

शालेय वास्तू डौलात उभी आहे. इ.स. २०४७ पर्यंत विकसित भारत करण्याचे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आहे, त्यात विद्यार्थ्यांची महत्त्वाची भूमिका आहे, आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पूर्ण करायचे आहे. विज्ञान व तंत्रज्ञान अवगत करा, देशाचे नाव उज्ज्वल करा असा संदेश दिला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीवर आधारित विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. देशभक्ती गीतावर आधारित कवायत, सहसाहित्य व्यायाम प्रकार, योगासने इ. कार्यक्रम सादर झाले.

**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा**

मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे या हेतूने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा दि. १४ ते २८ जानेवारी २०२६ यादरम्यान साजरा करण्यात आला. मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. मराठी भाषेत कथाकथन, घोषवाक्य लेखन, स्वरचित काव्यलेखन स्पर्धा घेण्यात आल्या. दि. २७ जानेवारी २०२६ रोजी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय येथे वाचनकट्टा संबंधी व्याख्यानास नूतन गवांदे उपस्थित राहिल्या. दि. २४ जानेवारी २०२६ रोजी विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकांचे अभिप्राय लेखन घेण्यात आले. दि. २९ जानेवारी २०२६ रोजी ग्रंथपाल प्रियांका थोरवे व मराठी भाषेतून टंकलेखन करणाऱ्या श्रीमती राजश्री रेवाळे यांना पुस्तकरूपी भेट देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. कवी कुसुमाग्रज सार्वजनिक वाचनालय संस्था, सीवूडस् यांच्यातर्फे मराठी काव्यवाचन स्पर्धा घेण्यात आली.

**अभिनंदनीय**

शिक्षण विभाग जिल्हा परिषद, ठाणे मार्फत जिल्हा परिषद शाळांच्या विद्यार्थ्यांसाठी विविध गुणदर्शन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या जिल्हास्तरीय स्पर्धा दि. १३ फेब्रुवारी २०२५ रोजी लोढा वर्ल्ड स्कूल, फेज-२, डोंबिवली या शाळेत संपन्न झाल्या. नाट्य, वक्तृत्व, लोकनृत्य, समूहगीत इ. विविध स्पर्धांमध्ये परीक्षक म्हणून कार्य करण्यासाठी पुढील शिक्षकांची निवड करण्यात आली.

| शिक्षकांचे नाव | स्पर्धा |
|---|---|
| श्रीमती मेघाराणी जोशी | लोकनृत्य |
| श्रीमती कविता तेंडुलकर | समूहगीत |
| श्रीमती नूतन गवांदे | वक्तृत्व |
| श्रीमती आरती औचर | नाट्य |

**अभिनंदनीय**

* दि. ३ जानेवारी २०२६ रोजी घाटकोपर येथे विद्याभवन शाळेतर्फे कॉन्क्वेस्ट २०२५-२६ कराटे स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी पारितोषिके पटकावली.

| विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता | क्रमांक | पदक |
|---|---|---|---|
| कु. स्वराज लांडे | इ. ५वी | प्रथम | गोल्ड |
| कु. क्रियांश पयेर | इ. २री | तृतीय | ब्राँझ |
| कु. गौरी पाटकर | इ. २री | तृतीय | ब्राँझ |

* डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्यिक विचारमंच, महाराष्ट्र यांच्यातर्फे श्रीमती आरती किशोर औचर यांना 'राज्यस्तरीय क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले २०२५ हा पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

* राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वाशिम आयोजित राज्यस्तरीय शिक्षक, अधिकारी, कर्मचारी स्पर्धा दि. २१ जानेवारी २०२६ रोजी वाशिम येथे संपन्न झाली. श्रीमती आरती किशोर औचर यांनी वादविवाद स्पर्धेत विभाग स्तरावर तृतीय क्रमांक मिळवून राज्यस्तरापर्यंत झेप घेतली. वाशिम येथे अंतिम स्पर्धा संपन्न झाली. श्रीमती आरती औचर यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन!

* निपुण महाराष्ट्र अभियान हे पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान बळकट करण्यासाठी सुरू करण्यात आले. या मोहिमेचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांचे वाचन, लेखन आणि मूलभूत गणितातील प्राविण्य वाढवणे हा आहे. त्या संदर्भात कृती कार्यक्रम आणि ए आय आधारित मूल्यांकन चाचण्या घेण्यात आल्या. त्यानुसार विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेची निवड 'सर्वोत्तम

निपुण सुपर शाळा' मध्ये झाली. महाराष्ट्रातील टॉप ४० मध्ये शाळेची निवड झाली. सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन!

**❊ ए प्लस मानांकन शाळा**

शाळेची शैक्षणिक कामगिरी, भौतिक सुविधा आणि व्यवस्थापन सुधारण्यासाठी तयार केलेल्या शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखड्यानुसार विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेचे बाह्य मूल्यांकन करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग अंतर्गत राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेद्वारे २०२५-२६ मध्ये केलेल्या बाह्य मूल्यांकनात शाळेला ए प्लस मानांकन जाहीर करण्यात आले. महाराष्ट्रातील एक लाखापेक्षा अधिक शाळांनी यात सहभाग घेतला. विशेष म्हणजे विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेची निवड पहिल्या चाळीस शाळांमध्ये झाली आहे. नियोजन, शिस्त, दर्जेदार शैक्षणिक निकाल, विविध कला, क्रीडा स्पर्धा यामध्ये शाळेचे कार्य कौतुकास्पद आहे. या कार्याचे फलित या मानांकनातून मिळाले. सर्वांचे हार्दिक अभिनंदन!

**वक्तृत्व स्पर्धा सुयश**

शिवजन्मोत्सव सोहळा समिती, नवी मुंबईतर्फे वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. शिवजयंतीनिमित्त राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आभासी पद्धतीने घेण्यात आली. या स्पर्धेत कु. काव्या निलेश कातळे या विद्यार्थिनीला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. छत्रपती शिवराय व त्यांचे प्रशासन या विषयावर तिने वक्तृत्व सादर केले. रु. १,०००/- व प्रमाणपत्र देऊन तिला सन्मानित करण्यात आले.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

# विद्याभवन प्राथमिक इंग्रजी शाळा

## नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**प्र. मुख्याध्यापिका : सौ. मनीषा मुळीक**

**वार्षिक पारितोषिक वितरण आणि स्नेहसंमेलन**

दि. २० जानेवारी २०२६ रोजी वार्षिक पारितोषिक वितरण आणि स्नेहसंमेलन समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी श्री. रामदास जगताप (अपर जिल्हाधिकारी, सिडको, नवी मुंबई) आणि विशेष अतिथी श्रीमती गुंजन भाटिया (दूरचित्रवाणी अभिनेत्री) उपस्थित होत्या. श्री. गिरीश म्हात्रे, श्री. सचिन लवटे, श्रीमती प्रीती भोपी (सर्व नवनिर्वाचित नगरसेवक, नवी मुंबई मनपा) यांचीही उपस्थिती लाभली. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, विविध विभागांचे मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका, समन्वयक, निवृत्त क्रीडा शिक्षक, सर्वोदय शाळा, श्री. रमेश राऊत, कलाशिक्षक हेही उपस्थित होते. प्रमुख अतिथी व विशेष अतिथींच्या हस्ते सरस्वती व गणेशपूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रथम स्वागतगीत व प्रार्थना गीताचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले. यानंतर श्री. संकेत थळे यांनी शाळेत वर्षभरात घेण्यात आलेल्या स्पर्धा, शैक्षणिक उपक्रम व विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये मिळविलेली पारितोषिके इ. संपूर्ण आढावा पी. पी. टी. द्वारे सादर केला. मुख्याध्यापिका श्रीमती मनीषा मुळीक यांनी प्रमुख अतिथी व विशेष अतिथी यांचा परिचय करून दिला. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते पाहुण्यांचा सन्मानचिन्ह, भेटवस्तू, शाल, श्रीफळ, पुस्तक व रोपटे देऊन स्वागत सत्कार करण्यात आला. व्यासपीठावरील उपस्थित मान्यवरांचेही सत्कार करण्यात आले. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ आपल्या प्रास्ताविकात संस्थेची माहिती करून देताना म्हणाले की, संस्थेने समाजातील गरीब, गरजू आणि हुशार विद्यार्थ्यांना शिक्षण देऊन, त्यांचे पालनपोषन करून समाजामध्ये एक सुजाण नागरिक घडवण्याचे व त्यांना

त्यांच्या पायावर उभे राहण्यासाठी मेहनतीने व उदात्त हेतूने प्रयत्न केले आहेत. दि. १२ मे १९०९ रोजी स्थापन झालेली ही संस्था आहे. दिवसेंदिवस या संस्थेचा विस्तार वाढत आहे. आणि यासाठी संस्थेचे हितचिंतक, समाजातील देणगीदार, माजी विद्यार्थी यांचे आर्थिक पाठबळ लाभले आहे. यांच्या सक्रीय सहकार्यावर आणि आर्थिक पाठबळाबर शैक्षणिक व सामाजिक कार्य ही संस्था जोमाने करत आहे, याचबरोबर नेरूळ शाखेतील विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी व शाळेने गाठलेला शैक्षणिक उच्चांक याबद्दल त्यांनी माहिती दिली. प्रमुख अतिथी श्री. रामदासजी जगताप यांनी शाळा हे व्यावहारिक शिक्षण व जीवन जगण्यासाठी दिशा देण्याचे केंद्र आहे. नवी मुंबईसारख्या शहरामध्ये विद्यार्थ्यांना नैतिकतेसह डिजिटलयुक्त शिक्षण देऊन परिपूर्ण आणि स्वयंपूर्ण असा नागरिक तयार झाला पाहिजे, या उद्देशाने पुणे विद्यार्थी गृह ही संस्था काम करत आहे. विद्यार्थ्यांचे छंद जोपासत त्यांना बहुआयामी बनवून प्रोत्साहन देण्यासाठी वार्षिक पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलन कार्यक्रम ही संस्था आयोजित करते. तसेच आपण स्वत: पुण्यात शिक्षण घेत असताना या संस्थेची मदत झाल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले व कृतज्ञता व्यक्त केली. विशेष अतिथी श्रीमती गुंजन भाटिया यांनी जीवन यशस्वी करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वत:वर विश्वास ठेवावा, ज्या क्षेत्रात जाणार तिथे मेहनतीने काम करावे, व स्वप्नांना उंच भरारी देण्यासाठी अभ्यासाला आपला मित्र बनवावे आणि मोबाईलपासून दूर रहावे, असे सांगितले. शिक्षक विद्यार्थ्यांना चांगला माणूस बनवतात म्हणून शिक्षकांना धन्यवाद दिले. यानंतर सहशालेय व आंतरशालेय स्पर्धांमधील बक्षीसपात्र विद्यार्थ्यांना व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले तसेच काही विद्यार्थ्यांना पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ सुवर्ण महोत्सव निधीतून शिष्यवृत्ती देण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत बक्षीस वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला. यानंतर विविध प्रकारची नृत्ये सादर करत विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य प्रदर्शित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका प्रतिभा कुमकर यांनी केले. तर अमृता झोडपे यांनी सर्वांचे आभार मानेले. वंदे मातरम्ने कार्यक्रमाचा समारोप झाला.

**प्रजासत्ताक दिन**

दि. २६ जानेवारी २०२६ रोजी भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी श्री. सचिनजी लवटे (नवनिर्वाचित नगरसेवक, न.मुं.म.पा) श्रीमती मंजुषा सचिन लवटे (माजी विद्यार्थी) आणि त्यांचे सहकारी श्री. सूरज ठाकूर व श्री. प्रसाद पवार उपस्थित होते. संस्थेचे माजी कार्याध्यक्ष प्राचार्य कृ. ना. शिरकांडे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, विविध विभागाचे मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका, समन्वयक, शिक्षकवृंद, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते. अतिथींच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरूवातीस असाक्षरतामुक्त गावाची शपथ घेण्यात आली. यानंतर श्री. प्रभाकर पतकी शिष्यवृत्ती, आई कृष्णाबाई शिष्यवृत्ती व घेवाराम सुतार शैक्षणिक साहित्य संच यांचे वाटप करण्यात आले. तसेच डॉ. एस. पी. किंजवडेकर यांच्या स्मरणार्थ आदर्श शिक्षक, आदर्श विद्यार्थी आणि आदर्श शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार प्रदान करण्यात आले. तसेच इ. १०वी व १२वी परीक्षेत विशेष गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून शिक्षिका श्रीमती प्रतिभा आहेर यांनी रु. ५,५५५/- आणि श्री. प्रभाकर गणपत वायाळ यांनी रु. २५,०००/- ची देणगी शाखा वाढीसाठी दिली. यानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर भाषण, गीतगायन, नृत्य, कवायत प्रकार, योगा व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. अतिथी श्री. सचिनजी लवटे यांनी भाषण करणाऱ्या पूर्व प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत व त्यांचे कौतुक करत रोख बक्षीस म्हणून रु. ३,०००/- व म्युझिकल योगा करणाऱ्या विद्यार्थिनींसाठी रु. ३,०००/- दिले. प्रमुख अतिथींनी आपल्या भाषणातून प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व सांगून

विद्यार्थ्यांना संविधानाच्या मूल्यांचे पालन करण्याचा संदेश दिला.

विद्यार्थ्यांनो मेहनत करा, यश नक्कीच मिळेल असे सांगितले. सध्याच्या एआयच्या गतिमान युगात वावरत असताना प्रत्येक विद्यार्थ्याने व नागरिकाने सजग व सकारात्मक राहून, नकारात्मक गोष्टींना थोपवून २०४७ पर्यंत विकसित भारत बनवण्यामध्ये आपली भूमिका निभावायची आहे, आणि आत्मनिर्भर देश बनवण्यासाठी आपल्याला प्रयत्न करायचे आहेत. यासाठी विद्यार्थी आणि समाजातील सर्वच घटक खूप महत्त्वाचे आहेत, असे मनोगत कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थिनी जान्हवी यमगर हिने वंदे मातरम् गाऊन कार्यक्रमाचा समारोप केला. सूत्रसंचालन शिक्षिका श्रीमती फरहाना चौगुले यांनी तर आभार प्रदर्शन शिक्षक श्री. संकेत थळे यांनी केले.

**एस. आय. पी. अरिथमॅटिक जिनीयस-अखिल भारतीय आंतरशालेय स्पर्धा**

दि. ३० जानेवारी २०२६ रोजी विद्यार्थिनी कु. माही भागवत नागरगोजे हिने एस. आय. पी. अरिथमॅटिक जिनीयस ऑल इंडिया इंटरस्कूल कॉन्टेस्ट २०२५ या स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले. एस. आय. पी. ॲकॅडमी आयोजित १० व्या वर्धापन दिनानिमित्त राज्यस्तरीय अंतिम फेरीत कु. माही भागवत हिने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. तिला सन्मानचिन्ह व रोख रक्कम रु. १०,०००/- बक्षीस स्वरूपात मिळाले. तिचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन

**शिवजयंती**

दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी विद्याभवनमध्ये रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या जल्लोषात साजरी करण्यात आली. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका, मुख्याध्यापक, समन्वयक या सर्व मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरूवात झाली. माध्यमिक इंग्रजी विभागातील विद्यार्थ्यांनी गारद बोलून शिवछत्रपतींना मानवंदना दिली. विद्यार्थ्यांनी भाषणे, पोवाडे व नृत्ये सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. काही विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ, शिवाजी महाराज, अफजलखान व मावळ्यांचा वेश परिधान करून ऐतिहासिक प्रसंग सादर केले. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी उत्कृष्ट भाषणे करणाऱ्या २ विद्यार्थिनींना रोख रक्कम बक्षिस देऊन गौरव केला. आपले मनोगत व्यक्त करताना शिवाजी महाराजांचे शौर्य व स्वराज्याची प्रेरणा विद्यार्थ्यांनी घ्यावी. महाराजांचा एक तरी गुण आपण अंगिकारावा. केवळ पाठ्यपुस्तकापुरता अभ्यास न करता आपल्या जीवनामध्ये छत्रपतींचे गुण आत्मसात करून आपले जीवन घडवावे असे सांगितले. यानंतर शाळेतून शिवजयंती मिरवणूक काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी भगवे झेंडे हातात घेऊन घोषणाबाजी करत परिसरात फेरी काढली. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षिका श्रीमती प्रतिभा कुमकर यांनी केले.

## विद्याभवन माध्यमिक इंग्रजी

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**प्र. मुख्याध्यापिका : श्रीमती श्रीजा नायर**

**विज्ञान वक्तृत्व स्पर्धेतील सुयश**

विद्याभवन शैक्षणिक संकुल व मराठी विज्ञान परिषद, नवी मुंबई विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २२ व २३ डिसेंबर रोजी नवी मुंबई स्तरीय आंतरशालेय विज्ञान वक्तृत्व स्पर्धेत कु. आरिझ फिरोज पटवेगार (इ.९वी) याने तृतीय क्रमांक पटकावला. या स्पर्धेचा सांघिक चषक विद्याभवन शैक्षणिक संकुल व नवी मुंबई महापालिका शाळा क्र. ९३ यांनी पटकाविला. या कार्यक्रमास नेहरु विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. उमेश रुस्तागी, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मराठी विज्ञान परिषद अध्यक्ष डॉ. किशोर कुलकर्णी, उपाध्यक्ष शशिकांत धारणे, परिक्षक बिपिन देशमाने, श्री. विनय दिनकर, श्री. अजय दिवेकर, सर्व विभागांच्या

मुख्याध्यापिका, मुख्याध्यापक, समन्वयक उपस्थित होते. डॉ. किशोर कुलकर्णी यांनी सर्वांचे आभार मानले.

**स्काऊट गाईड शिबिर**

माध्यमिक इंग्रजी विभागाच्या इ.१०वीतील विद्यार्थ्यांचे स्काऊट गाईडचे निवासी शिबिर दि. २९ व ३० डिसेंबर २०२५ रोजी निवांत ॲग्रो, वाडा, जिल्हा पालघर येथे भरविण्यात आले होते. या शिबिरात इ.१० वीतील सर्व स्काऊटस् आणि गाईडस् तसेच समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, स्काऊट मास्टर श्री. इष्ट नवघने, गाईड कॅप्टन श्रीमती शैलजा आंबवडे, सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग घेतला होता. या शिबिरात स्काऊट गाईड अभ्यासक्रमात समाविष्ट असलेल्या दोरीवरून चढणे, ट्रेकिंग करणे, बैलगाडी, ट्रॅक्टरवरून फेरफटका मारणे, भिंतीवर चढणे तसेच पारंपरिक पद्धतीने चुलीवर खिचडी बनवणे अशा उपक्रमांचा विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला. यातून सर्वधर्मसमभाव, संघव्यवस्थापन, जबाबदारीचे काटेकोर पालन, पर्यावरण संवर्धन मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवणे हा मुख्य हेतू होता. विविध मनोरंजनात्मक कार्यक्रम याप्रसंगी सादर करण्यात आले. अतिशय चैतन्यपूर्ण वातावरणात शिस्तबद्ध पद्धतीने स्काऊट गाईड शिबिर संपन्न झाले.

**वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आणि स्नेहसंमेलन**

दि. २१ जानेवारी २०२६ रोजी विद्याभवन माध्यमिक इंग्रजी विभागाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आणि स्नेहसंमेलन उत्साही व चैतन्यपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी नवी मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त श्री. सुनील पवार व विशेष अतिथी म्हणून उपायुक्त श्री. किसनराव पलांडे यांना आमंत्रित करण्यात आले. या कार्यक्रमाला कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर, नवनिर्वाचित नगरसेवक श्री. सचिन लवटे, नगरसेविका स्वप्ना गावडे, मुख्याध्यापिका श्रीजा नायर, सुवर्णा मिसाळ, मनीषा मुळीक, मुख्याध्यापक गोरख कदम, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, पर्यवेक्षिका शोभा लवटे, अस्मिता सलगर, माजी मुख्याध्यापिका साधना कुलश्रेष्ठ, निवृत्त क्रीडा शिक्षक मोहन पाटील तसेच सर्व शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते. पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि सरस्वती पूजन करण्यात आले. ईशस्तवनाने वातावरण मंगलमय झाले. शिक्षिका श्रीमती मनीषा साळुंके व श्रीमती शीतल येनगे यांनी चित्ररूपी अहवालाचे सादरीकरण केले. कुलसचिव दिनेश मिसाळ यांनी पुणे विद्यार्थी गृहाच्या सर्व शाखा आणि विविध सेवाभावी उपक्रमांची माहिती दिली. प्रमुख अतिथी श्री. सुनील पवार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक व पालक यांमध्ये सुसंवाद दृढ होणे काळाची गरज असून विद्यार्थ्यांनी आपली क्षमता ओळखून योग्य कार्यक्षेत्र निवडावे, असे आवाहन केले. विशेष अतिथी उपायुक्त किसनराव पलांडे यांनी स्वप्न, शिस्त व मेहनत ही त्रिसूत्री अंगीकारावी, आत्मविश्वास, सातत्यपूर्ण अभ्यास, कठोर परिश्रमातून यशाचे शिखर गाठता येते. आई-वडील व शिक्षक हे उज्ज्वल भविष्य घडवतात. त्यामुळे यांचा आदर करावा असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. इ.१०वीचे गुणवंत विद्यार्थी, स्कॉलरशिप परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी, शालेय आणि सहशालेय उपक्रमांमध्ये नैपुण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांनी कलागुण सादर करून आपले कौशल्य दाखवले. भारतीय संस्कृती आणि परंपरा जपणारे अनेक नृत्यप्रकार विद्यार्थ्यांनी सादर केले. सूत्रसंचालन श्री. मनोज मयेकर तर आभार प्रदर्शन श्रीमती रुपाली दातखिळे यांनी केले.

**वार्षिक क्रीडा स्पर्धा बक्षिस वितरण समारंभ**

दि. २४ डिसेंबर २०२६ रोजी माध्यमिक इंग्रजी विभागाचा वार्षिक क्रीडा स्पर्धा बक्षिस वितरण समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी डॉ. रेश्मा सुरी यांना आमंत्रित करण्यात आले. वार्षिक क्रीडा स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना डॉ. रेश्मा

सुरी यांच्या हस्ते मेडल्स् व प्रशस्तिपत्रके देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. रेश्मा सुरी यांनी विद्यार्थ्यांना खेळामुळे व्यक्तिमत्त्व विकास होतो, मेहनतीने व प्रयत्नाने यश नक्कीच संपादन करता येते, असे मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास श्रीमती श्रीजा नायर, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती कल्पना सोनार यांनी केले.

## विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी व सेमी इंग्रजी शाळा

### नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**पर्यवेक्षिका : सौ. अस्मिता सलगर**

**वार्षिक क्रीडा स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ (पूर्व-प्राथमिक इंग्रजी)**

दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी डॉ. सत्यम महाले प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, श्रीमती श्रीजा नायर, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक आणि पर्यवेक्षिका श्रीमती अस्मिता सलगर हे याप्रसंगी उपस्थित होते. गणेशपूजनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. श्रीमती अस्मिता सलगर यांनी प्रमुख अतिर्थीचा परिचय करून दिला. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते प्रमुख अतिर्थींचा सत्कार करण्यात आला. अतिथी डॉ. सत्यम महाले यांनी विद्यार्थ्यांना तसेच पालकांना मैदानी खेळ व आहार यांचे महत्त्व सांगत मार्गदर्शन केले. मोबाईलचा कमीत कमी वापर केला पाहिजे असेही त्यांनी यावेळी सांगितले. त्यानंतर पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचा पदके व प्रशस्तीपत्रके देऊन गुणगौरव करण्यात आला. या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन श्रीमती दर्शना सपकाळ व आभारप्रदर्शन श्रीमती ममता गौडा यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

**वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आणि स्नेहसंमेलन (पूर्व-प्राथमिक इंग्रजी)**

दि. २२ जानेवारी २०२६ रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी आय. ए. एस. अधिकारी व संस्थेचे माजी विद्यार्थी श्री. रमेश चव्हाण प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांची याप्रसंगी प्रमुख उपस्थिती होती. दीप प्रज्वलन व गणेश पूजनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. विद्यार्थ्यांनी प्रार्थना नृत्य आणि पाहुण्यांचे स्वागत करण्यासाठी स्वागतनृत्य सादर केले. पर्यवेक्षिका श्रीमती अस्मिता सलगर यांनी प्रमुख अतिर्थींचा परिचय करून दिला. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते श्री. रमेश चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला. श्रीमती कल्पना स्वाईन व श्रीमती शीतल बाबर यांनी पी. पी. टी. द्वारे वार्षिक अहवाल सादर केला. विविध शालेय, सहशालेय स्पर्धांमधील पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचा पालकांसह प्रमुख अतिर्थींच्या हस्ते बक्षिसे देवून गुणगौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांनी विविध नृत्यछटा सादर करून आपले कौशल्य दाखविले. याप्रसंगी मुख्याध्यापिका श्रीजा नायर, सुवर्णा मिसाळ, मनीषा मुळीक, समन्वयक पांडुरंग मुळीक, पर्यवेक्षिका शोभा लवटे, अस्मिता सलगर, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती ममता गौडा व श्रीमती दर्शना सपकाळ यांनी केले. बक्षीस प्राप्त विद्यार्थ्यांच्या नावांचे वाचन श्रीमती प्रिती दाभाडे यांनी तर आभार प्रदर्शन श्रीमती दर्शना सकपाळ यांनी केले. वंदे मातरम्ने कार्यक्रमाची सांगता झाली.

# विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

## तळेगाव अंजनेरी शाखा, नाशिक

**उपकार्याध्यक्ष : श्री. अमोल म. जोशी**

**प्राचार्य : श्री. शरद कोठावदे**

### शिवजयंती

दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य श्री. शरद कोठावदे होते. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी शिवछत्रपतींच्या जीवन कार्याविषयी यथोचित भाषणे केली. श्री. मंथन वाळुंज यांनी छत्रपती शिवरायांच्या जीवनाविषयी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी शिवरायांच्या अंगी असलेले विविध गुण अंगीकारण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार श्रीमती प्रतीक्षा गोकुळे यांनी मानले. सूत्रसंचालन ज्ञानेश्वरी पगार या विद्यार्थिनीने केले.

### मराठी राजभाषा दिन

दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी विद्यालयात मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य श्री. शरद कोठावदे यांच्या शुभ हस्ते कविवर्य कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. यावेळी इ.८वी अ च्या विद्यार्थिनींनी कुसुमाग्रजांच्या कवितांचे गायन केले. तसेच अनेक विद्यार्थिनींनी मराठी भाषेची थोरवी सांगणारी गीते सादर केली. ग्रंथपाल सौ. अर्चना गीत यांनी 'मराठी भाषा : अभिजात भाषा' या विषयावर आपले विचार मांडले. प्राचार्य श्री. शरद कोठावदे यांनी मातृभाषा मराठीचे सखोल अध्ययन करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे आभार श्रीमती प्रतीक्षा गोकुळे यांनी मानले.

### राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहास संपन्न

दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. विज्ञान शिक्षक श्री. लक्ष्मण चव्हाण यांनी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्याचा उद्देश विद्यार्थ्यांना समजावून सांगितला. तसेच विद्यार्थ्यांनी विज्ञाननिष्ठ विचार करण्याचे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य श्री. शरद कोठावदे यांनी आपल्या दैनंदिन जीवनात विज्ञानातील विविध शोधांमुळे झालेल्या प्रगतीचा आढावा घेतला. सौ. स्वाती भावसार यांनी आभार मानले.

### क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले पुण्यतिथी व महिला दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

दि. १० मार्च २०२६ रोजी विद्यालयात जागतिक महिला दिन व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुण्यतिथी निमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी प्राचार्य श्री. शरद कोठावदे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महिला दिनाचे औचित्य साधून प्राचार्य श्री. शरद कोठावदे यांनी विद्यालयातील महिला शिक्षिका व कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार केला. अनेक विद्यार्थिनींनी यथोचित भाषणे केली. श्री. राजेंद्र जगताप, श्रीमती प्रीती राजपूत श्रीमती सोनाली तुंगार यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्याविषयी व महिला दिना विषयी सविस्तर माहिती दिली. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य श्री. शरद कोठावदे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करत समस्त महिला वर्गाला महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती प्रीती राजपूत यांनी केले.

***

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ–नाशिक

## पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभाग

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**

**मुख्याध्यापिका : सौ. प्रतिमा वैद्य**

### पूर्व प्राथमिक विभाग

**आजी आजोबा दिवस साजरा**

दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी आजी आजोबा व नातवंडासाठी खास कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या दिवशी शाळेत विविध प्रकारचे खेळ आयोजित करण्यात आले होते. अनेक पालकांनी खाद्य पदार्थांची छोटी दुकाने लावली. हा दिवस सर्व आजी आजोबांसाठी अविस्मरणीय असा ठरला सर्वांनी कार्यक्रमाचा आनंद लुटला.

### प्राथमिक विभाग

**छत्रपती शिवाजी महाराज जयंती**

विद्यार्थ्यांनी मराठा साम्राज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याविषयीची माहिती सांगण्यात आली. विद्यार्थी छत्रपती शिवाजी महाराज, जिजामाता, सोयराबाई, मावळे यांची वेशभूषा परिधान करून आले होते. पोवाडे, महाराजांचा पाळणा गायला व तसेच काहींनी ऐतिहासिक माहिती देखील सांगितली.

**भूगोल प्रदर्शन**

दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी इ. ६वी आणि ७वीच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रतिकृती तयार करून त्या सादर केल्या. विद्यार्थ्यांनी आपल्या प्रतिकृतीबद्दल माहिती दिल्यामुळे विषयाची संकल्पना अधिक स्पष्ट झाली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता, सहभाग आणि उत्साह वाढला, तसेच वर्गात सकारात्मक आणि प्रेरणादायी वातावरण तयार झाले.

**अभिनंदनीय**

दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी नाशिक लिटिल चॅम्प आयोजित विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. चित्रकला स्पर्धेचे विजेते खालीलप्रमाणे-

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता |
|---|---|
| कु. हेतवी शेवाळे | ५वी |
| कु. अंश जगदाळे | ७वी |
| कु. आराधना पिंगळे | ७वी |
| कु. रसिका वैश्य | २री |
| कु. अदिरा थोरात | २री |
| कु. राजवर्धन आहेर | ३री |
| कु. इशिता बंकापुरे | ३री |
| कु. स्वराली भावसार | ४थी |
| कु. स्फूर्ती बोरस्ते | ४थी |
| कु. जिज्ञा नारखेडे | १ली |
| कु. शिवांश घडवजे | १ली |
| कु. रुद्र अहिरे | १ली |

**नृत्यकलेतील विजेते**

| | |
|---|---|
| कु. समृद्धी सोनवणे | ७वी |
| कु. पूर्वा मुदगल | ५वी |

या सर्व विद्यार्थ्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

**गायन स्पर्धेतील विजेते**

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | पदक |
|---|---|---|
| कु. स्वरा मावची | ३री | सुवर्ण |
| कु. शिवन्या परदेशी | २री | रौप्य |
| कु. श्रिया अग्निहोत्री | २री | रौप्य |

**आंतरशालेय क्रिकेट स्पर्धा**

दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी प्रशालेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त आंतरशालेय टेनिस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांच्या हस्ते झाले. उद्घाटनाच्या वेळी सर्व शाळेतील विद्यार्थी स्पर्धकांना

मार्गदर्शन करण्यात आले. हवेत फुगे सोडून स्पर्धेची सुरूवात झाली नाशिक शहरातील जेम्स स्कूल, मातोश्री अकॅडमी, ब्लू बेल इंग्लिश स्कूल, न्यू ग्रेस अकॅडमी, गॅलॅक्सि इंग्लिश स्कूल शाळांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. प्रत्येक सामना पाच पाच षटकाचा होता. जो संघ जिंकेल तो पुढच्या सामन्यासाठी पात्र होईल असा नियम होता. या स्पर्धेत डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूलचा संघच इतर शाळेच्या संघापेक्षा सरस ठरला व विजयी झाला. विजेत्या संघाला कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांच्या हस्ते ट्रॉफी व 'मॅन ऑफ द मॅच' चे बक्षीस देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ रत्ना गोसावी यांनी केले.

**स्काउट गाईड शिबिर**

दि. १२ व १३ फेब्रुवारी २०२६ रोजी इ. ६वी व ७वीच्या विद्यार्थ्यांचा स्काउट गाईड कॅम्प प्रशालेच्या मैदानावर आयोजित करण्यात आला. या उपक्रमाची सुरूवात माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी ध्वजाला मानवंदना दिली, ध्वजगीत आणि प्रार्थना म्हटली. उपक्रमात विद्यार्थ्यांना गटांमध्ये विभागण्यात आले. प्रत्येक गटाने तंबू उभारले आणि त्याची सजावट केली. एकजुटीचे महत्त्व समजावून दिले, विद्यार्थ्यांनी चूल मांडून मसालेभात तयार केला. प्रत्येक विद्यार्थ्याने आपापल्या गटप्रमुखाच्या आदेशानुसार कामे केली. मसालेभात आणि तंबू सजावटीच्या कामावर परीक्षकांनी तंबूची सजावट, पाककृती, गटाची एकजूट आणि स्वच्छता या निकषांवर गुण दिले. विद्यार्थ्यांनी उपक्रमात अतिशय कौशल्यपूर्ण आणि उत्साहाने सहभाग नोंदवला. गाईड प्रशिक्षक सौ. माधुरी गवळी, सौ. रत्ना गोसावी, सौ. प्रमिला उदार आणि स्काउट प्रशिक्षक श्री. विजय साळवे यांनी मार्गदर्शन केले.

**कौतुकास्पद वार्ता**

दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी नाशिक जिल्हा कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विद्यार्थिनी कु. ईश्वरी तुषार पुराणिक इ. ५ वी हिने उत्कृष्ट कामगिरी करून ट्रॉफी जिंकली.

**तेजबहादूर जयंती**

दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी तेजबहादूर जयंती निमित विविध उपक्रम शाळेत राबविण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना तेजबहादूर यांच्या कार्याची माहिती सांगण्यात आली. 'हिंद दी चादर' या राज्य शासनाच्या उपक्रमांतर्गत घोष वाक्य लेखन व निबंध लेखन हे उपक्रम राबविण्यात आले.

**शिवजयंती उत्साहात संपन्न**

दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती शाळेत मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरूवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी शिवचरित्रावर आधारित नाटिका सादर केली. तसेच शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे वर्णन करणारा पोवाडा गायला आणि प्रेरणादायी भाषणे केली. काहींनी शिवरायांची पराक्रम गाथा सांगणारे किल्ले तयार करून आणले होते.

इ. १ ली व २ रीच्या विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या वेशभूषेत सहभाग घेतला, तर तिसरी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी चित्रकला, माहिती तक्ते, किल्ले आणि राजमुद्रा तयार करून उपक्रमात सहभाग नोंदवला. सौ. सोनल अमृतकर यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले आणि शिवजयंतीचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. या प्रसंगी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**रॉबर्ट बेडन पॉवेल जयंती**

दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी स्काउट गाइडचे संस्थापक रॉबर्ट बेडन पॉवेल यांच्या प्रतिमेचे पूजन केले. स्काउट गाइड स्थापनेचा उद्देश व कार्य याबद्दल इ. ६वी च्या विद्यार्थिनी कु. ईश्वरी गांगुर्डे व कु. हंसिका सोनवणे यांनी माहिती सांगितली.

**वार्षिक बक्षीस समारंभ**

दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी शाळेचे वार्षिक बक्षीस वितरण आयोजन करण्यात आले. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात घेतलेल्या विविध स्पर्धांमधील विजेत्यांचा मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी बक्षिसे देऊन गौरव केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**स्वातंत्र्यवीर सावरकर पुण्यतिथी**

दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी शाळेत स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांची पुण्यतिथी सन्मान व श्रद्धेने साजरी करण्यात आली. सावरकरांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन केले गेले. शिक्षिका सौ. प्रमिला उदार यांनी सावरकरांचा स्वातंत्र्यसंग्राम, चळवळीतील योगदान आणि धैर्य याबद्दल माहिती सांगितली, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती व प्रेरणा जागृत झाली. विद्यार्थ्यांनीही सावरकरांच्या जीवनातील शौर्य व संघर्षाची माहिती आत्मसात केली.

**मराठी राजभाषा दिन**

दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून पूजन केले. शिक्षिका सौ. रेखा जंजाळ यांनी मराठी साहित्य आणि भाषेचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावले. विद्यार्थिनी कु. ओजास्विनी घडवजे व कु. श्रावणी माळी इ. ५वी यांनी मराठी भाषेतील 'ळ' या अक्षरावर कविता सादर केली. मराठी दिनानिमित्त इ. १ली ते ७वीच्या विद्यार्थ्यांनी चित्रकला, कविता, नाटक व विविध उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला, ज्यामुळे मराठी भाषा व तिच्या सृजनशीलतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून जाणवले. मराठी दिनानिमित्त इ. १ली ते ७वीच्या विद्यार्थ्यांचे विविध उपक्रम घेण्यात आले.

| इयत्ता | घेण्यात आलेले उपक्रम |
|---|---|
| १ली | पारंपरिक पोशाख |
| २री | मराठी खाद्यपदार्थ |
| ३री | मराठी सणाचे देखावे |
| ४थी | कविता लेखन व तक्ते |
| ५वी | सुविचार व म्हणी |
| ६वी | कविता लेखन व कवीची माहिती लेखन |
| ७वी | मराठी निबंधलेखन |

**शैक्षणिक सहल**

दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी इ. १ली ते ४थीच्या विद्यार्थ्यांची सहल शिर्डीजवळील 'अगत्य ॲग्रो फार्म' येथे उत्साहात नेण्यात आली. विद्यार्थ्यांनी विविध खेळण्यांचा मनसोक्त आनंद लुटला. विद्यार्थ्यांसाठी अल्पोपहार व जेवणाची सोय केलेली होती. ही सहल विद्यार्थ्यांसाठी अत्यंत संस्मरणीय व आनंददायी ठरली.

**विज्ञान प्रदर्शन**

दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. इ. ५वी ते ७वीच्या विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक प्रतिकृती तयार करून आपल्या सृजनशीलतेचा आणि वैज्ञानिक विचारांचा परिचय दिला. शिक्षिका कु. पूजा गांगुर्डे व कु. मनीषा टर्ले यांनी विद्यार्थ्यांना विज्ञानदिनानिमित्त माहिती दिली आणि वैज्ञानिक दृष्टीकोन जोपासण्यासाठी मार्गदर्शन केले. विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांच्या हस्ते करण्यात आले. वैद्यकीय अधिकारी डॉ. मधुरा धारणे यांनी देखील प्रदर्शनाला भेट दिली, विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि त्यांना प्रोत्साहन दिले. ***

**आपला पत्ता बदललेला आहे का?**

**समाचार संदर्भातील आपला बदललेला पत्ता त्वरित कळवावा ही विनंती.**

**पत्ता कळविताना जुना व नवा दोन्ही पिन कोड तसेच आपला ईमेल आयडी सुध्दा कळवावा म्हणजे आपणास ई-समाचार पाठविणे सोईचे होईल.**

pvgsamachar@gmail.com

**या ईमेल आयडी वर कळवावे.**

**संपादक**

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

## माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग

**कार्यवाह : श्री. संजय नि. गुंजाळ**
**मुख्याध्यापिका : श्रीमती भारती पाटील**

### इ. १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन

इ. १०वी सन २०२५-२६ च्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात प्रार्थना व सरस्वती पूजनाने करण्यात आली. मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून कार्यवाह श्री. संजय गुंजाळ उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना लक्ष केंद्रित, शिस्तबद्ध व सकारात्मक दृष्टिकोन बाळगण्याची प्रेरणा दिली. प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक उत्कृष्टतेसोबतच जीवन कौशल्येही तितकीच महत्त्वाची असल्याचे पटवून दिले. मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणादायी संदेश देत मार्गदर्शन केले. पुणे विद्यार्थी गृहाचा अभिमानास्पद वारसा पुढे चालू ठेवण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी विद्यार्थ्यांनी त्यांच्या आठवणी आणि मनातील भावना व्यक्त केल्या. विद्यार्थी प्रतिनिधींनी आपल्या मनोगतामधून शिक्षक आणि संस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील शिक्षकांनी कार्यक्रमास उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. आभार प्रदर्शनानंतर विद्यार्थ्यांनी छायाचित्रणाचा आनंद घेतला. अल्पोपहाराने समारंभाची सांगता झाली.

### शिवजयंती उत्साहात साजरी

दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी शिवजयंती देशभक्तीच्या भावनेने व संस्कृतीचा वारसा जपत उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरूवात मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज याच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. इ. ९वीच्या विद्यार्थ्यांनी ‘शिवाजी महाराजांचे कार्य’ या विषयावर आपले विचार मांडले. शौर्य, न्याय आणि देशभक्ती या मूल्यांवर भर देत विद्यार्थ्यांनी शिवस्तुती, पोवाडा, राजमुद्रा व त्याचा अर्थ तसेच शिवाजी महाराजांच्या शौर्यावर आधारित सादरीकरण केले. याप्रसंगी विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### राज्यभाषा गौरव दिन उत्साहात साजरा

दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी मराठी भाषा दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी मराठी भाषा विभाग महाराष्ट्र शासन यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विश्व मराठी दिनाच्या भव्य शोभायात्रेत लेझीम नृत्याच्या माध्यमातून उस्फूर्त सहभाग नोंदवला. शोभा यात्रेदरम्यान विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचे महत्त्व, मराठी संस्कृती व परंपरेचे जतन तसेच मातृभाषेप्रती अभिमान व्यक्त करणारे संदेश देत नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. पारंपरिक वेशभूषा, शिस्तबद्ध संचलन आणि तालबद्ध लेझीम सादरीकरणामुळे उपस्थित नागरिकांकडून विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करण्यात आले.

याबरोबर शाळेतही मराठी राज्यभाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी कुसुमाग्रजांच्या काव्याचे सादरीकरण, राज्यभाषेविषयी प्रभावी भाषणे, वाचन, घोषवाक्य सादरीकरण अशा विविध कार्यक्रमांद्वारे मराठी भाषेप्रती आपली भावना व्यक्त केली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या वत्कृत्व, सादरीकरण, वाचन आणि अभिव्यक्ती कौशल्यांना वाव मिळाला.

या संपूर्ण उपक्रमातून शाळेत राबविण्यात येणाऱ्या कौशल्याधारित शिक्षणाची प्रभावी अंमलबजावणी प्रत्यक्ष कृतीतून दिसून आली. सराव सत्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नियोजन, जबाबदारीचे भान आणि परस्पर सहकार्याचे महत्त्व समजले. या उपक्रमासाठी मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील

शिक्षिका सौ. सोनिया राजवाडे तसेच मराठी विषयाच्या शिक्षिका सौ. मिताली जोशी यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी समृद्ध, प्रेरणादायी व संस्मरणीय ठरला. मराठी भाषेविषयी अभिमान निर्माण होऊन सांस्कृतिक जाणीव अधिक दृढ झाली.

**राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा**

दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा व विज्ञाना विषयी आवड निर्माण व्हावी या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. पाठ्यपुस्तकातील सर्व पाठांमधील कौशल्य बोध सृजनशीलतेने शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रयोगातून शिकवले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना विज्ञानाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व पटवून देत संशोधनाची वृत्ती जोपासण्याचे आवाहन केले. इ. ८वी व ९वीच्या विद्यार्थ्यांनी विज्ञान आणि तंत्रज्ञान यामध्ये सक्रिय सहभाग घेतला. शिक्षकांनी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, तसेच पर्यावरण व्यवस्थापन या विषयावर विविध मॉडेल्स व प्रात्यक्षिके सादर केली. काही शिक्षकांनी डेटा इंटरनेट आणि संगणक तंत्रज्ञानाचा वापर करून आकर्षक सादरी करणे केली. पर्यावरण संरक्षण, ऊर्जा बचत व स्वच्छता यासारख्या विषयांवर विशेष भर देण्यात आला. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक ज्ञानात भर पडली असून त्यांच्यात संशोधन करण्याची प्रेरणा निर्माण झाली. ***

## महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्था, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र संपत कांबळे**
**प्र. प्राचार्य : प्रा. पी. व्ही. शिंदे**

**कर्मचारी प्रशिक्षण**

कंत्राटी अधिव्याख्याता श्री. रोशन चौधरी यांनी १६ ते १८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत महाराष्ट्र राज्य फॅकल्टी डेव्हलपमेंट अकॅडमी, पुणे येथे कर्मचारी प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग घेतला. 'सीओपी इंटिग्रेशन अँड मायक्रो प्लानिंग फॉर आऊट कम बेस्ट' असा प्रशिक्षणाचा विषय होता. सदर प्रशिक्षणाचा उपयोग विद्यार्थ्यांना शिकवताना तसेच ऍक्रिटेशनच्या प्रक्रियेमध्ये होईल.

**अभिनव कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची संस्थेस शैक्षणिक भेट**

अभिनव कला महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक यांनी दि. १६ व १७ फेब्रुवारी २०२६ रोजी संस्थेस भेट दिली. कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमात मुद्रण विषयाचा समावेश आहे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मुद्रण कसे होते ? तसेच त्यासाठी लागणारा कच्चा माल आणि यंत्रसामग्री प्रत्यक्ष पाहत आली. दि. १६ फेब्रुवारी रोजी सुमारे ३५ विद्यार्थी व दि. १७ फेब्रुवारी रोजी ३० विद्यार्थी व शिक्षक यांच्या गटाने संस्थेला भेट दिली. संस्थेतील सर्व संबंधित कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

**पॅक व्हिजन एक्सपो २०२६**

प्रिंटिंग पॅकेजिंग क्षेत्रातील औद्योगिक प्राधिकरणासाठी पॅक व्हिजन एक्सपो २०२६ पी.आय.सी.सी., मोशी, पुणे येथे प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रदर्शनामध्ये प्रिंटिंग पॅकेजिंग उपयोगासाठी लागणारी यंत्र सामुग्री, कच्चामाल यासंबंधी स्टॉल होते. दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी संस्थेतील कर्मचारी व विद्यार्थ्यांनी प्रदर्शनास भेट दिली.

**क्रीडा स्पर्धा**

आय. इ. डी. एस. एस. ए. डी टू झोन अंतर्गत पदविका महाविद्यालयातील क्रीडा स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांनी क्रिकेट या क्रीडा प्रकारात सहभाग घेतला. प्रथम मॅच जिंकून विद्यार्थी दुसऱ्या फेरी पर्यंत पोहोचले.

संस्थेतील विद्यार्थ्यांसाठी अंतर्गत क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामधे बुद्धिबळ, कॅरम,

व्हॉलीबॉल, बॉक्स क्रिकेट इ. क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यात आला होता. विद्यार्थ्यांमध्ये सांघिक भावना निर्माण व्हावी व त्यांच्या क्रीडा गुणांना वाव मिळावा यासाठी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा स्पर्धांचे संयोजन प्रा. शंकर शेळकंदे व श्री. विष्णू बोत्रे यांनी केले.

**मराठी भाषा गौरव दिन**

दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना मराठी भाषा गौरव दिनाचे महत्त्व सांगण्यात आले. मराठी भाषेमध्ये विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. या स्पर्धांसाठी परीक्षक म्हणून प्रा. रोशन चौधरी व श्री. सागर बंडगर यांनी काम केले.

**जागतिक मुद्रण दिन साजरा**

दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी 'जागतिक मुद्रण दिन' शैक्षणिक वातावरणात साजरा करण्यात आला. मुद्रण कलेचा ऐतिहासिक आणि तांत्रिक प्रवास याविषयी विद्यार्थ्यांना सखोल माहिती देण्याच्या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मुद्रण प्रक्रियेची सुरूवात जोहान्स गटेनबर्ग यांनी विकसित केलेल्या चल अक्षर मुद्रण यंत्रापासून होऊन आधुनिक डिजिटल ऑफसेट स्क्रीन फ्लेक्स सोलापूर डिजिटल प्रिंटिंग तंत्रज्ञानापर्यंत झालेल्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्री. तेजस समर्थ व श्री. तुषार समर्थ, संचालक साई पॅक इंडिया लि. हे उपस्थित होते. त्यांनी आधुनिक पॅकेजिंग उद्योगातील संधी शाश्वत व पर्यावरण पूरक पद्धती, ऑटोमेशन कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच गुणवत्ता नियंत्रण प्रणालीचे वाढते महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. उद्योग क्षेत्रात तांत्रिक कौशल्याबरोबर व्यावसायिक दृष्टिकोन संशोधन वृत्ती आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

**फ्लेक्सोग्राफी विषयावर विशेषतज्ज्ञ व्याख्यानाचे आयोजन**

श्री. मोहनीश साटम, फ्लेक्स तज्ज्ञ, सीनियर सेल्स रिप्रेझेंटेटिव्ह, साउथ एशिया, डु पॉंट यांच्या मार्गदर्शनाखाली व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी आधुनिक फ्लेक्स ऑफ प्लेट तंत्रज्ञान, प्री प्रेस प्रक्रिया, युवी व लेड क्युअरिंग तंत्रज्ञान आणि पॅकेजिंग मुद्रणातील गुणवत्ता नियंत्रण याविषयी सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्र. प्राचार्य श्री. परमेश्वर शिंदे यांनी स्वागतपर भाषण करताना संस्थेची शैक्षणिक परंपरा, प्रयोगशाळा सुविधा आणि उद्योग संलग्न अभ्यासक्रमांचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अक्षय रावेतकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. शंकर शेळकंदे यांनी करून दिला. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. रोशन चौधरी यांनी केले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्सुकतेने नवीन तंत्रज्ञानाविषयी प्रश्न विचारून तज्ज्ञांकडून सविस्तर माहिती घेतली. प्रश्नोत्तराच्या सत्रामुळे कार्यक्रम अधिक संवादात्मक आणि ज्ञानवर्धक ठरला. ***

## * नम्र विनंती *

**देणगीदार व हितचिंतक यांनी संस्थेच्या बँक खात्यावर ऑनलाईन देणगी रक्कम पाठविल्यानंतर कृपया संस्थेच्या ई-मेल आयडीवर किंवा संस्थेच्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून, देणगी देणाऱ्याचे पूर्ण नाव, पत्ता व देणगी देण्याचे निमित्त आणि विनियोग इ. माहिती कळवावी. तसेच पॅन कार्डची प्रत पाठवावी. बँकेत देणगी रक्कम जमा झाल्यावर फक्त रक्कम समजते. बाकी सविस्तर माहिती कळत नाही.**

**ई-मेल : pvgheadoffice@gmail.com**

**दूरध्वनी क्रमांक : ०२०-२४४७०९२७ / २४४७०५७३**

**राजेंद्र बोऱ्हाडे**
**कार्याध्यक्ष**

# अभियांत्रिकी व एस.एस.धामणकर व्यवस्थापन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय नि. गुंजाळ**
**प्राचार्य : डॉ. व्ही. जे. गोंड**

### मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

दि. २७ फेब्रुवारी २०२६ महाविद्यालयात कविवर्य विष्णू वामन शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने 'मराठी भाषा गौरव दिन' उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रमुख पाहुणे श्री. अंकुश सहाणे व महाविद्यालयाच्या व्यवसाय व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. सोनाली जाधव यांच्या हस्ते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरूवात करण्यात आली. कार्यक्रमासाठी सर्व विभाग प्रमुख, अकॅडेमिक डीन, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थिनी कु. खुशी चावरे हिने केले. प्रमुख पाहुणे श्री. अंकुश सहाणे यांनी आपल्या भाषणात बोलताना शिवकालीन बोलली गेलेली मराठी भाषा व आजच्या काळात बोलली जाणारी मराठी भाषा यावर भाष्य केले. आजच्या तरुण पिढीने रोजच्या जीवनात मराठीचा वापर केला पाहिजे, असे ते म्हणाले. अनेक विद्यार्थ्यांनी मराठी भाषेमधील कवितेचे सौंदर्य उलगडून सांगितले.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त निबंध, रांगोळी व काव्यवाचन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यातील विजेत्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. विद्यार्थी कल्याण मंडळाचे अधिकारी प्रा. सुहास धारणे यांनी आजच्या युगातील मराठी संदर्भात कविता सादर केली.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्वरचित पोवाडा सादर केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. यश मिरकर व कु. खुशी चावरे हिने केले. कु. भाग्यश्री काकड हिने सर्वांचे आभार प्रदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सहाय्यक ग्रंथपाल श्री. निवृत्ती डावखर, श्री. शुभम मुळे, प्रा. सोनाली अहिरे, प्रा. नीलेश कुलकर्णी, प्रा. योगिता मेधाने, प्रा. शिवाली माळी, प्रा. स्वाती डी. पिंगळे, प्रा. शीतल ए. बाराहाते आणि प्रा. विजय कुरकुरे यांनी मोलाचे सहकार्य केले.

### इंडिया स्किलस स्पर्धेत महाविद्यालयाचे यश

विद्यार्थिनी कु. मानसी पाटील आणि विद्यार्थी कु. आदित्य जगताप यांनी इंडिया स्किल्स स्पर्धेच्या राज्यस्तरीय फेरीत सी.एन.सी. मशीन विभागात प्रथम क्रमांक मिळवला व आदित्य पाटील याने द्वितीय क्रमांक मिळवला. महाविद्यालाच्या यांत्रिकी विभागात प्रशिक्षण घेत असलेल्या स्किल कॅडमॅक्सचे विद्यार्थी कु. पियुष पडियार व कु. आकाश आहेर यांनी सुद्धा राज्यस्तरावर प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविला. कु. पियुष पडियार हा विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. सदर विद्यार्थ्यांना स्किल कॅडमॅक्सचे श्री. महेश चाळके यांचे मार्गदर्शन लाभले. या कामगिरीसाठी कु. पियुष पडियार याचा नाशिक महानगरपालिकेच्या महापौर हिमगौरी आहेर-आडके व उपमहापौर विलास शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

### सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना

महाविद्यालयाच्या आर्टिफिशिअल इंटेलिजन्स आणि डेटा सायन्स विभागात अत्याधुनिक सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना करण्यात आली आहे. या उपक्रमासाठी नाशिकस्थित विंजित टेक्नॉलॉजी प्रा. लि. यांनी विभागाला १४ मॅकबुक लॅपटॉप्स देणगी स्वरूपात प्रदान केले आहेत. या उपक्रमावेळी विंजित टेक्नॉलॉजीचे श्री. मकरंद सावरकर, ॲड. अश्विनी देशपांडे, सौ. सीमा लेले आणि श्री. संजय बोरसे आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना या देणगीमुळे आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण, संशोधन आणि प्रकल्प विकासासाठी अधिक सक्षम वातावरण उपलब्ध होणार आहे. विशेषतः आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, डेटा सायन्स, मशीन लर्निंग आणि ॲप डेव्हलपमेंट यांसारख्या क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळण्यास मदत होईल. या उपक्रमाला कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी शुभेच्छा दिल्या. या उपक्रमासाठी प्राचार्य डॉ. व्ही. जे. गोंड, उपप्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव आणि सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. या उपक्रमाचे आयोजन प्रा. यु. बी. भडांगे आणि प्रा. एस. एन. बैरागी यांनी केले.

प्राचार्य डॉ. व्ही. जे. गोंड आणि विभागप्रमुख प्रा. संकेत चोरडिया यांनी विंजित टेक्नॉलॉजी प्रा. लि. यांचे या सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार मानले असून, उद्योग-संस्था सहकार्यामुळे विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाला आणि नवोन्मेषी संशोधनाला मोठी चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे. हा उपक्रम विद्यार्थ्यांना उद्योगमान्य कौशल्ये विकसित करण्यासाठी आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे

## युरेकॉन २०२६ उत्साहात संपन्न

महाविद्यालयात 'युरेकॉन २०२६' हा तांत्रिक व सांस्कृतिक महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. संगणक अभियांत्रिकी विभाग व संगणक अभियांत्रिकी विद्यार्थ्यांची संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने विविध तांत्रिक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये आयडियाथॉन, टेक केबीसी, प्रॉम्प्ट इंजिनिअरिंग आणि ट्रेझर हंट यांचा समावेश होता. याशिवाय विद्यार्थ्यांसाठी अतांत्रिक स्पर्धा देखील आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह आणि स्पर्धात्मक वातावरण निर्माण झाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संगणक विभागाचे विभाग प्रमुख प्रो. जे. वाय. कापडनिस यांनी केले.

प्राचार्य डॉ. व्ही. जे. गौंड यांनी आपल्या भाषणात सांगितले की, हा केवळ तांत्रिक महोत्सव नसून नवकल्पना, बुद्धिमत्ता, सर्जनशीलता आणि सहकार्य यांचा उत्सव आहे. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांची तांत्रिक क्षमता, नेतृत्वगुण आणि संघटन कौशल्य दिसून येते. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव, सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता कु. आर्या वाघमारे हिने केलेल्या आभार प्रदर्शनाने करण्यात आली.

## जागतिक वन्यजीव दिनानिमित्त पोस्टर स्पर्धेचे आयोजन

महाविद्यालयाच्या आर्टिफिशिअल इंटेलिजन्स आणि डेटा सायन्स विभागामार्फत जागतिक वन्यजीव दिनानिमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये वन्यजीव संवर्धन, जैवविविधता आणि पर्यावरण संरक्षण याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी नेचर कन्झर्वेशन सोसायटी ऑफ नाशिकच्या फील्ड ऑफिसर मिसेस पूजा कोथुळे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पोस्टर्सचे कौतुक करत वन्यजीवांचे संरक्षण आणि पर्यावरण संतुलन राखण्याचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच त्यांनी वन्यजीव संरक्षण आणि जैवविविधतेचे महत्त्व या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे सादरीकरण केले.

या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी वन्यजीव संरक्षण, जैवविविधतेचे महत्त्व, पर्यावरण संतुलन आणि वन्यजीवांच्या संरक्षणासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग यांसारख्या विषयांवर आकर्षक आणि माहितीपूर्ण पोस्टर्स सादर केली. परीक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता, विषय मांडणी आणि संदेशाच्या प्रभावीपणाच्या आधारे विजेत्यांची निवड केली. स्पर्धेत दोन विजेत्या गटांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. यु. बी. भडांगे आणि प्रा. एस. एन. बैरागी यांनी केले. ***

# मुक्तांगण इंग्लिश मिडियम स्कूल, सदाशिव पेठ शाखा, पुणे ३०

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**

**मुख्याध्यापिका : सौ. शिल्पा चितारे (प्राथमिक)**

**मुख्याध्यापिका : सौ. मनीषा नाईक (माध्यमिक)**

## पूर्व प्राथमिक विभाग

### फूड ॲक्टिव्हिटी

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विद्यार्थ्यांनी फायरलेस कुकिंग केले. नर्सरी विभागाने मटर पोटॅटो सँडविच व कोकम सरबत, ज्युनिअर केजी विभागाने भेळ, सिनियर केजी अ विभागाने शेव, आणि सिनियर ब विभागाने काकडी टोमॅटो सँडविच असे पदार्थ तयार केले होते. विद्यार्थ्यांनी शेफ कॅप व ॲप्रन घातले होते. मुख्याध्यापकांनी आणि विद्यार्थ्यांनी या पदार्थांचा मनसोक्त आनंद लुटला.

### छत्रपती शिवाजी महाराज जयंती

बुधवार दि. १८ फेब्रुवारी २०२६ बुधवार रोजी शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाबाई व मावळे यांच्या वेशभूषा केल्या होत्या. विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ आणि महाराजांचे विश्वासू मावळे यांच्या विषयी माहिती सांगितली. शिवाजी महाराजांच्या ढाल व तलवारीच्या चित्रांवर रंग भरणे स्पर्धा घेण्यात आली.

### भाजीपाला बाजार दिवस

शुक्रवार दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी विद्यार्थ्यांनी 'मार्केट डे' साजरा केला. विद्यार्थ्यांनी शेतकरी पोशाख परिधान केला होता. दोनही विभागाच्या मुख्याध्यापिकांनी भाजीपाला बाजाराचे उद्घाटन करून कार्यक्रमाला सुरूवात केली. नर्सरी विभागाने पालेभाजी, जूनीअर के. जी. विभागाने फळभाजी आणि सिनीअर केजी विभागाने फळे व कडधान्य अशा प्रकारे वर्गीकरण करण्यात आले होते. पालक व शिक्षकांनी भाज्या विकत घेऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

### मदतनीस दिन

दि. २६ फेब्रुवारी २०२६ गुरुवार रोजी 'मदतनीस दिन' साजरा करण्यात आला. सर्व शिक्षकांनी यात सहभाग घेतला होता. नर्सरी शिक्षिका इस्त्रीवाला व बागाईतदार झाले होते. जूनीअर के. जी. च्या शिक्षिका पेंटर, सिनीअर के. जी. च्या शिक्षिका शिंपी व डॉक्टर झाल्या होत्या. यामध्ये काही विद्यार्थ्यांनी पोलीस, शिक्षिका, ट्रॅफिक पोलीस, भाजीवाला व फुलवाला अशा भूमिका केल्या. प्रत्येक सहभागीने आपण परिधान केलेल्या वेशभूषेचे विषयी थोडक्यात माहिती सांगितली.

## माध्यमिक विभाग

### मराठी राजभाषा गौरव दिन उत्साहात साजरा

दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी मराठी राजभाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रशालेच्या दोन्ही विभागांच्या मुख्याध्यापिका सौ. मनीषा नाईक व सौ. शिल्पा चितारे यांनी भूषवले. शाळेच्या परिसरात ग्रंथ दिंडी काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी विविध लेखक, संत, छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ यांच्या वेशभूषा केल्या होत्या. यावेळी विद्यार्थ्यांनी मराठी भाषेतून वेगवेगळे सांस्कृतिक कलाविष्कार सादर केले. मुख्याध्यापिका सौ. मनीषा नाईक यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे महत्त्व समजावून सांगितले. मराठी भाषेचे जीवनातील स्थान याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. श्रद्धा ताम्हणकर, सूत्रसंचालन सौ. सोनाली पैलवान यांनी केले व आभार प्रदर्शन सौ. सोनाली शिंदे यांनी केले.

### सायन्स व जीके एक्झिबिशन

दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी शाळेच्या आवारात सायन्स व जीकेचे प्रयोग सादर करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी फ्रुट्स, रेनी सीझन, मॅग्नेटिक क्लींजीनेस तसेच हॉस्पिटल नेचर म्युझिकल, पाणी वाचवा असे विविध प्रोजेक्ट्सचे सादरीकरण करण्यात आले होते.

## राष्ट्रीय ॲबॅकस स्पर्धेत दैदिप्यमान यश

प्रशालेतील ५ विद्यार्थिनी 'नॅशनल ॲबॅकस कॉम्पिटिशन २०२६' मध्ये प्रविष्ट झाल्या होत्या. या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत ३ विद्यार्थिनींना प्रादेशिक यश मिळाले, आणि २ विद्यार्थिनी दुसऱ्या राऊंड मध्ये सहभागी झाल्या. यामध्ये एका विद्यार्थीनीला प्रादेशिक यश व दुसऱ्या विद्यार्थिनीला द्वितीय क्रमांक मिळाला. या सर्व विद्यार्थिनींना ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. ॲबॅकसच्या सहाय्याने अत्यंत गुंतागुंतीची गणिते केवळ काही सेकंदांत सोडवण्याचे आव्हान विद्यार्थ्यांसमोर होते. या ५ विद्यार्थिनींचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !

## मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन

दि. ४ मार्च २०२६ रोजी श्री. दिनेश यांचे 'कॉमर्स क्षेत्रातील उपलब्ध संधी' या विषयावर इ. ८वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. वैद्यकीय क्षेत्रातील आव्हाने आणि त्या क्षेत्रात पदवी मिळवण्यासाठी लागणारा खर्च लक्षात घेता विद्यार्थ्यांनी 'अर्थ' विषयक क्षेत्रात प्रवेश घेऊन त्यातच करिअर करण्याचा जरूर विचार करावा, असे मत त्यांनी व्यक्त केले. या क्षेत्रात नवनवीन संधी कायम उपलब्ध होत आहेत आणि त्यात प्राविण्य मिळवले तर उत्तरोत्तर भरभराटच होईल अशी खात्री त्यांनी दर्शविली. विद्यार्थ्यांच्या अनेक प्रश्नांना त्यांनी समाधानकारक उत्तरे देऊन त्यांच्या शंकांचे निरसन केले. ***

### ✻ मुक्तांगण इंग्लिश मिडियम स्कूल, सदाशिव पेठ शाखा, पुणे ३० ✻



नॅशनल ॲबॅकस कॉम्पिटिशन २०२६' या स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थिनींसमवेत मुख्याध्यापिका सौ. शिल्पा चितारे आणि सौ. मनीषा नाईक



दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी 'मराठी राजभाषा गौरव दिन' प्रसंगी संतांची वेशभूषा केलेले विद्यार्थी

# कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**

**प्राचार्य : डॉ. संजयकुमार गायकवाड**

## पोवाडा व प्रेरणादायी व्याख्यानातून शिवजयंती उत्साहात साजरी

दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती पारंपरिक आणि प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरूवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व शिवप्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले श्री. सुदीपजी गायकवाड (समाज प्रबोधनकार व सामाजिक कार्यकर्ते) यांनी शिवरायांच्या नेतृत्वगुणांचे, दूरदृष्टीचे आणि व्यवस्थापन कौशल्याचे महत्त्व अधोरेखित केले. स्वराज्य म्हणजे जबाबदारी आणि स्वाभिमान हा संदेश देत त्यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, शिस्त आणि समाजसेवा यांचे महत्त्व पटवून दिले. उपप्राचार्य रेखा जोशी यांनी अतिशय सुंदरतेने महाराजांच्या जीवनपटलावर आधारित पोवाडा गाऊन शिवरायांचे विचार आजच्या तरुणांसाठी प्रेरणादायी असून त्यांच्या आदर्शाचा अवलंब करूनच उज्ज्वल भविष्य घडविता येईल असा विश्वास यावेळी व्यक्त केला. संचालक डॉ. राजेंद्र कांबळे, आय क्यू ए सी समन्वयक डॉ. स्वाती जोशी तसेच सर्व विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शिवजयंतीच्या शुभेच्छा देत शिवप्रतिमेला नमन केले. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक पार्थ मोरे व मानसी राठोड, प्रथम वर्ष विज्ञान विभाग यांनी जोशपूर्ण पोवाड्यांच्या माध्यमातून शिवरायांचे शौर्य, पराक्रम आणि स्वराज्य स्थापनेची गाथा सादर करत जणू शिवकालीन प्रसंगांचे जिवंत चित्रण उभारले. या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन राष्ट्रीय सेवा संघाचे समन्वयक डॉ. विशाल डावरे व शारीरिक शिक्षण संचालक श्री. विवेक झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व एनएसएस स्वयंसेवकांनी उत्तमरीत्या पार पाडले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापिका स्नेहल जाधव व आभार प्रदर्शन सहाय्यक प्राध्यापिका उर्मिला पाटील यांनी केले.

## निर्भय कन्या अभियान

निर्भय कन्या अभियान हे मुलींमध्ये आत्मविश्वास, धैर्य आणि सुरक्षिततेची जाणीव निर्माण करण्यासाठी राबवले जाणारे अत्यंत महत्त्वाचे अभियान आहे. या अभियानात स्वसंरक्षण प्रशिक्षणाला विशेष महत्त्व देण्याच्या उद्देशाने दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी महाविद्यालयाच्या व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या प्रांगणात खास विद्यार्थिनींसाठी हा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन संचालक डॉ. राजेंद्र कांबळे व प्रमुख वक्त्या प्रतिक्षा शिंदे (मार्शल आर्ट तज्ज्ञ) यांच्या हस्ते करण्यात आले. संचालक डॉ. राजेंद्र कांबळे यांनी आजच्या धकाधकीच्या युगात मुलींसाठी आत्मसंरक्षणाचे धडे व सजगता किती महत्त्वाची आहे, हे उदाहरण देऊन स्पष्ट केले. उपप्राचार्य रेखा जोशी व आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. स्वाती जोशी यांनी आत्मसंरक्षणाचे ज्ञान शारीरिक तंदुरुस्ती बरोबरच मानसिक बळ वाढवते, भीतीवर मात करून निर्भयपणे वावरण्याची सवय लावते तर अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहण्याची प्रेरणा देते अशा मार्मिक शब्दात विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास उपस्थिती लाभलेल्या मार्शल आर्ट ट्रेनर प्रतिक्षा शिंदे यांनी अचानक उदभवलेल्या धोकादायक प्रसंगी स्वतःचे संरक्षण कसे करावे याचे तंत्रज्ञान आणि कौशल्याचे प्रात्यक्षिक दाखवत विद्यार्थिनींना निर्भय बनविण्यासाठी मोलाचा हातभार लावला. हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी विद्यार्थी कल्याण मंडळ अधिकारी सहाय्यक प्राध्यापिका नीता रानभरे, विज्ञान विभाग प्रमुख सहाय्यक प्राध्यापक महादेव पिसाळ तर सहाय्यक प्राध्यापिका पूनम बनसोडे यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन महाविद्यालयाच्या सहाय्यक प्राध्यापिका स्नेहल

जाधव यांनी केले. कार्यक्रमाची सांगता विद्यार्थिनींना अल्पोपहार देऊन करण्यात आली.

### सिल्वर सिंफनी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा

दि. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी महाविद्यालयामध्ये सिल्वर सिंफनी इंटर कॉलेज फेस्ट २०२६ आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात पुणे व परिसरातील १२ महाविद्यालयांमधील १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्साही सहभाग नोंदविला. या उपक्रमांतर्गत आयडियाथॉन, हॅकेथॉन व रिसर्च पेपर सादरीकरण या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या आई. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. स्वाती जोशी यांनी अशा स्पर्धांमधील सहभागामुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशील विचारांना चालना मिळते तसेच समस्या ओळखून त्यावर नवीन आणि उपयुक्त उपाय शोधण्याची क्षमता वाढते, अल्प वेळेत काम पूर्ण करण्याची वेगवान निर्णय क्षमता विकसित होते असे सांगितले. संचालक डॉ. राजेंद्र कांबळे यांनी अशा स्पर्धा विद्यार्थ्यांना भविष्याच्या स्पर्धात्मक जगासाठी तयार करतात असे प्रतिपादन केले. प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड व उपप्राचार्य रेखा जोशी यांनीही उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत अशा उपक्रमांमध्ये नेहमीच सहभागी होण्याचा सल्ला दिला. हॅकेथॉन स्पर्धेचे समन्वयक सहाय्यक प्राध्यापक प्रशांत देशमुख व सहाय्यक प्राध्यापिका रूपाली जोशी, आयडियाथॉन स्पर्धेचे आयोजन सहाय्यक प्राध्यापिका सपना मालपाणी व सहाय्यक प्राध्यापिका पुनम काळे तसेच रिसर्च पेपर सादरीकरण सहाय्यक प्राध्यापिका वनिता म्हस्के व सहाय्यक प्राध्यापिका स्नेहल जाधव यांनी सहाय्यक प्राध्यापिका तेजल चोथे आणि सहाय्यक प्राध्यापिका वर्षा दौंड यांच्या मार्गदर्शनाखाली या सर्व स्पर्धांचे आयोजन व नियोजन यशस्वीरित्या पार पाडले.विजेत्या विद्यार्थ्यांना रोख रु. ३,०००/- तर उपविजेत्या विद्यार्थ्यांना रु. १५००/- बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

### स्टार्टअप टॉक सिरीज

दि. ७ व १४ फेब्रुवारी २०२६ रोजी महाविद्यालयाच्या व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाच्या संयुक्त विद्यमाने स्टार्टअप टॉक सीरीजचे यशस्वीरीत्या आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून श्री. पुष्कर औरंगाबादकर (फाउंडर अँड डायरेक्टर, लीगसी प्लॅटफॉर्म प्रायव्हेट लिमिटेड) आणि श्री. अनिकेत धारिया (डायरेक्टर, ऍपलॉजिक टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड) हे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना नवीन कल्पना मांडण्याची आणि त्या कल्पकतेची अंमलबजावणी करण्याची दिशा दर्शविली तसेच नेतृत्वगुण, समस्या सोडवण्याची क्षमता, निर्णयक्षमता, संवाद कौशल्य विकसित करत विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढविणारे मोलाचे मार्गदर्शन केले. तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहकार्याने आयोजित स्टार्टअप टॉक सिरीज हा उपक्रम विद्यार्थ्यांना केवळ नोकरीसाठी नव्हे तर नोकरी देणारे बनवण्यासाठी प्रेरित करणारा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरेल, तसेच विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची संस्कृती विकसित होईल अशा मार्मिक शब्दांमध्ये संचालक डॉ. राजेंद्र कांबळे यांनी व्यक्त केले. तसेच प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड, उपप्राचार्य रेखा जोशी, आय क्यू ए सी समन्वयक डॉ. स्वाती जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन विज्ञान विभाग प्रमुख सहाय्यक प्राध्यापक महादेव पिसाळ यांनी विद्यार्थी कल्याण मंडळाच्या अध्यक्षा सहाय्यक प्राध्यापिका नीता रानभरे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तमरीत्या पार पाडले. या कार्यक्रमास २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्साहाने व आनंदाने सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन महाविद्यालयाच्या सहाय्यक प्राध्यापिका ज्योती पाटील व सहाय्यक प्राध्यापिका शलाका बेहरे यांनी उत्तमरीत्या पार पाडले.

***

# महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**
**प्र. प्राचार्य : डॉ. ज्ञानेश्वर दाते**

### शुभेच्छा समारंभ

सोमवार दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी इ. १०वीच्या विद्यार्थ्यांचा शुभेच्छा समारंभ उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशालेचे प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते हे होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्थेचे प्राचार्य श्री. पी. व्ही. शिंदे हे होते. कार्यक्रमाचा आरंभ ईशस्तवनाने करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत अध्यापिका सौ. सुनंदा भाईक यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांनी करून दिला. याप्रसंगी विद्यार्थी कु. दौंडकर जयेश, कु. बडे शाहूराज, कु. चैतन्य पवार, कु. मंजूषा शिंदे इ. १० वी यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यापिका सौ. सुजाता व्हनमाने यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुणे प्राचार्य पी. व्ही. शिंदे , एमसीव्हीसीचे अध्यापक श्री मल्लिनाथ वाघमोडे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या अध्यापिका सौ. रूपाली चौथाई यांनी करिअरच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी फलकलेखन प्रशालेचे अध्यापक श्री. युवराज मिरखलकर यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापिका सौ. प्राजक्ता चोपडे यांनी केले. या कार्यक्रमास प्रशालेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी सर्वांना अल्पोपहार देण्यात आला. अध्यापिका श्रीमती वैशाली मोघे यांनी आभार प्रदर्शन केले आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

### शिवजयंती

शुक्रवार दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचा आरंभ शिवाजी महाराजांची मूर्ती पालखीमध्ये ठेवून वाजत गाजत 'शिवाजी महाराज की जय' अशा प्रकारच्या घोषणा देत मिरवणूकीने झाला. यानंतर प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांनी शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन केले. प्रशालेच्या सर्व शिक्षकांनीही शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून पूजन केले. याप्रसंगी शिवाजी महाराजांवरील एक गीत सादर करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यापिका श्रीमती वैशाली मोघे यांनी केले. विद्यार्थी कु. साई घरत इ. ५ वी याने पोवाडा गायन केले. कु. साईराज वटाणे याने शिवाजी महाराजांच्या कार्याची माहिती मनोगतातून व्यक्त केली. विद्यार्थिनी कु. तनिष्का दोन्हे व कु. तनिष्का उंडे यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थी कु. प्राण मायणीकर व कु. प्रशांत नागदे इ. ७वी तसेच कु. प्रथमेश विधाते इ. ६वी या विद्यार्थ्यांनी पोवाडा गायन केले. कु. सार्थक घुले, कु. मुक्ता अगरवाल, कु. अजित जिवरग, कु. प्राण मायणीकर इ. ७वी या विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. कु. प्रशांत नागदे इ. ७वी या विद्यार्थ्याने शिवाजी महाराजांवर चारोळ्या सादर केल्या. प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांनी प्रशालेतील विद्यार्थ्यांना शिवाजी महाराजांच्या कार्याची माहिती मनोगतातून सांगितली. या कार्यक्रमास प्रशालेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशालेच्या अध्यापिका सौ. सविता जगताप यांनी केले. कार्यक्रमाची सांगता अध्यापिका सौ. प्राजक्ता चोपडे यांच्या आभारप्रदर्शनाने करण्यात आली.

### मराठी राजभाषा दिन

महाराष्ट्र विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, पुणे ३० येथे शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी 'मराठी राजभाषा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरूवात वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस प्रशालेचे प्रभारी प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून


झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यापिका सौ. सविता जगताप यांनी केले. याप्रसंगी इ. ५वी ते ९वीच्या विद्यार्थ्यांनी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या कार्याविषयी मनोगत व्यक्त केले. प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांनी कुसुमाग्रज यांच्या कार्याविषयी तसेच मराठी साहित्याविषयी इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. या कार्यक्रमाचे फलकलेखन प्रशालेचे अध्यापक श्री. युवराज मिरखलकर यांनी केले. या कार्यक्रमास प्रशालेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, प्रशालेतील इ. ५वी ते ९वीचे विद्यार्थी उपस्थित होते. अध्यापिका सौ. सुजाता व्हनमाने यांनी आभार प्रदर्शन केले आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

**विज्ञान दिन**

शनिवार दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी 'विज्ञान दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या आरंभी प्रशालेचे निवृत्त शिक्षक व माजी उपप्राचार्य श्री. दातार यांनी डॉ. सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. याप्रसंगी त्यांनी प्रशालेतील इ. ५वी ते ९वीच्या विद्यार्थ्यांना विज्ञान व गणित यामधील प्रयोग दाखवले. टाकाऊ वस्तूंपासून विविध उपकरणे कशी तयार करता येतात याचे प्रात्यक्षिक त्यांनी प्रशालेतील विद्यार्थ्यांना करून दाखवले. राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून विद्यालयांमध्ये विविध विज्ञान स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. प्रशालेत इ. ८वी व ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'विज्ञान प्रश्नमंजूषा स्पर्धा' आयोजित करण्यात आली. यामध्ये इ. ९वीच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. तसेच इ. ६वी व ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी विज्ञान रांगोळी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या रांगोळी स्पर्धेत विद्यार्थिनींनी सहभाग घेऊन विज्ञानातील आकृत्या, रांगोळीने काढल्या. इ. ८वी व ९वीच्या विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रदर्शन, पोस्टर प्रदर्शन, रांगोळी प्रदर्शन भरवले होते. इ. ७वीच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रयोगांचे सादरीकरण केले. याप्रसंगी प्रशालेत डिजिटल पोस्टरचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. यामध्ये प्रशालेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन विज्ञान पोस्टर तयार केले. या सर्व विद्यार्थ्यांना विज्ञान शिक्षक श्री. अनभुले आणि श्री. प्रशांत बोंबलट यांनी मार्गदर्शन केले. या प्रदर्शनाचा लाभ शिशुनिकेतन मराठी माध्यमाचे विद्यार्थी, महाराष्ट्र विद्यालयातील सर्व विद्यार्थी शिक्षक व पालक यांनी घेतला. विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन गोपाळ हायस्कूल, पुणे येथील प्राचार्य श्री. विजय पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. ***


**निधन वार्ता**

* संस्थेचे मा. वि. श्री. मयुर विष्णू रत्नपारखी व श्री. आशुतोष विष्णू रत्नपारखी यांचे वडिल श्री. विष्णू नरहरी रत्नपारखी यांचे दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी आई श्रीमती जयश्री विष्णू रत्नपारखी यांचे दि. ८ मार्च २०२६ रोजी दुःखद निधन झाले. ते संस्थेचे देणगीदार होते.



प्रवीण कुलकर्णी

* संस्थेचे मा. वि. श्री. प्रवीण कुलकर्णी यांचे दि. १४ मार्च २०२६ रोजी दुःखद निधन झाले.



रविंद्र कोनकर

* संस्थेचे मा. वि. श्री. रविंद्र नारायण कोनकर यांचे दि. १४ मार्च २०२६ रोजी दुःखद निधन झाले.

* संस्थेचे माजी संचालक कै. श्री. प. भ. कुलकर्णी यांच्या पत्नी श्रीमती उज्ज्वला पद्माकर कुलकर्णी यांचे दि. २३ मार्च २०२६ रोजी दुःखद निधन झाले.

**ईश्वर त्यांचे आत्म्यास सद्‌गती देवो !** ***

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, पुणे विभाग

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**

**दि. १.२.२०२६ ते २८.२.२०२६**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे.**
**संस्थेविषयी दर्शवित असलेल्या आत्मीयतेबद्दल आम्ही सर्वांचे आभारी आहोत.**
**(देणगी व्याजाचा विनियोग देणगी प्राप्त झाल्यानंतर पुढील वर्षापासून १५ वर्षांपर्यंत केला जातो.)**

**देणगी रु. १०,००१/- वरील सर्व**

**●नाव** - **एटीए फ्रेट लाइन इंडिया प्रा. लि., पुणे**
**देणगी** - रु. ७,००,०००/-
**दिनांक** - २४.२.२०२६
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - संस्थेच्या अभियांत्रिकी, तंत्रज्ञान व व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे ९ येथे महिला सक्षमीकरण उपक्रमासाठी निधी

**●नाव** - **श्री. अशोक लक्ष्मण पेंडसे, पुणे**
**देणगी** - रु. २,००,०००/-
**दिनांक** - ६.२.२०२६
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थेच्या नवीन प्रकल्प वाढीसाठी


**●नाव** - **श्री. रविप्रकाश देवेंद्र लुकतुके, मुंबई**
**देणगी** - रु. २,००,०००/-
**दिनांक** - २५.२.२०२६
**निमित्त** - कै. देवेंद्र शंकर लुकतुके (मार्गशीर्ष वद्य ७)


देवेंद्र लुकतुके


उषा लुकतुके

कै. उषा देवेंद्र लुकतुके (मार्गशीर्ष वद्य ५) यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग इ. १० वी मध्ये शास्त्र व गणित विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती पारितोषिक

**●नाव** - **श्री. मोहन उर्फ प्रकाश राजाराम गरगटे, पुणे**


राजाराम गरगटे


सुशिला गरगटे

**देणगी** - रु. १,१०,०००/-
**दिनांक** - १८.२.२०२६
**निमित्त** - कै. राजाराम उर्फ आप्पासाहेब दादाजी गरगटे (मा. वि.) (कार्तिक शुध्द ९) कै. सुशिला राजाराम गरगटे (कार्तिक शुध्द ८) यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग**-देणगी व्याजविनियोग शिष्यवृत्ती पारितोषिक

**●नाव** - **श्री. नितीन पद्माकर कुलकर्णी, बेंगलोर**
**देणगी** - रु. ५५,०००/-
**दिनांक** - २५.२.२०२६
**निमित्त** - कै. पद्माकर प्रल्हाद कुलकर्णी (६ फेब्रुवारी)

कै. माधवराव रंगनाथ पाठक (४ मार्च) यांचे स्मृतिदिनानिमित्त

**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांचे योगक्षेम खर्चासाठी

●**नाव** - **श्री. संजयकुमार मोतीराम गायकवाड, पुणे**

**देणगी** - रु. ५०,०००/-

**दिनांक** - ४.२.२०२६

**निमित्त** - सदिच्छा देणगी

**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थेच्या कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स येथील विद्यार्थ्यांस शैक्षणिक मदतीसाठी

●**नाव** - **श्री. भाविक प्रफुल्ल कामानी, मुंबई**

**देणगी** - रु. ५०,०००/-

**दिनांक** - २४.२.२०२६

**निमित्त** - सदिच्छा देणगी

**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

●**नाव** - **श्री. मिलिंद शंकर संत, पुणे**

**देणगी** - रु. ३५,०००/-

**दिनांक** - ५.२.२०२६

**निमित्त** - कै. शंकर लक्ष्मण संत (पौष वद्य १०) यांचे स्मृतिदिनानिमित्त

**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत


ललिता कुलकर्णी

●**नाव** - **श्री. अरूण गजानन बहुलकर, पुणे**

**देणगी** - रु. २५,०००/-

**दिनांक** - ३.२.२०२६

**निमित्त** - कै. ललिता कृष्णराव कुलकर्णी यांचे स्मृतिदिनानिमित्त (३ फेब्रुवारी)

**विनियोग** - देणगी पूर्वीच्या देणगीत समाविष्ट करून येणाऱ्या व्याजाचा विनियोग अन्नदान

●**नाव** - **मोहर डायमंड प्रा. लि., मुंबई**

**देणगी** - रु. २५,०००/-

**दिनांक** - २८.२.२०२६

**निमित्त** - सदिच्छा देणगी

**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत


दत्तात्रेय गंधे

●**नाव** - **श्री. वंसत दत्तात्रेय गंधे (मा. वि.) श्री. शशिकांत दत्तात्रेय गंधे, पुणे**

**देणगी** - रु. २२,०००/-

**दिनांक** - ५.२.२०२६

**निमित्त** - वडिल कै. दत्तात्रेय केशव गंधे (२४ जानेवारी) यांचे स्मृतिदिनानिमित्त

**विनियोग** - देणगी व्याज विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. प्रदीप भालचंद्र पटवर्धन, पुणे**

**देणगी** - रु. २०,०००/-

**दिनांक** - ९.२.२०२६

**निमित्त** - कै. भालचंद्र गणेश पटवर्धन (२ जानेवारी)
कै. सौ. सुनीता भालचंद्र पटवर्धन (पौष शुध्द ११) यांचे स्मृतिदिनानिमित्त

**विनियोग** - देणगी पूर्वीच्या देणगीत समाविष्ट करून येणाऱ्या व्याजाचा विनियोग अन्नदान


भालचंद्र पटवर्धन


सुनीता पटवर्धन

**●नाव** - **श्री. मुकुंद मोरेश्वर देशपांडे, पुणे**
**देणगी** - रु. १७,०००/-
**दिनांक** - १३.२.२०२६
**निमित्त** - कै. मोरेश्वर सखाराम देशपांडे यांचे स्मृतिदिनानिमित्त (२१ फेब्रुवारी)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

**●नाव** - **योगी स्ट्रक्चर पॅकिंग आणि इंजिनिअरिंग प्रा. लि., पुणे**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - ४.२.२०२६
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

**●नाव** - **श्री. जनार्दन नारायण चापोरकर, पुणे**



नारायण चापोरकर


रमाबाई चापोरकर


अभिजित चापोरकर

**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - २५.२.२०२६
**निमित्त** - कै. नारायण गंगाधर चापोरकर (आषाढ वद्य १४) कै. रमाबाई नारायण चापोरकर (अश्विन शुध्द ३) कै. अभिजित जनार्दन चापोरकर (माघ शुध्द १२) यांचे स्मृतिदिनानिमित्त (प्रत्येकी रु. ५,०००/-)
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग अन्नदान

**●नाव** - **सौ. विदुला वसंत जोगळेकर, पुणे**
**देणगी** - रु. १०,००२/-
**दिनांक** - १०.२.२०२६


विनायक फाटक


वसुधा फाटक

**निमित्त** - कै. विनायक रामचंद्र फाटक (२९ सप्टेंबर) कै. सौ. वसुधा विनायक फाटक (८ ऑगस्ट) यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी पूर्वीच्या देणगीत समाविष्ट करून येणाऱ्या व्याजाचा विनियोग अन्नदान

**●नाव** - **सौ. मीना रघुनंदन जोशी, पुणे**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - २७.२.२०२६
**निमित्त** - कै. कुसुम कान्हेरे यांचे स्मृतिदिनानिमित्त (१५ फेब्रुवारी)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग अन्नदान

**●नाव** - **कु. सुमन गणेश साक्रीकर पुणे**
**देणगी** - रु. १०,५००/-
**दिनांक** - २५.२.२०२६
**निमित्त** - कै. सत्यभामाबाई गणेश साक्रीकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (मार्गशीर्ष वद्य २)
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग मिष्टान्न

**●नाव** - **पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभाग**
**देणगी** - रु. १२,०००/-
**दिनांक** - ७.२.२०२६

**निमित्त** - सदिच्छा देणगी

**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मदतीसाठी

**देणगी रु. ५,००१/- ते रु. १०,०००/-**



दिलीप अत्रे

**●नाव - श्रीमती गीता दिलीप अत्रे, पुणे**

**देणगी** - रु. १०,०००/-

**दिनांक** - ३.२.२०२६

**निमित्त** - कै. दिलीप दत्तात्रय अत्रे यांचे स्मृतिदिनानिमित्त

**विनियोग** - देणगी पूर्वीच्या देणगीमध्ये समाविष्ट करून येणाऱ्या व्याजाचा विनियोग शैक्षणिक मदत

**●नाव - सौ. शीतल योगेश कुंजीर, पुणे**

**देणगी** - रु. ७,००१/-

**दिनांक** - ५.२.२०२६

**निमित्त** - वडील कै. बाळासाहेब दत्तात्रय लगड यांचे स्मृतिदिनानिमित्त

**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना साबुदाणा खिचडी व केळी देण्यासाठी

**●नाव - श्रीमती गौरी गोखले, पुणे**

**देणगी** - रु. ५,५००/-

**दिनांक** - १६.२.२०२६

**निमित्त** - सदिच्छा देणगी

**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग श्रीखंडाचे मिष्टान्न देण्यासाठी (५ मार्च २०२६)

**●नाव - श्री. मनोहर डी. ढवळे, मुंबई**

**देणगी** - रु. १०,०००/-

**दिनांक** - २०.२.२०२६

**निमित्त** - कै. मालती पुरोहित यांचे स्मृतिदिनानिमित्त (१८ जुलै)

**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत

**●नाव - श्री. बाळकृष्ण एल. पटवर्धन, मुंबई**

**देणगी** - रु. ५,००१/-

**दिनांक** - २३.२.२०२६

**निमित्त** - कै. सुहासिनीबाई फडके यांचे स्मृतिदिनानिमित्त

**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव - सौ. स्वाती भालचंद्र बोकील, पुणे**

**देणगी** - रु. १०,०००/-

**दिनांक** - २५.२.२०२६

**निमित्त** - सदिच्छा देणगी

**विनियोग** - देणगी पूर्वीच्या देणगीत समाविष्ट करून येणाऱ्या व्याजाचा विनियोग अन्नदान

**●नाव - सौ. संध्या चंद्रशेखर वेलणकर, पुणे**


**देणगी** - रु. १०,०००/-

**दिनांक** - २७.२.२०२६

**निमित्त** - कै. दिलीप देशपांडे यांचे स्मृतिदिनानिमित्त

**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत

**देणगी रु. ४,००१/- ते रु. ५,०००/-**



पार्वतीबाई वझे

**●नाव - श्री. श्रीराम शंकर वझे, पुणे**

**देणगी** - रु. ५,०००/-

**दिनांक** - १.२.२०२६

**निमित्त** - कै. पार्वतीबाई शंकर वझे यांचे स्मृतिदिनानिमित्त (१ फेब्रुवारी)

**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. विजयकुमार त्रिपाठी, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १०.२.२०२६
**निमित्त** - कै. अनिता विजयकुमार त्रिपाठी यांचे स्मृतिदिनानिमित्त (१५ फेब्रुवारी)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना राजगिरा लाडू व केळी देण्यासाठी

●**नाव** - **श्रीमती मनाली शशिकांत भणगे, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - ११.२.२०२६
**निमित्त** - कै. शशिकांत मधुकर भणगे यांचे स्मृतिदिनानिमित्त (१९ मार्च)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


भालचंद्र गुरूजी

●**नाव** - **श्री. अभिजित भालचंद्र गुरूजी, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १४.२.२०२६
**निमित्त** - कै. भालचंद्र गोविंद गुरूजी यांचे स्मृतिदिनानिमित्त (माघ वद्य १)
**विनियोग** - देणगी पूर्वीच्या देणगीत समाविष्ट करून येणाऱ्या व्याजाचा विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्रीमती सरोज उध्दव जांभोळकर, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १६.२.२०२६
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत

●**नाव** - **श्री. श्रीकांत गजानन जोशी, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १७.२.२०२६
**निमित्त** - कै. गजानन वासुदेव जोशी यांचे स्मृतिदिनानिमित्त (२२ फेब्रुवारी)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना साबुदाणा खिचडी देण्यासाठी

●**नाव** - **श्रीमती अनिता रमेश शिंदे, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - २१.२.२०२६
**निमित्त** - कै. रमेश शिंदे यांचे स्मृतिदिनानिमित्त (फाल्गुन शुध्द ७)
**विनियोग** - देणगी पूर्वीच्या देणगीत समाविष्ट करून येणाऱ्या व्याजाचा विनियोग शैक्षणिक मदत

## देणगी रु. ३,००१/- ते रु. ४,०००/-

●**नाव** - **एलिझाबेथ ब्लॉक होम, पुणे**
**देणगी** - रु. ४,०००/-
**दिनांक** - २.२.२०२६
**निमित्त** - मातोश्री कै. ऑरिकमेरी डीलन यांचे स्मृतिदिनानिमित्त (७ फेब्रुवारी)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **सौ. शिल्पा धनंजय नरवणे, पुणे**
**देणगी** - रु. ३,५००/-
**दिनांक** - २.२.२०२६
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यासाठी

●नाव - **श्री. गिरीश श्रीधर लिमये, पुणे**
देणगी - रु. ३,५००/-
दिनांक - १४.२.२०२६
निमित्त - कै. प्रभाकर नारायण ओक यांचे स्मृतीदिनानिमित्त (माघ वद्य १४)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

●नाव - **सौ. प्रीती राजेंद्र खत्री, पुणे**
देणगी - रु. ४,०००/-
दिनांक - १७.२.२०२६
निमित्त - सदिच्छा देणगी
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अभियांत्रिकी, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे ९ येथील इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग विभागातील, द्वितीय, तृतीय व चतुर्थ वर्षात प्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीस शिष्यवृत्ती पारितोषिक

●नाव - **श्री. सुहास नागेश देशपांडे, पुणे**
देणगी - रु. ३,२००/-
दिनांक - १८.२.२०२६
निमित्त - कै. डॉ. सुरेश नागेश देशपांडे यांचे स्मृतिदिनानिमित्त (१९ फेब्रुवारी)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

**देणगी रु. २,००१/- ते रु. ३,०००/-**

●नाव - **श्री. संजय राजाराम वैद्य व श्री. राजेश राजाराम वैद्य, पुणे**
देणगी - रु. ३,०००/-
दिनांक - २.२.२०२६ व दि. ३.२.२०२६
निमित्त - कै. श्रीमती सुशिला राजाराम वैद्य व कै. राजाराम विश्वनाथ वैद्य यांचे स्मृतिदिनानिमित्त (७ फेब्रुवारी)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

●नाव - **श्री. भालचंद्र मारुतराव देशपांडे, पुणे**
देणगी - रु. २,५००/-
दिनांक - ७.२.२०२६
निमित्त - कै. छाया मारुतराव देशपांडे यांचे स्मृतिदिनानिमित्त (२३ मार्च)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यासाठी

●नाव - **श्री. प्रकाश गणेश जोशी, पुणे**
देणगी - रु. ३,०००/-
दिनांक - ७.२.२०२६
निमित्त - कै. गणेश लक्ष्मण जोशी यांचे स्मृतिदिनानिमित्त (२ मार्च)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न


ॲड.एस.एन.चंद्रचूड

● नाव - **ॲड.एस.एन.चंद्रचूड (मा. वि.), पुणे**
देणगी - रु. २,००२/-
दिनांक - २४.२.२०२६
निमित्त - प्रतिमहा प्रमाणे सदिच्छा देणगी
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

●नाव - **श्री. गिरीश श्रीधर लिमये, पुणे**
देणगी - रु. ३,०००/-
दिनांक - २७.२.२०२६
निमित्त - कै. शोभना प्रभाकर ओक यांचे स्मृतिदिनानिमित्त (फाल्गुन शुध्द १४)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न शिरा देण्यासाठी



रेवती आगाशे

●**नाव - श्री. रविंद्र दिनकर आगाशे, पुणे**
**देणगी** - रु. २,५००/-
**दिनांक** - २८.२.२०२६
**निमित्त** - कै. सौ. रेवती रविंद्र आगाशे यांचे स्मृतिदिनानिमित्त (२८ फेब्रुवारी)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव - श्रीमती श्रीजा बाबुराव नायर, पुणे**
**देणगी** - रु. २,००२/-
**दिनांक** - ४.२.२०२६ व दि. २८.२.२०२६
**निमित्त** - कै. श्रीमती संथा नायर यांचे स्मृतिदिनानिमित्त (३१ जानेवारी रु. १,००१ ) उर्वरित रु. १,००१/- सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. १,००१/- ते रु. २,०००/-**

●**नाव - मा. विश्वस्त जी. एल. सहस्रबुध्दे, पुणे**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - ४.२.२०२६
**निमित्त** - प्रतिवर्षी प्रमाणे सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

●**नाव - श्री. सदाशिव सखाराम पेंडसे, ठाणे**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - ४.२.२०२६
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव - सौ. नीता विनय जोशी, मुंबई**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - १४.२.२०२६
**निमित्त** - कै. अर्चना घाग्रेकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (२६ फेब्रुवारी)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

●**नाव - श्री. चंद्रकांत गोविंद भालेराव, (मा. वि.), पुणे**
**देणगी** - रु. १,१११/-
**दिनांक** - १७.२.२०२६
**निमित्त** - कै. राधाबाई गोविंद भालेराव यांचे स्मृतिदिनानिमित्त (२६ फेब्रुवारी)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

●**नाव - श्री. सुधीर रामकृष्ण पळसुले, पुणे**
**देणगी** - रु. १,७०१/-
**दिनांक** - २२.२.२०२६
**निमित्त** - कै. सौ. अनुराधा सुधीर पळसुले यांचे स्मृतिदिनानिमित्त (२२ फेब्रुवारी)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

●**नाव - श्रीमती सुरेखा सुनील पाटील, पुणे**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - २३.२.२०२६
**निमित्त** - कै. श्रीमती बनाबाई मनोहर कदम यांचे स्मृतिदिनानिमित्त (३ मार्च)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

**देणगी रु. ५०१/- ते रु. १,०००/-**

●**नाव - श्री. चंद्रशेखर बाळकृष्ण कुलकर्णी, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - ३.२.२०२६
**निमित्त** - कै. शैलजा बाळकृष्ण कुलकर्णी (१९ फेब्रुवारी)

कै. बाळकृष्ण विठ्ठल कुलकर्णी
(१६ फेब्रुवारी)
यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. गुणवर्धन अजित सोमण, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - ३.२.२०२६
**निमित्त** - कै. सुरेंद्र सोमण, कै. रामचंद्र सोमण आणि कै. अजित सोमण (माघ शु. ७)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. नीलमाधव सुभाष फडके, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - ४.२.२०२६
**निमित्त** - कै. सुषमा सुभाष फडके,
कै. सुभाष महादेव फडके,
कै. महादेव गुंडोपंत फडके व
कै. लीलाबाई महादेव फडके
यांचे स्मृतिदिनानिमित्त (५ फेब्रुवारी)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. अरविंद मनोहर मुजुमदार, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - १०.२.२०२६
**निमित्त** - कै. इंदिराबाई मनोहर मुजुमदार यांचे स्मृतिदिनानिमित्त (२३ फेब्रुवारी)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यासाठी

●**नाव** - **श्रीमती वैजयंती व्ही. दांडेकर, रायगड**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - १०.२.२०२६
**निमित्त** - कै. विजय पी. दांडेकर
यांचे स्मृतिदिनानिमित्त (२९ सप्टेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

●**नाव** - **सौ. वासंती दबडवाघ, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - २३.२.२०२६
**निमित्त** - कै. पुरुषोत्तम खंडेराव गोत्री
यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

देणगी रु. ५००/- **खालील सर्व**

●**नाव** - **श्री. सुहास भालचंद्र जोशी, पुणे**
**देणगी** - रु. २५१/-
**दिनांक** - ११.२.२०२६
**निमित्त** - कै. भारती भालचंद्र जोशी यांचे स्मृतिदिनानिमित्त (११ फेब्रुवारी)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. नवनाथ यशवंत शिर्के, पुणे**
**देणगी** - रु. १००/-
**दिनांक** - २०.२.२०२६
**निमित्त** - डॉ. कै. गुरूवर्य एम. कटकर
(माधव हरी कटकर) यांचे
जयंतीनिमित्त (२० फेब्रुवारी)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

●**नाव** - **सौ. मीना कुलकर्णी, पुणे**
**देणगी** - रु. २५०/-
**दिनांक** - २८.२.२०२६
**निमित्त** - कै. डॉ. गंगाधर सावळाराम गुपचूप
यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

●**नाव** - **श्रीमती रेखा विश्वनाथ ठकार, पुणे**
**देणगी** - रु. १५१/-
**दिनांक** - २८.२.२०२६
**निमित्त** - कै. गोविंद नारायण ठकार यांचे स्मृतिदिनानिमित्त (२ मार्च)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**वाढदिवसानिमित्त देण्यात आलेल्या देणग्या**

●**नाव** - **श्री. पांडुरंग बाळकृष्ण कुलकर्णी, (मा. वि.), पुणे**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - २१.२.२०२६
**निमित्त** - स्वतःच्या वाढदिवसानिमित्त (२५ फेब्रुवारी)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

●**नाव** - **डॉ. वंदना पंढरीनाथ आबनावे, पुणे**
**देणगी** - रु. ५,५००/-
**दिनांक** - २१.२.२०२६
**निमित्त** - स्वतःच्या वाढदिवसानिमित्त (२३ फेब्रुवारी)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

●**नाव** - **कु. बेला पराग रातनजनकर, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - २१.२.२०२६
**निमित्त** - स्वतःच्या वाढदिवसानिमित्त (२३ फेब्रुवारी)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अल्पोपहार

●**नाव** - **श्री. मारुती गुणाजी घडशी, पुणे**
**देणगी** - रु. ५०५/-
**दिनांक** - १७.२.२०२६
**निमित्त** - स्वतःच्या वाढदिवसानिमित्त (७ मार्च)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**वस्तुरूप देणगी अंदाजे मूल्य रु.**

- **कु. रिध्दी, कु. श्रावणी व चि. आर्चिक, पुणे**
  कै. संगीता संकपाळ यांचे जयंतीनिमित्त
  पोहे व उपमा (२६० नग), रु. ५,०००/-
- **श्री. वेदांत शैलेंद्र पन्हाळे, पुणे**
  कै. शैलेंद्र श्रीनिवास पन्हाळे यांचे
  स्मृतिदिनानिमित्त
  गोष्टीची पुस्तके एकूण ७० नग, रु. २,५००/-
- **श्रीमती उज्ज्वला रमेश अडागळे, पुणे**
  अक्षय रमेश अडागळे व गौरी अडागणे
  यांचे वाढदिवसानिमित्त, चॉकलेट ५ पाकिटे,
  बिस्किटे १५ पुडे, रु. १,५००/-
- **सौ. सुचेता उदय वळामे, पुणे**
  १ पाण्याचा पिंप व २ पातेली, रु. १,०००/-

***

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, तळेगांव (अं) शाखा

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**
**उपाकार्याध्यक्ष – श्री. अमोल जोशी**
**दि. १.३.२०२६ ते ३१.३.२०२६**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे. संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल आम्ही सर्वांचे आभारी आहोत.**

● **नाव** - **सौ. वीणा अतुल लोहिते, नाशिक**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - २.३.२०२६
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - तळेगाव शाखा वाढीसाठी

***

## ❊ श्रीराम नवमी क्षणचित्रे, संस्था मुख्यालय, पुणे ३० ❊



गुरूवार दि. २६ मार्च २०२६ (चैत्र शुध्द ९) रोजी
श्रीराम नवमीनिमित्त संस्थेच्या धनुर्धारी श्रीराम-लक्ष्मणाची
पूजा करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे



कीर्तनकार ह. भ. प. सौ. सुजाता शहाणे
यांचा सत्कार करताना
उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी



श्री. नंदकुमार भांडवलकर यांचा पुष्पगुच्छ देऊन
सत्कार करताना संचालक श्री. आनंद कुलकर्णी



श्री. दत्तप्रसाद शहाणे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार
करताना संचालक श्री. सुनील रेडेकर



## ❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरूळ शाखा, नवी मुंबई ❊

नवनिर्वाचित नगरसेवक श्री. सचिन देवाप्पा लवटे
यांनी विद्याभवन संकुलातील
वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमात
विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यासाठी संस्थेस
रु. १,५०,०००/- देणगी दिली.
श्री. सचिन लवटे यांचे आभार मानताना
कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे

SAMACHAR - Registered RNI No. 14546 / 1957. Decl. No. SDO / PUNE / SR / 74 / 2016
[Publication Date 13.4.2026 Posting Date 15.4.2026]

Periodical Post



संस्थेचे ज्येष्ठ माजी विद्यार्थी श्री. र. गो. कुलकर्णी यांनी दि. ४ मार्च २०२६ रोजी विद्याभवन घाटकोपर, मुंबई शाखेच्या सुवर्ण महोत्सवी वर्ष उद्घाटन समारंभ प्रसंगी रु. २ लाखांची देणगी दिल्यानिमित्त त्यांचा सत्कार करताना कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, समवेत उपस्थित मान्यवर





श्री. आशुतोष रविप्रकाश लुकतुके व सौ. मनीषा आशुतोष लुकतुके, यु. एस. ए. यांनी संस्थेस रु. दोन लाखांची देणगी दिली. देणगीचा धनादेश स्वीकारताना संचालक श्री. रमेश कुलकर्णी

✻ संस्था मुख्यालय, पुणे ✻
दि. २५ फेब्रुवारी २०२६

श्री. नितीन पद्माकर कुलकर्णी व सौ. विभावरी नितीन कुलकर्णी, बेंगलुरू यांनी संस्थेस रु. ५५,०००/- ची देणगी दिली. या प्रसंगी त्यांना स्मृतिचिन्ह देऊन आभार मानताना संचालक श्री. रमेश कुलकर्णी

♦ पुणे विद्यार्थी गृह ♦

▣ पुणे शाखा – (०२०) २४४७०९२७, २४४७०५७३, २४४७९०५८
▣ मुंबई शाखा – (०२२) २५०६२३२२, फॅक्स : (०२०) २५०६४९३५
▣ नवी मुंबई (नेरूळ) शाखा – (०२२) २७७२३४१८
▣ नाशिक शाखा – (०२५३) २५११३०६ ▣ म्हसरूळ शाखा – (०२५३) २५३४२९१
▣ तळेगाव अंजनेरी शाखा – (०२५९४) २२२२२७

कृपया आपल्या प्रतिक्रिया pvgsamachar@gmail.com या ई मेल वर नोंदवाव्यात.

This monthly Samachar is printed on behalf of
Pune Vidyarthi Griha by Printer and Publisher Mr. Subhash Mallappa Jirge
at Maharashtra Mudranshala Chhapkhana,1786, Sadashiv Peth, Pune 411030
and Published at Pune Vidyarthi Griha, 1786, Sadashiv Peth, Pune 411030.
Editor : Mr. Rajendra Vitthal Borhade

समाचार हे मासिक पुणे विद्यार्थी गृह संस्थेकरिता मुद्रक, प्रकाशक श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे यांनी
महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापून
पुणे विद्यार्थी गृह, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले.
संपादक श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे